CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २१ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७५ | पाने १२ | किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### शेअर बाजारांत 'सुपर मंडे'



**मुंबई** : जागतिक सकारात्मक संकेत आणि बँकिंग शेअर्समधील तेजीच्या जोरावर सोमवारी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी चांगल्या कमाईसह बंद झाले. निर्देशांक ४५४ अंकांनी वाढून ७७,०७३ वर बंद झाला. निफ्टी १४१ अंकांच्या वाढीसह २३,३४४ वर स्थिरावला. क्षेत्रीय पातळीवर वाहन आणि एफएमसीजी वगळता इतर सर्व निर्देशांक तेजीत बंद झाले. बँक, मीडिया, मेटल, कॅपिटल गुड्स, पीएसयू बँक, टेलिकॉम, पॉवर हे निर्देशांक १ ते २ टक्के वाढले. बीएसई मिडकॅप ०.६ टक्के आणि स्मॉलकॅप ०.८ टक्के वाढला. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेची सूत्रे स्वीकारली. त्याकडे जगातील बाजारांचे लक्ष लागून आहे. ट्रम्प यांची राजकीय धोरणे, आयात शुल्क तसेच व्हिसा धोरणाचा पुढील काही दिवसांत बाजारावर प्रभाव दिसून येईल, असे बाजार तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### कुरकुरे विकण्यासाठी पेप्सी-टाटा एकत्र




**मुंबई** : पेप्सी आणि टाटा यांनी पॅकेज्ड स्नॅक्स मार्केटसाठी हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी दोन्ही कंपन्यांनी शीतपेयांच्या बाजारात संयुक्त उपक्रम राबविला. ही भागीदारी २०१० मध्ये ५०:५० संयुक्त उपक्रमावर स्थापन करण्यात आली होती. मात्र, हा करार चार वर्षांपूर्वी संपला. टाटाने या संयुक्त उपक्रमात पेप्सिकोचे स्टेकही विकत घेतले. आता पुन्हा एकदा दोन्ही कंपन्या एकत्र येऊन स्नॅक्स बाजारात आपला दबदबा वाढवणार आहेत.

### दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना नव्याने मिळणार हॉल तिकीट

**पुणे** : इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेच्या प्रवेशपत्रासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. हॉल तिकिटांवर विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आल्यानंतर राज्यात मोठा वाद निर्माण झाला होता. हॉल तिकिटवर केल्या गेलेल्या जात प्रवर्गाच्या उल्लेखानंतर शिक्षण तज्ज्ञ आणि शिक्षकांकडून बोर्डाच्या निर्णयावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले होते. आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने हा निर्णय मागे घेतला आहे. आता इयत्ता १०वी आणि १२ वीच्या परीक्षेसाठी नव्याने प्रवेशपत्र जारी करण्यात येणार असल्याची माहिती पुढे आली आहे. या संपूर्ण प्रकाराबाबत परीक्षा मंडळाने दिलगिरी व्यक्त केली आहे.

### २१ ते २४ जानेवारीदरम्यान जोतिबा दर्शन बंद

**कोल्हापूर** : लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या दख्खनचा राजा श्री जोतिबाच्या मूर्तीवर रासायनिक संवर्धन प्रक्रिया केली जाणार असल्याने भाविकांना श्री जोतिबा देवस्थानाचे दर्शन घेता येणार नाही. हे काम २१ ते २४ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे. श्री केदारलिंग देवस्थान मूर्ती सुस्थितीत राहण्यासाठी सहायक संचालक, पुरातत्त्व विभागाच्यावतीने श्री केदारलिंग देवाच्या मूर्तीवर रासायनिक संवर्धन प्रक्रिया केली जाणार आहे. मंदिर व्यवस्थापन समितीने ३ जानेवारी रोजी भारतीय पुरातत्त्व विभागाच्या महासंचालकांना मूर्तीच्या संवर्धनासाठी पत्र लिहिले होते. भारतीय पुरातत्त्व विभागाने मूर्तीची पाहणी करून त्यावर रासायनिक प्रक्रिया करायचे ठरवले.

### राहुल गांधींवरील मानहानी खटल्याची कार्यवाही स्थगित

**नवी दिल्ली** : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. २०१९ मध्ये निवडणूक रॅलीदरम्यान अमित शाह यांच्याविरुद्ध केलेल्या वक्तव्याबद्दल राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यातील कनिष्ठ न्यायालयाच्या कार्यवाहीला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. भाजप कार्यकर्ते नवीन झा यांनी २०१९ मध्ये राहुल गांधी यांच्यावर अमित शाह यांच्याविरुद्ध केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल खटला दाखल केला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी चाईबासा येथे केलेल्या एका सार्वजनिक भाषणात, राहुल गांधी यांनी शाह यांच्यासाठी 'किलर' हा शब्द वापरल्याचा आरोप आहे. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने झारखंड सरकार आणि भाजपा नेत्याला नोटीस बजावून राहुल यांच्या याचिकेवर उत्तर मागितले.

# संजय रॉयला मरेपर्यंत जन्मठेप

**• आरजी कार बलात्कार-हत्या प्रकरण • सियालदाह न्यायालयाचा निकाल**






**कोलकाता, २० जानेवारी**

येथील आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करीत तिची हत्या करण्याच्या आरोपात दोषी ठरलेल्या संजय रॉयला सियालदाह येथील सत्र न्यायालयाने सोमवारी मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

या प्रकरणात पीडिता डॉक्टरच्या कुटुंबासह सीबीआयने संजय रॉयला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली. मात्र, त्याचा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ नसल्याचे स्पष्ट करीत न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा तसेच ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला. पीडितेच्या कुटुंबीयांना १७ लाख रुपयांची भरपाई देण्याचा आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिला.

तुझ्यावरील बलात्कार व हत्येचा आरोप सिद्ध झाला आहे, असे मी पहिलेच सांगितले. संभाव्य शिक्षेबाबत तुला काय म्हणायचे आहे, असे शिक्षा ठोठावण्यापूर्वी न्यायाधीशांनी संजयला विचारले. मला या प्रकरणात गोवण्यात आले, मी नेहमी रुद्राक्षाची माळ घालतो. मी दोषी असतो, तर गुन्हा घडलेल्या ठिकाणी माळ तुटली असती. मला बोलण्याची संधी दिली नाही. अनेक दस्तावेजांवर बळजबरीने स्वाक्षरी घेण्यात आली, असे त्याने न्यायालयाने सांगितले.

बाजू मांडण्यासाठी तुला अर्धा दिवस देण्यात आला होता. मी तीन तासांपर्यंत तुझे म्हणणे ऐकले. माझ्यासमोर जे आरोप, पुरावे, दस्तावेज, साक्षीदार सादर करण्यात आले, त्यांच्या पडताळणीच्या आधारे तू दोषी आढळला. तू पहिलेच दोषी सिद्ध झाला आहे. आता मी केवळ शिक्षेबाबत तुझे म्हणणे ऐकणार आहे. तुझ्या कुटुंबात कोण आहे? ते तुझ्या संपर्कात आहेत का, असे प्रश्न न्यायालयाने विचारले. (वृत्तसंस्था)

### प्रकरण दुर्मिळ : सीबीआय

हे प्रकरण दुर्मिळ आहे. हत्या झालेली पीडिता अतिशय हुशार होती. या घटनेमुळे समाजमन सुन्न झाले. माता-पित्यांनी आपल्या मुलीला गमावले. डॉक्टर सुरक्षित नसतील, तर काय सांगावे? केवळ फाशीची शिक्षाच समाजाला विश्वास देऊ शकते, असा युक्तिवाद सीबीआयच्या वकिलाने केला.

# रायगड, नाशिक पालकमंत्रिपदाला स्थगिती


**मुंबई, २० जानेवारी**

पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरून शिवसेनेच्या नाराजीनंतर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीनाशिक आणि रायगड या जिल्ह्यातील नियुक्तीला स्थगिती दिली आहे. याठिकाणी शिवसेनेच्या पालकमंत्र्यांची नियुक्ती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

१८ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर महायुतीत नाराजीचा सूर उमटू लागला. धनंजय मुंडेंसह अन्य काही मं□त्र्यांनादेखील बाहेर ठेवण्यात आले. मागील काळात नाशिकचे पालकमंत्री असलेले दादाजी भूसे पुन्हा एकदा या ठिकाणी उत्सुक होते. तर, कोकणात भारत गोगावले इच्छुक होते. शिवसेनेच्या या दिग्गजांना पालकमंत्रिपदापासून दूर ठेवल्याने शिवसेनेतून नाराजीचा सूर उमटला. असे असले तरी, येत्या २६ जानेवारी रोजी येथील ध्वजवंदन मात्र हेच नेते करणार आहेत.

आता स्थगिती देण्यात आलेल्या दोन्ही जिल्ह्यांना शिवसेनेचा पालकमंत्री मिळतो की अन्य काही निर्णय होतो, याबाबत अनिश्चितता असली तरी, आजघडीला दादा भूसे आणि भारत गोगावले यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. (तभा वृत्तसेवा)

# ट्रम्प अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष; बायबलवर हात ठेवून घेतली शपथ



**वॉशिंग्टन, २० जानेवारी**

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून बायबलवर हात ठेवून शपथ घेतली. त्यांचा शपथविधी समारंभ वॉशिंग्टन डीसीमधील यूएस कॅपिटल इमारतीत झाला. कडाक्याच्या थंडीमुळे शपथविधी सोहळा इनडोअर ठेवण्यात आला होता.

शपथविधी सोहळ्याला इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, अर्जेंटिनाचे अध्यक्ष जेवियर मेली, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्यासह ७०० हून अधिक नेते आणि सेलिब्रिटी उपस्थित होते. शपथ घेतल्यानंतर ट्रम्प यांनी राष्ट्राला संबोधित केले. त्यानंतर ते राष्ट्राध्यक्षांच्या ताफ्यासह कॅपिटल हिलहून व्हाईट हाऊसपर्यंत प्रवास केला. शपथविधीपूर्वी ट्रम्प वॉशिंग्टन डीसीमधील सेंट जॉन्स चर्चमध्ये पोहोचले. त्यांनी येथे प्रार्थना केली. दुसरीकडे, पद सोडण्याच्या काही तास आधी, राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी सोमवारी अनेक लोकांना आगाऊ माफी दिली. यामध्ये डॉ. अँथनी फौसी, जनरल मार्क मिले आणि ६ जानेवारी रोजी झालेल्या कॅपिटल हिल हल्ल्याची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचे सदस्य यांचा समावेश आहे. हे सर्वजण ट्रम्प यांचे विरोधक मानले जातात. ट्रम्प यांच्या आधी जेडी व्हॅन्स यांनी उपाध्यक्षपदाची शपथ घेतली. ते बायबलवर हात ठेवून म्हणाले - मी अमेरिकन संविधानाचे रक्षण करेन. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये तापमान उणे ५ अंश सेल्सिअस आहे.

कडाक्याच्या थंडीमुळे, राष्ट्रपतींचा शपथविधी समारंभ ४० वर्षांनी संसदेत पार पडला. यापूर्वी १९८५ मध्ये, रोनाल्ड रेगन यांनी कॅपिटल हिलमध्ये शपथ घेतली होती.

# गावी आलो म्हणजे नाराज नाही

### उपमुख्यमंत्री शिंदेंनी दरेगावातून केले स्पष्ट

**मुंबई, २० जानेवारी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाएकी आपल्या मूळ गावी म्हणजे सातारा जिल्ह्यातील दरेगावी गेल्याने, ते नाराज असल्याच्या चर्चेला पेव फुटले होते. मात्र, स्वतः शिंदेंनी गावातून पत्रपरिषद घेत, आपण नवीन महाबळेश्वर प्रकल्पाच्या कामासाठी आलो असल्याचे स्पष्ट करीत, मी गावी आलो की नाराज असल्याची आवई उठवली जात असल्याचे म्हणाले.

सोमवारी एकनाथ शिंदे अचानक आपल्या गावी गेले आणि त्यांच्या जाण्याला पालकमंत्री पदासाठीच्या नाराजीला जोडले गेले. नाशिक आणि रायगड या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीता वाद निर्माण झाला आहे. या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद शिवसेनेला हवी असल्याने शिंदे नाराज असून, ते दरेगावी निघून गेले असल्याच्या चर्चा दिवसभर होत्या.



याबाबतची माहिती मिळताच शिंदे स्वतः माध्यमांसमोर आले आणि त्यांनी आपला ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या नवीन महाबळेश्वर प्रकल्पाच्या कामासाठी आल्याचे सांगितले. यासाठी मला आता सतत दरेगावी यावे लागणार आहे. मी गावी आलो की नाराज असल्याची बोलले जाते. अगदी प्रतापगढापासून पाटणपर्यंत पसरलेला हा प्रकल्प खूप मोठा आहे. सध्या २३५ गावे यात अंतर्भूत असून, अजून २९५ गावांनी यात समावेश करण्याची मागणी केली आहे, असेही शिंदे म्हणाले.

**पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात वावगे काय?**

सत्तास्थापनेपासून मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटपापर्यंत सर्वच स्तरावर प्रश्न निर्माण करण्यात आले होते. मात्र, सर्वच प्रश्न योग्य मार्गाने सुटले. त्याचप्रमाणे पालकमंत्रिपदाचा प्रश्नही समन्वयातून सुटेल. एखाद्या जिल्ह्यात अनेक वर्षांपासून काम केले असेल तर, तेथील पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात वावगे काय, महायुतीत मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री मिळून यावर मार्ग काढू. इतरांनी चिंता करण्याचे कारण नाही, असेही शिंदे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### महाकुंभात किन्नर आखाड्याजवळ आग

**महाकुंभ नगर, २० जानेवारी**

महाकुंभातील सेक्टर १६ मध्ये किन्नर आखाड्याजवळ सोमवारी आग लागली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सेक्टर १९ मध्ये आग लागून १८ तंबू जळून खाक झाल्याच्या दुसऱ्या दिवशी ही आग लागली आहे. अग्निशमन केंद्राच्या टॉवरवर तैनात कर्मचाऱ्याला सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास किन्नर आखाड्याजवळ धूर दिसला. त्याने तातडीने नियंत्रण कक्षाला माहिती दिली, असे अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले. कोणताही विलंब न करता गस्तीवर असलेले पाण्याचे बंब घटनास्थळी पाठवण्यात आले. (वृत्तसंस्था)

# अक्षय शिंदेचा 'एन्काऊंटर' बनावट!

### चौकशी अहवालात पाच पोलिसांवर ठपका

**मुंबई, २० जानेवारी**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या चकमक प्रकरणी पाच पोलिसांना जबाबदार धरण्यात आले. ठाणे दंडाधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालातून तसे निष्पन्न झाले आहे. हा अहवाल सोमवारी सीलबंद लिफाफ्यात मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आला. हा एन्काऊंटर बनावट असू शकतो, पोलिस ही परिस्थिती योग्यरीत्या हाताळू शकले असते. त्यांनी बळाचा वापर करणे योग्य ठरू शकत नाही, असे अहवालात म्हटले आहे.

या अहवालानंतर उच्च न्यायालयाने पाच पोलिसांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची सूचना केली. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अक्षय शिंदेला चकमकीत गोळ्या घालून ठार करण्यात आले होते. त्यावेळी तेथे पाच पोलिस अधिकारी उपस्थित होते.

ठाण्याच्या मुंब्रा बायपासवर अक्षय शिंदेचा पोलिस चकमकीत मृत्यू झाला होता. ही चकमक वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. चकमकीदरम्यान चार वेळा गोळीबार करण्यात आला होता. त्यातील तीन फैरी अक्षय शिंदेने झाडले; तर एक स्वरक्षणार्थ एसआयटी पथकातील संजय शिंदे यांनी अक्षयवर झाडली आणि त्यात अक्षयचा मृत्यू झाला, असा दावा पोलिसांकडून करण्यात आला होता.

या प्रकरणी सोमवारी ठाणे दंडाधिकाऱ्यांनी त्यांचा चौकशी अहवाल उच्च न्यायालयात सादर केला. ऑगस्ट २०२४ मध्ये बदलापूरच्या एका शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी अक्षय शिंदेला अटक केली होती. सप्टेंबरमध्ये त्याचा चकमकीत मृत्यू झाला होता. या प्रकरणी पाच पोलिस अधिकारी आरोपीच्या मृत्यूसाठी जबाबदार असल्याचा निष्कर्ष दंडाधिकाऱ्यांनी काढला आहे.

**पिस्तुलावर शिंदेच्या बोटांचे ठसे नाहीत**

चकमकीत वापरलेल्या पिस्तुलावर शिंदेच्या बोटांचे ठसे आढळून आलेले नाहीत तसेच बंदुकीच्या गोळीचे कोणतेही अवशेष सापडले नाहीत. यामुळे बळाचा वापर करणे योग्य नव्हते, असे सूचित होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)



# पंढरपूरमधील गर्दीच्या व्यवस्थापनासाठी एआयचा वापर

### शासनाकडे दोन कोटींचा प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, २० जानेवारी**

पंढरपूरमध्ये दरवर्षी आषाढी कार्तिकीसह चार मोठ्या यात्रा भरतात. आषाढी यात्रेला १५ ते १६ लाख भाविक पंढरपूरला दर्शनासाठी येत असतात. याते प्रामुख्याने विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग आणि चंद्रभागा वाळवंटात लाखो भाविकांची गर्दी असते. याच गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाकडून राज्य सरकारला दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे.

पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी वर्षाकाठी एक कोटी भाविक येत असतात. आषाढी यात्रेच्या काळात मानाच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. दशमी आणि एकादशीला मंदिर परिसर, प्रदक्षिणामार्ग आणि चंद्रभागा वाळवंटात लाखो भाविकांची गर्दी असते. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी यात्रेच्या तीन महिने आधी प्रशासनाच्या वतीने तयारी केली जाते. प्रत्येक वर्षी होणाऱ्या सोहळ्यासाठी आता एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे. यासाठी चालणारी गर्दी, बसलेली गर्दी आणि उभे राहिलेली गर्दी याचे नियोजन केले जाणार आहे. यात्रा काळात वेगवेगळ्या विभागामार्फत गर्दीचे व्यवस्थापन केले जाते. मात्र, एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व विभागांचे एकत्रिकरण करण्यात येणार आहे. यात सॅटेलाईट, इंटरनेट, जीपीएस सिस्टीम व्हिडीओ शूटिंग, सीसीटीव्ही आणि मानवी व्यवस्थापन सर्व एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकत्र केले जाणार आहे.

हे एआय तंत्रज्ञान तयार करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाकडून शासनाकडे दोन कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. निधी प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण आराखडा तयार केला जाणार आहे. याचा पुढील शेकडो वर्षे यात्रा व्यवस्थापनासाठी फायदा होणार असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिसागर ढोले यांनी दिली.

# दिनेश वाघमारे नवीन निवडणूक आयुक्त

### मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीवर राज्यपालांचे शिक्कामोर्तब

**मुंबई, २० जानेवारी**

जेष्ठ सनदी अधिकारी दिनेश वाघमारे यांची राज्याचे निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नावाची शिफारस केल्यानंतर राज्यपालांनी शिक्कामोर्तब केले. राज्यातील महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी नवीन निवडणूक आयुक्तांवर असणार आहे. दिनेश वाघमारे हे सचिव दर्जाचे अधिकारी आहेत.



मंत्रिपरिषदेने नव्या निवडणूक आयुक्तांची निवड करण्याचा सर्वाधिकार मुख्यमंत्र्यांना दिला होता. त्यानुसार देवेंद्र फडणवीस यांनी दिनेश वाघमारे यांच्या नावाची शिफारस केली. दिनेश वाघमारेंच्या नावाला राज्यपालांची मंजुरी मिळाली आहे. (तभा वृत्तसेवा)

### सोपोर चकमकीत जवान हुतात्मा

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या सोपोर जिल्ह्यात अतिरेक्यांसोबत झालेल्या चकमकीत लष्कराचा जवान हुतात्मा झाला, तर एक जवान जखमी झाला. सोपोर परिसरात रात्रभर झालेल्या चकमकीत जवान हुतात्मा झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. सोपोरच्या जालुरा गुज्जरपट्टीमधील एका ठिकाणी ही चकमक झडली, असे चिनार कोअरने सांगितले.

# शिंदेंना संपवून नवीन 'उदय' पुढे येण्याची शक्यता : वडेट्टीवार

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२० जानेवारी**

- महायुती सरकार मधील नाराजी नाट्य संपत नसून. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या गावी गेले आहेत.त्यांची गरज भाजपसाठी संपली आहे का? उध्दव ठाकरे यांचा पक्ष फोडून शिंदेंना आणले तसे शिंदे गटात नवीन ' उदय ' पुढे येईल असे सूचक विधान काँग्रेस ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केले . पालकमंत्री पदावरून शिवसेनेत नाराजी आहे अश्यावेळी शिंदे पदरात काही पडून घेण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले.


नागपूर इथे पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळून देखील या सरकारमध्ये धुसफुस सुरूच आहे. आधी मंत्रिमंडळ विस्तार, त्यानंतर पालकमंत्री नेमण्यात आणि आता नेमलेले पालकमंत्री या आदेशाला २४ तासात स्थगिती देण्याची वेळ आली यावरून या सरकार मध्ये सगळ काही आलबेल नसल्याचे चित्र आहे. आज पालकमंत्री , उद्या मंत्री, उपमुख्यमंत्री बदलतील. ही परिस्थिती पाहून जनतेलाच या सरकारला स्थगिती द्यावी लागेल, अशी टीका करुन ते म्हणाले,'या तिन्ही पक्षांमध्ये जिल्ह्याच्या विकासापेक्षा जिल्ह्यात मलिदा कोण खाणार याची स्पर्धा लागली आहे, लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार, लाडक्या बहिणीचे लाभार्थी कमी केले जात आहे, शेतकऱ्यांची कर्जमाफी कधी करणार याकडे सरकारचे लक्ष नाही, फक्त एकमेकांत वाद घालून महाराष्ट्राला खड्ड्यात घालण्याचे काम सरकार करत असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

# पंढरपूर प्रांताधिकारी कार्यालयातील दोन कर्मचारी लाच घेताना जाळ्यात

### प्रलंबित शेतजमिनीचा निकाल देण्यासाठी मागितली लाच

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जानेवारी-**

प्रलंबित असलेल्या शेतजमिनीचा निकाल देण्यासाठी ५५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पंढरपूर उपविभागीय कार्यालयातील महसूल सहाय्यक आणि शिपायाला रंगेहाथ पकडले. ही कारवाई सोमवारी संध्याकाळी उपविभागीय कार्यालयात करण्यात आली.



या याप्रकरणी महसूल सहाय्यक किशोर भगवान मोहिते आणि शिपाई नितीन शिवाजी मेटकरी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली. यातील तक्रारदाराच्या शेतजमिनी संदर्भात उपविभागीय अधिकारी कार्यालयात तक्रार दाखल होती. यावर तक्रारदाराच्या बाजूने निकाल देण्यासाठी किशोर मोहिते यांनी ६० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती ५५ हजार स्वीकारण्याचे मान्य केले होते. त्यानुसार सोमवारी संध्याकाळी प्रांताधिकारी कार्यालयामध्ये रोख ५५ हजार रुपये स्वीकारताना नितीन शिवाजी मेटकरीसह शिपायाला रंगेहाथ पकडले.

आठ दिवसांपासून लाचलुचपत विभागाचे अधिकाऱ्यांनी सापळा रचला होता. १३ ते १७ जानेवारी या कालावधीत आरोपी लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांना गुंगारा देत होते. अखेर सोमवारी सायंकाळी सहाच्या दरम्यान स्वतः च्या कार्यालयात लाच स्वीकारताना सापडले. या प्रकरणी पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# शरद पवार-उद्धव ठाकरे भेट; दीड तास चर्चा

**मुंबई, २० जानेवारी**

विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीत झालेल्या बिघाडीनंतर आघाडीचे मुख्य सूत्रधार असलेल्या शरद पवारांची भेट घेण्यासाठी उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे सोमवारी थेट सिल्व्हर ओक या पवारांच्या निवासस्थानी पोहोचले. या दोघांमध्ये तब्बल दीड तास चर्चा झाली.



विधानसभेच्या निकालाला दोन महिने उलटून गेल्यानंतरही एकत्र बैठक न झाल्याने मविआ पुढे टिकणार का, असा सवाल उपस्थित होत होता. दुसरीकडे, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याचा बॉम्ब टाकल्याने मविआत आलबेल नसल्याचे दिसून आले. अशातच आज शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यात बैठक पार पडली. शरद पवार, उद्धव ठाकरेंसह आदित्य ठाकरे, संजय राऊत, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आदी नेते या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत महाविकास आघाडीच्या पुढील रणनीती संदर्भात चर्चा झाल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, २२ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सुनावणी होत आहे. ही सुनावणी अखेरच्या टप्प्यात असून, लवकरच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यासंबंधीही या बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# महाआवास अभियानातील घरकुले शंभर दिवसांत पूर्ण करा

**ग्रामविकास प्रधान सचिव एकनाथ डवले यांचे आदेश**

**व्हिसीद्वारे सोलापूरसह विभागांच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजना या महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे पुणे विभागात २० लाख लाभार्थ्यांना घरकुले उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट शासनाने निर्धारित केले आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी ताळमेळ ठेवून महाआवास अभियानांतील घरकुले शंभर दिवसात पूर्ण करून लाभार्थ्यांना हस्तांतरीत करण्यात यावी, असे निर्देश ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी दिले.



महा आवास अभियान २०२४-२५ अंतर्गत पुणे विभागस्तरीय कार्यशाळा शुभारंभप्रसंगी आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण प्रकल्प डॉ. राजाराम दिघे, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सांगली जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती घोडमिसे, कोल्हापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एस.कार्तिकेयन, उपायुक्त (विकास) विजय मुळीक यावेळी उपस्थित होते. तर पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दायानिधी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद आणि सातारा निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

प्रधान सचिव डवले पुढे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना १०० दिवसाच्या कालावधीत अधिक गतिमान करण्यासाठी महाअवास अभियान राबविण्यात येत आहे. लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाची आणि विहित मुदतीत घरकुले उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करताना जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणांनी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सर्व त्रुटींची तातडीने पूर्तता करून आणि मानवीय दृष्टिकोनातून लाभार्थ्यांना घरकुले हस्तांतरित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करावे.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, घरकुलासंबंधी लाभार्थ्यांची नोंदणी करताना त्यांच्या वैयक्तिक नोंदी तसेच आधार क्रमांकाची नोंद यंत्रणांनी अचूकपणे करण्याची दक्षता घ्यावी. तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांशी यासाठी प्रत्यक्ष संवाद साधावा. जिल्हाधिकाऱ्यांनी घरकुल योजनांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी. त्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांचाही सहभाग घेण्यात यावा. घरकुलांची उभारणी झालेल्या ठिकाणी संवदेनशिलतेचा, कल्पकतेचा वापर करुन परिसर विकासावर भर द्यावा. बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना, पारधी आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना, मोदी आवास योजना, पीएम जनमन योजना आणि पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनांच्या अंमलबजावणीचा विभागस्तरीय आढावा घेण्यात आला. यावेळी महा आवास अभियान २०२४-२५ च्या माहिती पत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त



### रानमसले येथे शोषखड्डे निर्मितीतून सांडपाणी व्यवस्थापनावर जनजागृती

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराअंतर्गत चौथ्या दिवशी रानमसले, ता. उत्तर सोलापूर येथे शोषखड्डे निर्मिती उपक्रम ांतून स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन व आरोग्याविषयी जनजागृती अभियान राबविण्यात आले. लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षिरसागर, उपसरपंच रमेश सुतार, रानमसले गावातील ग्रामस्थांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपरिसरातील विविध ठिकाणी शोषखड्डे निर्मिती केली. यासाठी लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अंकिता पवार तसेच रानमसले ग्रामपंचायत सदस्य यांचे मोलाचे सहकार्य स्वयंसेवकांना लाभले. संध्याकाळच्या सत्रात रानमसले येथील ग्रामपंचायतीच्या मुख्य मंचावर गावातील लहान मुलांसाठी संगित खुर्चीचा मनोरंजनपर स्पर्धा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महिला बचत गटाच्या अध्यक्षा रोहिणी कुंभार ह्या लाभल्या होत्या. या स्पर्धेमध्ये विजयी स्पर्धकांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये उस्मान शेख, रिया शेख, श्रावणी लोहार यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तर समीक्षा वाघमारे, ईश्वरी वाघमारे, गायत्री गरड यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व रासेयो स्वयंसेवकांनी मोलाची भूमिका बजावली.



### एकता महिला मंचतर्फे हळदी-कुंकू कार्यक्रम

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

एकता महिला मंचच्या वतीने बार्शी येथे हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडला. यावेळी छाया नालकुल, सहहायक पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख, शहीद रामेश्वर काकडे यांच्या पत्नी रोहिणी काकडे उपस्थित होत्या. सदस्यांनी उखाणे घेत, सेल्फी पॉइंटजवळ एकमेकींना हळदी-कुंकू लावत, तीळगूळ देत हळदी-कुंकूचा कार्यक्रम पार पाडला. छाया जालिंदर नालकुल, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख, डॉ. शीतल बोपलकर, प्रभाकर क्षीरसागर, शालन दसवंत, वनिता जगझाप, लक्ष्मी सुतार, सुशीला सोनवणे, नूरजहाँ शेख, हेमा कावरे, उज्वला चव्हाण, सोनाली कोळी, मैना सोनवणे शितल काजळे महादेव माने कोमल वायकर, रत्नमाला कोळी, वनम ाला कोळी, कोकिळा जंगले, राजेश्री घोलप, आरती जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक शीतल सुरवसे यांनी केले.



### प्रमिला शिवगुंडेंना आदर्श ग्रंथपाल पुरस्कार

**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

नागणसूर येथील एच. जी. माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील ग्रंथपाल प्रमिला शिवगुंडे यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीतर्फे माजी आ. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते जिल्हास्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्राचार्य शंकर व्हनमाने, माजी प्राचार्य मडिवाळप्पा पोद्दार, नीलकंठ धानशेट्टी, शरणप्पा गोपगोंडा, प्रा. ईरण्णा धानशेट्टी, अनिल इंगळे, शरणप्पा मणुरे, चिदानंद मठपती, प्रशांत नागुरे, बसवराज कोळी, बसवराज धानशेट्टी, संजय गंगदे, विश्वनाथ वाघमोडे, सोमशेखर कळसगोंडा, अजय पाटील, भीमाशंकर सोलापूरे, नितीन धानशेट्टी, आकाश कोनापुरे, शिक्षकेतर कर्मचारी थावरू चव्हाण, विश्वनाथ तलवार, सागर पोद्दार, माणिक किणगी, गारवा हॉटेलचे मालक प्रवीण विभुते, तसेच सौ.प्रमिला शिवगुंडेचे पती लक्ष्मीकांत शिवगुंडे, मुले , कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, शिवगुंडे सर आदीजण उपस्थित होते.

# ग्रंथदिंडीत मराठी संस्कृतीचे दर्शन

**विविध शाळांमधील ४०० विद्यार्थ्यांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उद्घाटनानिमि त्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीने माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा, हिच्या संगे जागतील, मायदेशांतील शिळा मराठी भाषेचा वारसा पुढे नेऊया हा संदेश दिला. ढोल-ताशाच्या गजरात मराठमोळ्या वेशभूषेत मराठी संस्कृतीचे दर्शन याद्वारे घडविण्यात आले.

आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर म हापालिकेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरिय शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महापालिका पत्रकार संघ यांच्या सहकार्याने दि. २० जानेवारी ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. या पंधरवड्याच्या उदघाटनापूर्वीसोलापूर महानगरपालिकेपासून ते डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक पर्यंत ग्रंथ दिंडी उत्साहात काढण्यात आली.



प्रारंभी महपालिकेत ग्रंथ पूजन करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या ग्रंथ दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. या पालखीतमध्ये भारतीय संविधान, ज्ञानेश्वरी, भगवद्ग गीता आदी ग्रंथ ठेवण्यात आले होते. सुरुवातीला अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी खांद्यावर ही ग्रंथपालखी घेतली. याप्रसंगी उपायुक्त तैमूर मुलानी, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर रचना सहसंचालक मनीष भिष्णूरकर, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी, मसाप जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, कामगार कल्याण जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलनकर, महापालिका शाळा पर्यवेक्षक संतोष बुलबुले आदींसह अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.त्यानंतर ही ग्रंथ दिंडी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुढे मार्गस्थ झाली. त्यानंतर डफरीन चौक मार्गे रेल्वे स्टेशन येथे महात्मा गांधी आणि पुढे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक येथे या ग्रंथ दिंडीचा समारोप झाला. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ही ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथदिंडीमध्ये हरिभाई देवकरण प्रशाला, ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, सेवासदन प्रशाला आदी शाळांचे सुमारे ४०० विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या दिंडीमध्ये पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने, गणेश नेवरे, महारुद्र कत्ते, शिक्षिका प्रवीणा जोशी, तृप्ती कंगळे, अक्षता केळेकर, जयश्री पवार, वर्धा माळगे, प्रियांका लाड सहभागी झाले होते.

# 'मनरेगा'तून जिल्ह्यातील ११ हजार ६४९ जणांना रोजगार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेअंतर्गत, ग्रामीण भागातील कुटुंबांना रोजगाराची हमी दिली जाते. या योजनेचा उद्देश गरिबांना काम मिळवून देणे आणि त्यांच्या कुटुंबांना जीवनावश्यक वस्तू पुरवणे हा आहे. या योजनेतून जिल्ह्यातील ४०५ ग्रामपंचायतीतून ११ हजार ६४९ जणांना रोजगार मिळाला आहे.

या योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना अकुशल रोजगार पुरविला जातो, या योजनेत लाभार्थ्यांना आर्थिक वर्षात किमान १०० दिवसांचा रोजगार मिळतो, या योजनेत, रोजगाराचे मुख्य स्त्रोत रस्ते बांधणी, जलसंधारण, वनीकरण असे आहेत. दरम्यान, लाभार्थ्यांच्या बँक खात्यात त्यांची मजुरी जमा होते. इतकेच कायतर या योजनेसाठी जॉब कार्ड बनविण्यात आली आहेत. याचा फायदा सामान्य नागरिकांना होत आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यातील १०३६ गावांपैकी ४०५ ग्रामपंचायतींना ही योजना सध्या राबविण्यात येत आहे. या योजनेतून विविध प्रकारची १५५६ कामे सध्या सुरु आहेत. या योजनेद्वारे जिल्ह्यातील ११ हजार ६४९ जणांना रोजगार मिळाला असून, यातून जिल्हा परिषद बांधकाम, कृषी विभाग, सा. बां. विभाग, वन विभाग, ग्रामपंचायत स्तर, लघु पाटबंधारे विभाग, वन विभागासह इतर काही कामे करण्यात येत आहेत. इतकेच नाहीतर घरकुल, वैयक्तिक विहीर, कुक्कुट पालन शेड, जलतारा, शोषखड्डा, रस्ते, शेततळे अशीही कामे करण्यात येतात. एकंदरीत, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना याचा मुख्य उद्देश देशातील गरीबांना रोजगार हक्काची हमी देणे आहे. तसेच संपूर्ण देशातील ग्राम ीण कुटुंबांना वित्तीय वर्षात शंभर दिवस प्रति कुटुंब कुशल रोजगार प्राप्त करून देणे हा आहे.

# प्राध्यापकांनी कौशल्ययुक्त शिक्षणासाठी पुढाकार घ्यावा : प्र. कुलगुरु दामा

**▸ महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकॅडमीच्या प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराचे कौशल्य विकसित व्हावे हा महत्वाचा उद्देश आहे. त्यामुळे महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमीच्या प्रशिक्षण शिबीरास असलेल्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना कौशल्ययुक्त शिक्षण देण्यासाठी पुढाकार घ्यावा. असे प्रतिपादन प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या कौशल्य विकास केंद्र आणि महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजीत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील १४ जिल्ह्यातुन ४० प्राध्यापक उपस्थित राहिले आहे. या प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा बोलत होत. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमीच्या इन्क्लुजन अँड डायव्हरसिटी केंद्राचे प्रमुख मिथिलेश भाकरे, विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, सह समन्वयक डॉ. श्रीराम राऊत, डॉ. रिंकेश छेडा, डॉ. अभिजित जगताप उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन उद्घाटन करण्यात आले. प्रस्ताविक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. यावेळी मिथिलेश भाकरे, रिंकेश छेडा, डॉ. अभिजित जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन डॉ. तेजस्विनी कांबळे आणि तारीक तांबोळी यांनी केले. आभार डॉ. श्रीराम राऊत यांनी मानले.

# श्रीशैल हत्तुरेंना बसवरत्न पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा समाजसेवक श्रीशैल हत्तुरे यांना उमरगा येथे श्रीशैल पिठाचे जगद्गुरु पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आला.




उमरगा येथे लिंगायत समाज धाराशिव व बसवरत्न बहुउद्देशीय सामाजिक संस्था उमरगा यांच्या वतीने बसवरत्नगौरव पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी श्रीशैल पीठाचे श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री बसवराज पाटील होते. यावेळी पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा बँकेचे चेअरमन बापूराव पाटील, आळंद मठाधिपती सिद्धेश्वर शिवलिंग शिवाचार्य महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार प्रवीण स्वामी, बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा समाजसेवक श्रीशैल हत्तुरे, नाशिकचे मुख्य अभियंता प्रशांत आवटी, धाराशिवचे धर्मादाय सह आयुक्त रूपाली कोरे, अमोल बिराजदार, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, सिद्धेश्वर बँकेचे संचालक राजेंद्र मुंडे, मुंबईचे अकाउंटंट लहू गोडगावे, द रिंगण लाईव्हचे संपादक राजू पाटील, मूर्तिकार शरण बसप्पा अलोळी, प्रा. मनमत पंचाक्षरी, अक्षय ढोबळे, बसव व्याख्याते राजशेकर सोलापूर, किरण कोरे, उद्योजक शिवानंद सोळशे, पवन स्वामी लातूर बसवराज दळगडे, प्रगतिशील शेतकरी श्याम सोनटक्के, धनराज धुमा व कै. डॉ. आनंद मुदकना तसेच शहरातील निसर्गप्रेमी ग्रुप यांच्यासह राज्यातील विविध क्षेत्रातील २२ समाज बांधवांचा श्रीशैल पिठाचे जगद्गुरु पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आला. समाजात चांगले कार्य करणारे अनेक रत्न असून त्याचा गौरव व्हावा, असे श्रीशैल जगद्गुरुंनी सांगितले.

## निधन वार्ता

### शशिकला शहा



**पंढरपूर,दि.२० जानेवारी -**

येथील नवीपेठेतील वह्या पुस्तकांचे मोठे व्यापारी श्रीमती शशिकला शांतीलाल शहा (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले ,मुली सुना, जावई , नातवंडे असा मोठा परिवार आहे. संजय व राजेश शहा यांच्या त्या मातोश्री होत.

### नागनाथ सदावर्ते



**करकंब, दि.२० जानेवारी -**

करकंब येथील नागनाथ सदाशिव सदावर्ते (वय ७२) यांचे सोमवारी सायंकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते पाटबंधारे खात्यातून निवृत्त झाले होते. करकंब येथील साई फोटो स्टुडिओचे चालक रुपेश सदावर्ते व पाटबंधारे खात्यातील कर्मचारी महेश सदावर्ते यांचे ते वडील होत.

### गुरुसिद्धप्पा गुंगे



**सोलापूर, दि.२० जानेवारी -**

गुरुसिद्धप्पा (आबासाहेब) गुंगे यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नात, नातू असा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेस समाजातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

**सुशील वाल्मीक कराड व त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध खासगी फिर्याद प्रकरण**

# एमआयडीसी पोलिसांकडून न्यायालयात अहवाल सादर

**पीडित महिलेकडून न्यायालयात विविध पुरावे सादर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

बीड येथील सुशिल वाल्मिक कराड व त्याच्या साथीदारांविरुध्द सोलापूरच्या न्यायालयात दाखल असलेल्या खासगी फिर्याद प्रकरणी जिल्हा न्यायाधीश जे जे मोहिते यांच्यासमोर सुनावणी सुरु असून सोम वारी न्यायालयात एमआयडीसी पोलिसांनी त्यांचा अहवाल सादर केला. तर पिडीत महिलेच्यावतीने न्यायालयात सुशील कराड विरोधातील पुरावे सादर करण्यात आले. याप्रकरणाची पुढील सुनावणी मंगळवारी होणार आहे.

सोलापूर येथील महिला व तिचा पती व तिचे दोन मुले हे परळी येथे राहण्यास होते. परळी येथे राहत असताना तिचा पती हा सुशील वाल्मीक कराड यांच्या ट्रेडर्स मध्ये कामास होता. सुशील कराड हा तिच्या पतीस तू दोन बल्कर ट्रक, दोन कार व जागा कसे काय कमावला म्हणून मारहाण करून रिवाल्वर चा धाक दाखवून तिच्या पतीकडून दोन बल्कर ट्रक, दोन कार, दोन दुचाकी हे स्वतःच्या ऑफिसला मागवून घेऊन त्याच्या चाव्या व कागदपत्रे स्वतःकडे ठेऊन घेतले व पीडीतेच्या नावे असलेला प्लॉट हा अनिल मुंडे यांच्या नावावर करून बळजबरीने घरातून उचलून नेऊन कोणतेही पैसे न देता खरेदी केला, तसेच तिचे लहान मुलीस मारहाण केली, तसेच तिच्या पतीचे अडीच तोळ्यांचे सोने हे परळी येथील बालाजी टाक ज्वेलर्सला बळजबरीने विकायला लावले व त्याचे आलेले पैसे सुशिल कराड याने घेतले, जीविताच्या भीतीपोटी सोलापूरला आल्यावर देखील गोपी गंजेवार हा इतर साथीदारा समवेत पीडितेच्या सोलापूर येथील घरी येऊन तिस धमकी देऊन शिवीगाळ केली. यातील आरोपी सुशील कराड याने पीडिता परळीत राहत असलेल्या घरमालकाचे मोबाईल वरून पिडीतेस अश्लील भाषेत शिवीगाळ केली, अशा आशयाची तक्रार वजा सविस्तर फिर्याद पीडित महिलेने सोलापूरातील एम आयडीसी पोलीस ठाणे, सोलापूरचे पोलिस आयुक्त, बीडचे पोलिस अधिक्षक यांच्याकडे दिली होती. परंतु, त्या महिलेच्या तक्रारी अर्जाची दखल घेतली कोणीही घेतली नाही म्हणून त्या महिलेने सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात खासगी फिर्याद वजा तक्रार दाखल केली. त्याची सुनावणी सुरु असून न्यायालयाने याप्रकरणी एम आयडीसी पोलिसांना अहवाल देण्याचे आदेश दिले होते.



सोमवारी याप्रकरणाच्या सुनावणीवेळी एमआयडीसी पोलिसांनी त्यांचा अहवाल जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांच्यासमोर सादर केला. त्यानंतर पिडितेचे वकील यांनी त्यांच्या युक्तिवादात पीडितेने दाखल केलेले तक्रारी अर्ज, तसेच अर्जासोबत दिलेली कागदपत्रे, त्यामध्ये गाड्यांची कर्ज प्रकरणाचे खाते उतारे व गाड्यांचे जी पी एस लोकेशन, पीडितेच्या पतीस मारहाण करून झालेल्या जखमांचे फोटो, आरोपी सुशील कराड याने फोनवरून शिवीगाळ केल्याचे फोन रेकॉर्डिंगचे पेन ड्राईव्ह, पोस्टाने पाठविलेले अर्ज व त्याच्या पावत्या तसेच पीडितेच्या लहान मुलीस मारहाण केली असल्याने पोस्को अंतर्गत गुन्हा दिसून येतो अशा सर्व बाबींचे कथन करून गुन्हा हा परळी ते सोलापूर असा सलग रीतीने घडलेला असल्यामुळे आरोपींविरुद्ध एम आय डी सी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करून तपास करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात यावेत असा युक्तीवाद मांडला. तर हा सर्व प्रकार परळी, बीड येथे घडल्याने एमआयडीसी पोलिसांना या घटनेचा तपास करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे फिर्यादी महिलेचा तक्रारी अर्ज निकाली काढण्याचा अहवाल पोलिसांनी न्यायालयात दाखल केला. यात सुशील कराडतर्फे वकीलांनी लेखी म्हणणे दाखल केले असून त्यामध्ये बीड पोलिसांनी केलेल्या तपासाची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. याची पुढील सुनावणी मंगळवारी होणार आहे. याप्रकरणी पीडिते तर्फे ॲड.विनोद सूर्यवंशी, ॲड. श्रीकांत पवार, ॲड. मधुकर व्हनमाने तर सुशील कराड याच्यावतीने ॲड. संतोष न्हावकर, ॲड, राहुल रूपनर, ॲड. शैलेश पोटफोडे हे काम पहात आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### प्रज्योत अचलेर यांना यंग प्रिमिसिंग पुरस्कार

**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

प्रामाणिकपणा व अथक परिश्रम ही उज्ज्वल यशाची गुरुकिल्ली आहे. या माध्यमातूनच जीवनात मोठे यश प्राप्त करता येते. हेच प्रज्योत अचलेर यांनी दाखवून दिले. प्रज्योत हा कै. कल्याणराव उर्फ बाळासाहेब इंगळे तंत्रनिकेतनचा विद्यार्थी आहे. ही गौरवाची बाब असल्याचे प्रतिपादन वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे यांनी केले. जगप्रसिद्ध रिलायन्स कंपनीत सिव्हील विभागात कार्यरत असलेले अक्कलकोटचे सुपुत्र प्रज्योत अचलेर असिस्टट मॅनेंजर यांना रिलायन्स कंपनीत संपतराव इपीसी सिव्हील विभाग मुख्यायल येथून पश्चिम महाराष्ट्र यंग प्रिमिसिंग आवार्ड पुरस्कार लाभल्याबद्दल नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी महेश इंगळे बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, संजय पवार, चित्तरंजन अगरथडे उपस्थित होते.




### रुद्देवाडी आश्रमशाळेला पुरस्कार प्रदान

**अक्कलकोट दि. २० जानेवारी**

तालुक्यातील रुद्देवाडी येथील गीतांजली शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेला यंदाचा मानाचा जिल्हास्तरीय कृतीशिल शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे. सिंहगड इन्स्टिटयूट, सोलापूर येथे पार पडलेल्या कृतीशील पुरस्कार सोहळा दरम्यान महाराष्ट्र राज्य कृती समितीचे संस्थापक व माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्राचार्या बेबीताई करवीर यांना गौरवण्यात आले. यावेळी रुद्देवाडी येथील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी प्राचार्य बेबीताई करवीर यांनी या सोहळ्याप्रसंगी रुद्देवाडी येथील आश्रम शाळेला कृतीशील शाळा पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, समितीचे जिल्हा अध्यक्ष गुरुनाथ वांगीकर व समन्वयक परमेश्वर होसूरे यांचे आभार मानले. या पुरस्काराबद्दल संस्थापक अध्यक्ष आण्णाराव करवीर, प्राचार्या, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व समस्त शिक्षक बांधवांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.



### कापसे फाउंडेशनकडून पत्रकार राजेश जगताप यांचा सन्मान

**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

लायन्स क्लब इंटरनॅशनलचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजेद्र कापसे संस्थापक अध्यक्ष कापसे फाउंडेशनचे कार्य कौतुकस्पद असल्याचे गौरवोद्‌गार शेखनूर बाबा दर्गाहचे पुजारी अहमदपाशा पिरजादे यांनी काढले. राज्यस्तरीय बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार अक्कलकोट येथील जुने नामवंत पत्रकार राजेश जगताप यांना मिळाल्या बद्दल व पत्रकार योगश कबाडे यांचा कापसे फाउंडेशनच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी पूज्य श्री शेख नुरदीन बाबा दर्ग्याचे सज्यादे अहमदपाशा पिरजादे, प्रा. सूर्यकांत कडबगावकर, उद्योगपती शिवशरण खुबा, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार जगदाळे, स्वामीराव गायकवाड, रमेश भंडारी, शिवा याळवर, कवी होटकर उपस्थित होते.




### शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मोडनिंब येथे धनुर्विद्या स्पर्धा

**मोडनिंब, दि. २० जानेवारी-**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मोडनिंब येथे धनुर्विद्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शिव आरोग्य सेनेचे सोलापूर जिल्हा समन्वयक दीपक सुर्वे यांनी या स्पर्धांचे आयोजन केले. जिल्हाभरातून जवळपास सत्तर स्पर्धकांनी यात सहभाग नोंदविला. संगनबसवेश्वर शिवयोगी कन्या प्रशालेच्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धांचे उद्घाटन शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड, भारत शिदे, मधूकर देशमुख, दीपक सुर्वे, धन्यकुमार चोपडे, गोसपाक आतार, सतीश क्षीरसागर, माणिक श्रीरामे, प्रकाश कोळी, शिवाजी माळी, सावता इंगळे, लक्ष्मीकांत खंदारे, लक्ष्मीकांत नवले, विजय पवार, आनिल शिदे, दीपक गिड्डे, गणेश कुभांर, सतोष शिंदे, पांडुरंग राऊत, प्रभाकर नलवडे, आदी उपस्थित होते. सर्व गटातील प्रथम तीन स्पर्धकास पदकाने गौरविण्यात आले.

# कारंजा सुरु करण्यासाठी स्वच्छता मोहीम

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ माधव प्रभात शाखा, निसर्ग सेवा फाऊंडेशन, पर्यावरण संरक्षण गतिविधीच्या सदस्यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२० जानेवारी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ माधव प्रभात शाखा, निसर्ग सेवा फाऊंडेशन आणि पर्यावरण संरक्षण गतिविधीच्या सदस्यांच्या वतीने अक्कलकोट शहरातील गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेल्या सौंदर्यात भर टाकणारे श्रीमंत कमलाराजे चौकातील आयलँड (कारंजा) सुरु करण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम राबवून एक पाऊल पुढे टाकले आहे.




अक्कलकोट शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे आणि स्वामी भक्तांची संख्या देखील मागील तीन वर्षापासून प्रचंड वाढलेली आहे. शहराच्या सौंदर्यात भर टाकणारे कमलाराजे चौकातील आयलँड (कारंजा) तसेच अक्कलकोट बस स्थानकाजवळील दुसरे आयलँड हे गेल्या अनेक वर्षांपासून देखभाल अभावी बंद आहेत. पाणीटंचाई हे त्यातले एक महत्वाचे कारण होते. पण यावर्षी पावसाळा चांगला झालेला असल्याने आणि पाणीपुरवठा ही सुरळीत आहे.

हे दोन्ही आयलँड पुन्हा सुरू झाल्यास अक्कलकोटच्या सौंदर्यात आणि वैभवात भर पडणार आहे. अनेक सामाजिक संस्थांच्या सूचनांचा विचार करून नगर पालिकाचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी हे दोन्ही आयलँड (कारंजा) सुरु करण्यासाठी सकारात्मकता दर्शवली. त्या अनुषंगाने हे दोन्ही आयलँड सुरुवातीस स्वच्छ करून घेण्याचा निर्णय झाला.

त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ माधव प्रभात शाखा, निसर्ग सेवा फाऊंडेशन आणि पर्यावरण संरक्षण गतिविधीच्या सदस्यांच्या वतीने स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन नगरपरिषदेच्या सहकार्याने त्यातील एक आयलँड स्वच्छ करण्यात आला. येत्या काही दिवसात त्यातील अडचणी दूर करून हा कारंजा सुरु करण्याचा मनोदय डाके यांनी व्यक्त करून सदर उपक्रमाबद्दल सामाजिक संस्थांचे आभार मानले. त्या सर्व सदस्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

#### अधिकाऱ्यांसह नागरिकांचा सहभाग

नगरपरिषद आरोग्य विभागाचे सहकार्य लाभले. या स्वच्छता मोहिमेसाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, स्वच्छता कर्मचारी तसेच निसर्ग सेवा फाऊंडेशनचे सुनिल बिराजदार, विद्याधर गुरव, महेश वागदरे, रुद्राक्ष वैरागकर, प्रमोद लोकापुरे, धुळपा बजे, संतोष वगाले, विशाल पसारे, प्रसाद हारकूड, विजू आळविकर, सायबण्णा सोनकांबळे, संदीप कटकधोड, महेश लंगोटे, शिवाजी चौगुले, गुंडू येळमेली, सुशील हिरस्कर, अंबण्णा यारोळे, सुरेश पाटील आदींनी परीश्रम घेतले. यात अधिकाऱ्यांसह नागरिकांनी सहभाग घेतला.

## आम्ही आश्वासन देत नाही, शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करतो : आ. शिंदे

**विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या दोन्ही युनिटचे मिळून १० लाख मे. टन गाळप पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २० जानेवारी-**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब कारखान्याचे १ ते १० जानेवारी अखेर प्रति टन २८०० प्रमाणे ऊस बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे.



आम्ही आश्वासन देत नाही, थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करतो, असे कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. बबनराव शिंदे यांनी सांगितले.

आ. शिंदे म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं. २ करकंब येथील सन २०२४-२५ चा गाळप हंगाम सुरू आहे. या हंगामात युनिट नं. १ कडे प्रतिदिन १४००० ते १४५०० व युनिट नं. २ कडे ४५०० ते ५००० मे.टन गाळप होत आहे. युनिट नं. १ येथे आजअखेर ७ लाख ४६ हजार ९०० मे.टन ऊस गाळप झाले आहे. युनिट नं. २ येथे आजअखेर २ लाख ५३ हजार ६२२ मे.टन ऊसाचे गाळप झालेले आहे. दोन्ही युनिटचे मिळून आजअखेर १० लाख ५२२ मे.टन ऊसाचे गाळप झालेले आहे. या गळीत हंगामामध्ये युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं. २ करकंब कडे १ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीत गाळपास आलेल्या पाचव्या १० दिवसाचे ऊसास प्रति टन २८०० प्रमाणे पेमेंट शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. दहा दिवसाला व वेळेत पेमेंट देणारा विठ्ठलराव शिंदे जिल्ह्यातील एकमेव कारखाना आहे. या ऊस बिलापोटी कारखान्याने ५१ कोटी ७३ लाख बँकेत जमा केले आहेत. या गाळप हंगामात आजअखेर कारखान्याने ऊस बिलापोटी २३५ कोटी ३३ लाख अदा केलेले आहेत. सदरप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे, कार्यकारी संचालक, जनरल मॅनेजर व इतर अधिकारी उपस्थित होते.

## सर्व घटकांवर पत्रकारांचा अंकुश हवा

**आ. अभिजित पाटील; पंढरपूर श्रमिक पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जानेवारी-**

पत्रकारांनी आपल्या लेखणीतून दाखवाव्यात, समाजाच्या हितासाठी पत्रकारांनी अंकुश घेऊन उभा राहिले पाहिजे. सर्व घटकांवर त्यांचा अंकुश हवा, असे प्रतिपादन माढा विधानसभेचे आमदार अभिजित पाटील यांनी केले.

श्रमिक पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार पत्रकार भवन येथे आ. अभिजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ धवळे होते. यावेळी पत्रकार संघाच्यावतीने आ. अभिजित पाटील यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुरेश गायकवाड, कार्याध्यक्ष गणेश गायकवाड, उपाध्यक्ष महालिंग दुधाळे, घनश्याम शिंदे, सचिव सतीश बागल, आदींसह नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान आ. अभिजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मनसेचे नेते शशिकांत पाटील, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बागल, सुधाकर कवडे, पत्रकार शिवाजी शिंदे, नवनाथ पोरे, मोहन डावरे, समाधान गायकवाड, मोहन कोळी, शहाजी काळे, सचिन शिंदे, बजरंग नागणे, सावता जाधव, बालाजी फुगारे, राजाभाऊ मिसाळ, संतोष रणदिवे आदींसह पत्रकार उपस्थित होते. सूत्रसंचालन समाधान काळे यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन पत्रकार सुधाकर कवडे यांनी केले.

#### पाच कामे पूर्ण करण्याचा संकल्प



आ. अभिजित पाटील यांनी पुढील पाच वर्षात आपण महत्वाची पाच कामे पूर्ण करण्याचा संकल्प सोडला आहे. त्यामध्ये पहिले काम उजनी धरणावर पर्यटन केंद्र करायचे आहे. दुसरे स्वप्न माढा शहराचा पाणी प्रश्न सोडवणे हे आहे. माढा शहराला कधीही पाणी कमी पडणार नाही यासाठी प्रयत्न करणार आहे. तिसरे स्वप्न मेंढापुर येथे दोन हजार एकरावर औद्योगिक वसाहत उभा राहावी, त्यामध्ये मोठे उद्योग यावेत हे असून चौथे स्वप्न करकंब, मोडनिंब, टेंभुर्णी या शहरात नगर पंचायती करणे हे आहे. आणि पाचवे स्वप्न सीना माढा सिंचन योजनेचा विस्तार करणे, नवीन योजनेस सूप्रमा मिळवणे, मानेगाव उपसा सिंचन योजना राबवणे, सीना - माढा उपसा सिंचन योजनेतील सर्व पंप नवीन टाकणे आणि सौर ऊर्जेवर चालवणे हे आहे.

## बार्शीत चोरट्यांचा धुमाकूळ

**पोलीस ठाण्याजवळील तीन दुकाने फोडली**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

बार्शी शहरात चोरट्यांचा धुमाकूळ सुरु असून, गेल्या काही दिवसांत चैन स्नॅचिंग, मोटारसायकल चोरी, भरदिवसा घरफोडी यांसारख्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. दि २० रोजी शहर पोलीस ठाणेच्या नजीक शिवाजी आखाडा येथे चोरट्यांनी दोन दुकाने तर लातूर रोड येथे एक दुकान फोडल्याचे समोर आले. या घटनांमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बालवाडे इलेक्ट्रॉनिक्स या दुकानात घडली, तिथे ३५०० रुपये रोख आणि एक चांदीचे नाणे चोरीला गेले. दुसरी घटनेत विश्वनाथ मेडिसीन स्टोअरमध्ये ६००० रुपये रोख रक्कमसह सीसीटीव्हीचा डिव्हीआर चोरुन नेला तर आनंद ट्रेडर्स या दुकानातील सीसीटीव्हीचा डिव्हीआर चोरुन नेल्याचा प्रकार घडला. याबाबत सौरभ बालवाडे यांनी शहर पोलीस ठाणे फिर्याद दिली आहे. हा प्रकार पोलीस स्टेशनच्या नजीक घडला असल्याने एक प्रकारे चोरट्यांचे मनोबल वाढले असल्याचे दिसून येत आहे

शहरातील बहुतांश चोऱ्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाल्या असूनही पोलीस चोरट्यांपर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून बार्शी शहरात चोऱ्या आणि अन्य गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाली आहे. पोलिसांनी चोरट्यांचा शोध लावण्यात अपयश मिळवल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. नागरिकांकडून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर टीका होत असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करणे गरजेचे आहे.

## सांगोला विद्यामंदिरतर्फे तानाजी किरगत यांना मदत

**तभा वृत्तसेवा, दिपक भाकरे,**
**सांगोला,दि.२० जानेवारी-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील एसएससी बॅच-१९९८ मधील मित्रमंडळींकडून सांगोल्यातील तानाजी किरगत यांच्या किडनीच्या उपचारासाठी रोख रुपये २३ हजार २२८ इतकी मदत करण्यात आली.

सांगोल्यातील किराणा दुकानदार तानाजी किरगत यांच्या दोन्ही किडन्या अकार्यक्षम झाल्या असून त्यांच्या पत्नी अश्विनी किरगत यांची किडनी त्यांना ट्रान्सप्लांट करण्यात येणार आहे. सदर शस्त्रक्रिया सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, डेक्कन जिमखाना, पुणे या ठिकाणी नियोजित असून अपेक्षित खर्च रुपये ७ लाख ५० हजार इतका आहे. किरगत कुटुंबीयांची ही अडचण समजल्यानंतर सांगोला विद्यामंदिर प्रशालेतून १९९८ साली एसएससी परीक्षा उत्तीर्ण होत बाहेर पडलेले सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी एकत्रित येऊन त्यांना एक हात मदतीचा देण्याचे ठरवले, यातूनच ग्रुप सदस्यांनी पुढाकार घेत ग्रुपमधील प्रत्येकाला आवाहन करत अल्पशः कालावधीत रुपये २३ हजार २२८ इतकी रक्कम जमा केली व किरगत कुटुंबीयांकडे सुपूर्द केली.



#### अडचणीतील पती-पत्नीला आर्थिक मदत करण्याचे आवाहन

२६ वर्षानंतर एकत्रित आलेल्या मित्रमंडळींनी विद्यामंदिरमध्ये झालेल्या संस्कारातून अडचणीत आलेल्या पती-पत्नीला मदतीचा हात देण्यात खारीचा वाटा उचलता याबद्दल समाधान व्यक्त केले. किरगत कुटुंबीयांनी ग्रुप मधील सर्व सदस्यांचे आभार मानत इतर दानशूर व्यक्तींनी सुद्धा मदत करावयाची इच्छा असल्यास अश्विनी किरगत यांच्या ९६०४९६९५०५ या फोन पे क्रमांकावर आपली मदत पाठवून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# बार्शीत खासगी प्राथमिक शाळेच्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात

## थाटात बक्षिस वितरण; बार्शी नगरपरिषद शिक्षण मंडळातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

न. पा. शिक्षण मंडळ बार्शीच्यावतीने आयोजित बार्शी शहरातील खासगी प्राथमिक शाळांच्या क्रीडा स्पर्धा दि. १६ ते १८ जानेवारी या तीन दिवसांच्या कालावधीत संपन्न होऊन बक्षीस वितरण कार्यक्रम सिल्व्हर ज्युबिली प्राथमिक शाळा येथे उत्साहात संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी बार्शी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके, प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, प्रा. अनिल कांबळे, बीपीएड कॉलेज, प्रमुख उपस्थिती म्हणून पर्यवेक्षक सुरेश शिंदे, सिल्व्हर ज्युबिली प्राथमिकच्या मुख्याध्यापिका जयश्री रणखांबे मॅडम, सरस्वती प्राथमिकच्या रेणुका धुळम मॅडम व पत्रकार संजय बारबोले उपस्थित होते.

क्रीडा स्पर्धा न.पा. शि.मं.बार्शीचे प्र. अ. अनिल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक सुरेश शिंदे यांच्या नियोजनात संपन्न झाल्या. सदर क्रीडा स्पर्धा सांघिक व वैयक्तिक या दोन्ही प्रकारात घेण्यात आल्या. लहान गट (पहिली ते चौथी ) व मोठा गट (पाचवी ते सातवी) असे गट करण्यात आले होते.

सांघिक स्पर्धा- लंगडी, कबड्डी व वैयक्तिक स्पर्धा- ५० मी. धावणे, १०० मी. धावणे, तीन पायांची शर्यत, लिंबू चमचा अशा प्रकारे घेण्यात आल्या. स्पर्धा निकोप व व्यवस्थित पार पाडण्यासाठी पंच म्हणून समीर वायकुळे, माळी, गाढवे, कोळी हे क्रीडाशिक्षक व बीपीएड कॉलेजचे विद्यार्थी यांनी काम पाहिले. स्पर्धेसाठी नवीन मराठी शाळा, सुलाखे हायस्कुल, सुलाखे इंग्लिश मीडियम स्कूल, प्राथमिक विद्यामंदिर या शाळेच्या मुख्याध्यापकांनी मैदान उपलब्ध करुन दिले व शाळेतील शिक्षकांच्या मदतीने स्पर्धा पार पाडण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले.

५० मीटर धावणे मुले (लहान गट)- विराज गणेश दुगाने-प्रथम (सरस्वती प्राथ), अल्फाज शहिद शेख- द्वितीय (प्राथ. वि.मं.), जुनेद बाबा शेख- तृतीय (सोजर प्राथ.). ५०मीटर धावणे मुली (लहान गट)- कु.सावली संतोष गपाट-प्रथम (जिजामाता), कु.समीक्षा सागर कोळेकर- द्वितीय (शिशु संस्कार केंद्र), कु.आनंदी सुनील बंडगर-तृतीय (अभिनव प्राथमिक). संगीत खुर्ची लहान गट मुली- कु.प्रार्थना गजानन घाडगे-प्रथम (मराठी विद्यामंदिर), कु.प्रणिता सुस्मित बागल-द्वितीय (नवीन मराठी शाळा), कु.सानवी गणेश चौधरी- तृतीय (सिल्व्हर ज्युबिली प्राथ.). लिंबू चमचा मुली लहान गट- ईश्वरी अभिजीत म्हेत्रे- प्रथम ( जिजामाता प्राथ.), कु. उन्नती योगेश खंडेलवाल- द्वितीय ( सिल्व्हर ज्युबिली प्राथ.), कु.नंदिनी भैरू मोरे-तृतीय (दत्त प्राथ.). तीन पायांची शर्यत- मुले- लहान गट- आरव दत्तात्रय सांगावे, रामेश्वर रवी चिंचकर- (सिल्व्हर प्राथ.), राज अमोल तिकटे, शिवराज मनोज साठे- द्वितीय (प्राथमिक वि.मं.), विनम्र राहुल शिराळ, आर्यन नितीन भंडगे- तृतीय (सिल्व्हर प्राथ.). १०० मीटर धावणे- मुले-मोठा गट- तेजस शरद बगले- प्रथम (नवीन मराठी शाळा), पठाण रामा वाघमोडे- द्वितीय (दत्त प्राथ.), ओम नाना जाधव- तृतीय (संतोष गुळमीरे प्राथ.). १०० मीटर धावणे-मुली- मोठा गट- कु.रिदा एजाज शेख - प्रथम (नवीन मराठी शाळा), कु.सई किशोर भोसले- द्वितीय (जिजामाता विद्यामंदिर), कु.अंकिता अनिल जाधव -तृतीय (बालाजी प्राथ. शाळा). संगीत खुर्ची- मुली- मोठा गट- कु.प्रिया विक्रम हांडे- प्रथम (जिजामाता विद्यामंदिर), कु.श्रेया प्रकाश काळे- द्वितीय (जिजामाता विद्यामंदिर), कु.श्रावणी प्रकाश हिरापुरे - तृतीय (नवीन मराठी). लिंबू चमचा- मोठा गट- मुली- कु.जोहा मुजाहिद मुल्ला- प्रथम(अभिनव प्राथ.),

कु.गायत्री अनिल चव्हाण- द्वितीय (नवीन मराठी शाळा), कु.वृषाली वसंत बाबर- तृतीय (जिजामाता विद्यामंदिर). तीन पायाची शर्यत- मुले- मोठा गट- सोहम अमोल नाळे, हर्षल सोनल नाळे -प्रथम (महात्मा फुले प्राथमिक विद्यामंदिर), समर्थ राहुल भालके, स्वराज किरण घावटे-द्वितीय (महात्मा फुले प्राथमिक विद्यामंदिर ), रोहित शहाजी कांबळे, राज सचिन हराळे-तृतीय (संत ज्ञानेश्वर प्राथ.). महिला शिक्षिका- संगीत खुर्ची स्पर्धा- सौ.योगीता चंद्रकांत बेळे- प्रथम, सौ.रंजना दीपक आंधळकर- द्वितीय, सौ. कल्पना सुधीर खाडे- तृतीय.



#### सांघिक स्पर्धेतील विजेते

सांघिक स्पर्धेच्या लहान गट-कबड्डी- प्राथमिक विद्यामंदिर, बार्शी- विजेता, दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी- उपविजेता. मोठा गट- कबड्डी-नवीन मराठी शाळा बार्शी- विजेता, महात्मा फुले विद्यामंदिर बार्शी- उपविजेता. लहान गट- लंगडी- प्राथमिक विद्यामंदिर बार्शी- विजेता, नवीन मराठी शाळा बार्शी-उपविजेता. मोठा गट- लंगडी- नवीन मराठी शाळा बार्शी- विजेता, अभिनव प्राथ.विद्यामंदिर बार्शी-उपविजेता.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आपुलीच प्रतिमा होते...

सद्गुणांचे संस्कार सातत्याने केले तर मन पारदर्शक होते, विचार प्रगल्भ होतात आणि आचरणही शुद्ध राहते, असे सांगितले जाते. चांगल्या गुणांचे संस्कार करण्याकरिता बालपण हाच योग्य काळ असतो. वय वाढत गेल्यावर मन संस्कारक्षम राहात नाही असे नाही, पण वाढत्या वयात संस्कार घडविण्याकरिता अधिक काळ घालवावा लागतो. आपले बालक शरीराने सुदृढ असावे, मनाने स्वच्छ असावे, स्वभावाने पारदर्शक असावे आणि आचरणाने शुद्ध असावे, अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. त्यामुळे या इच्छापूर्तीसाठी जे काही संस्कार बालवयातच मुलावर करावे लागतात, त्यासाठी पालक हरतऱ्हेचे प्रयत्न करतो. शिक्षणाने माणसे सुसंस्कृत होतात, असे सांगितले जात असल्याने, चांगल्या शाळांमधील चांगले शिक्षण आपल्या बालकास मिळावे यासाठी पालक कठोर कष्ट उपसतात, आर्थिक खस्ता खातात. मात्र वय वाढत गेले की, त्याच्या वर्तणुकीतील चांगल्या बदलामुळे पालकांचे समाधान होते. चांगले संस्कार झालेले आपले मूल भविष्यात चांगला नागरिक म्हणून समाजात वावरू शकेल, या समाधानाने मुलांच्या वाढत्या वयातील गरजा भागविण्याकरिता पालक सज्ज होतात. साधारणपणे अलिकडच्या प्रत्येक कुटुंबातच हेच चित्र दिसते आहे. शिक्षणातून संस्कार घडतात या समजुतीस धक्का देणाऱ्या अनेक घटना आसपास दिसतात. महाराष्ट्रातीलच एका सुशिक्षित कुटुंबात जन्मलेली, प्रशासकीय अधिकारी म्हणून सरकारी सेवेत दाखल झालेली आणि प्रशासकीय अधिकाऱ्याचीच मुलगी असलेली एक युवती आपल्या पदाचा गैरवापर करून समाजाच्या अपेक्षांना पाने पुसताना दिसते, सरकारी अधिकारी म्हणून सेवेत दाखल होताच लाचखोरीच्या मार्गाला लागून पैसे कमावण्याकरिता आपल्या शिक्षणाची योग्यता पणाला लावताना दिसते, तेव्हा शिक्षण आणि संस्कार किंवा वयानुरूप येणाऱ्या बौद्धिक प्रगल्भतेतून बऱ्या-वाईटाचा विवेक सांभाळण्याचे शहाणपण यांचा संबंध असावा, या समजुतीस धक्का बसतोच. उत्तरप्रदेशात अन्न व औषध प्रशासनाच्या सेवेत दाखल होताच एका तरुणीने लाचखोरीचे जाळे एका औषध विक्रेत्यावर टाकले आणि ३० हजारांच्या लाचेसाठी आपले पदच पणाला लावले. ही बातमी समाज माध्यमांवरून सर्वदूर पोहोचताच सरकारी अधिकारी म्हणून सेवेत दाखल झालेल्या या तरुणीविषयी तीव्र संतापाच्या भावना उमटल्या. अगोदर दर्जेदार शिक्षणासाठी प्रचंड पैसा खर्च करून प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमधून पदव्या संपादन करावयाच्या, त्या शैक्षणिक पात्रतेचा वापर करून गलेलठ्ठ पगाराच्या सरकारी नोकऱ्या मिळवायच्या आणि पदाची प्रतिष्ठा प्राप्त होताच त्याचा गैरवापर करून पैसा मिळविण्याकरिता कोणत्याही मार्गाचा अवलंब करावयाचा; यामुळे शिक्षणाच्या प्रतिष्ठेविषयीचे समज आता गळून पडू लागले असून, सरकारी क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांविषयी सामाजिक आदराच्या भावनेस ओहोटी लागली आहे. कदाचित यामुळेच सरकारी सेवेतील कर्मचाऱ्यांची समाजमनातील प्रतिमा बदलून त्यांना आदराचे स्थान मिळावे यासाठी १० वर्षांपूर्वी सत्तेवर येताच पंतप्रधान मोदी यांनी सरकारी कार्यपद्धती बदलण्याचा संकल्प केला होता. 'चलता है', 'मला काय त्याचे' अशा मानसिकतेतून काम करण्याची प्रवृत्ती बदला नाही तर कारवाईस तयार व्हा, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला होता. बहुधा मोदी सरकारच्या सत्ताकाळातील पहिल्या काही महिन्यांत या मोहिमांचाही चांगला बोलबाला झाला आणि सरकारी कार्यसंस्कृती बदलत चालल्याच्या जाणिवांनी समाजही सुखावला होता. 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिल्यानंतर लाचखोरी-भ्रष्टाचार अशा अपप्रवृत्तींची सरकारी कार्यसंस्कृतीस लागलेली कीड नष्ट होऊन देशात रामराज्य अवतरेल, अशा अपेक्षांनी जनतेने तेव्हा देशातील परिवर्तनशील भविष्याकडे आशेने डोळे लावले होते.

गेल्या १० वर्षांत परिस्थिती खरोखरीच किती बदलली आहे हे पाहावयाचे असेल, तर सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीकडे पुन्हा एकदा पाहावे लागेल. बालवयात सुसंस्कार घडविल्यानंतर मुलांचे आचारविचार सुसंस्कृत होतात. कळत्या वयातील संस्कारांमुळे मोठ्यांच्या आचारविचारातही बदल व्हावा असे अपेक्षित असले, तरी सरकारी कार्यसंस्कृतीत संस्कारांचा एकच बडगा जेव्हा सातत्याने उगारण्याची वेळ येते, तेव्हा असे काही घडतच नसावे, या समजुतीलाच पुष्टी मिळते. महाराष्ट्रात राजपत्रित अधिकारी महासंघामार्फत सरकारी सेवेतील राजपत्रित अधिकाऱ्यांकरिता कार्यसंस्कृती नावाचा एक गोंडस शब्द वारंवार वापरला जातो. 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' अशी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केल्यानंतर सरकारी कार्यसंस्कृतीत बदल घडविण्याची गरज म्हणून पुढच्या काही काळातच महासंघाने एक अभिनव अभियान हाती घेतले असावे. 'पगारात भागवा' हे त्या अभियानाचे अभिनव नाव तेव्हा जनतेसही मनापासून भावले होते. सरकारी कर्मचाऱ्यांविषयी जनतेच्या मनात असलेले समज-गैरसमज दूर करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी जनसेवकाच्या भावनेने जनतेशी वागावे आणि लाचखोरी-भ्रष्टाचारामुळे जनमानसात निर्माण झालेली तिरस्काराची भावना पुसून टाकण्यासाठी लाचखोरी किंवा भ्रष्टाचारापासून दूर राहून पगारात भागविण्याची सवय लावून घ्यावी, असा या अभियानातून केल्या जाणाऱ्या संस्कारांचा गाभा होता. त्याला आता जवळपास नऊ वर्षे झाली. दोन वर्षांपूर्वी जून महिन्यातही हेच अभियान पुन्हा एकदा राबविण्यात आले. लाचखोरी, भ्रष्टाचार किंवा तत्सम प्रकारातून एखादा सरकारी कर्मचारी गजाआड गेला तर त्याच्या कुटुंबाचे नुकसान होते, प्रतिमेची व प्रतिष्ठेची हानी होते आणि असे नुकसान भरून निघणेही अवघड होते. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचारापासून दूर राहिले पाहिजे, असा संदेश देत महासंघाचे पदाधिकारी राज्यभर मोहिमेचा प्रचार करीत होते. अशा प्रकारची मोहीम राबविण्याची वेळ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या संघटनेवर यावी हेच खेदजनक आहे, अशा भावना या मोहिमेच्या प्रचारादरम्यान काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्तदेखील केल्या होत्या. केवळ पैसे कमावण्याच्या हेतूने सरकारी नोकरीत दाखल झाला असाल तर ते योग्य नसून जनतेचे सेवक म्हणून कर्तव्य बजावा, असा संदेश या संघटनेचे पदाधिकारी तेव्हा देत होते. जनतेच्या मनात जर सरकारी कर्मचाऱ्याविषयी नकारात्मक भावना असेल तर आपली कार्यपद्धती सदोष आहे, हे लक्षात घेऊन कार्यपद्धती बदला, असा संदेशही या अभियानात दिला गेला होता. आज याच संघटनेस पुन्हा एकदा 'पगारात भागवा' या नावाने मोहीम हाती घेण्याची वेळ आलेली दिसते. केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेस मंजुरी दिली आहे. साहजिकच सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनास भरघोस वाढीचे नवे वेध लागले आहेत. पण पगारवाढ होत असूनही सरकारी कर्मचाऱ्यांविषयी जनतेच्या मनात असलेल्या नकारात्मक भावना पुसल्या गेलेल्या नाहीत, याची जाणीव महासंघास नव्याने झाली असून सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीला सूत्रबद्धता आणण्यासाठी दशसूत्री जारी केली आहे. राज्यातील प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणणे, कार्यसंस्कृतीला बट्टा लावणाऱ्या भ्रष्टाचार, लाचखोरीसारख्या प्रकारांपासून दूर राहणे हा सुसंस्कार या कार्यसंस्कृतीतून सरकारी कर्मचाऱ्यांच्या मनावर बिंबविण्यात येणार असून कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीची दशसूत्री जनतेसही माहीत व्हावी याकरिता कार्यालयांबाहेर फलकांवरही प्रसृत करण्यात येणार आहे. कामकाजात शंभर टक्के प्रामाणिकपणा, सेवाभावनेप्रति पूर्ण निष्ठा व त्याद्वारे जनतेस दर्जेदार सेवा पुरविणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट राहणार असल्याचे सांगण्यात येते. कर्मचाऱ्यांवर सुसंस्कार घडविण्यासाठी हार न मानता, अथकपणे राबविल्या जाणाऱ्या अशा मोहिमेबद्दल संघटनेचे कौतुक करायलाच हवे, पण गेल्या नऊ वर्षांत तिसऱ्यांदा हेच अभियान राबविण्याची वेळ आल्याने, त्या त्या अभियनातून केले गेलेले कार्यसंस्कृतीचे सुसंस्कार कर्मचाऱ्यांच्या मनात भिनले किंवा नाही याचा आढावाही या निमित्ताने संघटनेने घ्यावयास हवा. 'परफॉर्म ऑर पेरिश' म्हणजे, कार्यक्षमता दाखवा किंवा बाजूला व्हा, असा इशारा १० वर्षांपूर्वी पंतप्रधानांनी दिला होता. त्यानंतर आपली कार्यक्षमता सिद्ध करण्याकरिता कोणते प्रयत्न झाले, याचाही या निमित्ताने आढावा घ्यावयास हवा. त्यातून सकारात्मक काही समोर आले, तर जनतेच्या मनातील जुनी प्रतिमा पुसण्यास अभियान खरोखरीच उपयुक्त ठरते की केवळ काहीतरी तात्कालिक उपक्रम एवढाच या अभियानाचा हेतू उरतो, हेही स्पष्ट होईल.

## आंतरराष्ट्रीय

# अमेरिकन व्हिसा

**वसंत गणेश काणे**

व्हिसा हा सरकारचा एक अधिकृत दस्तावेज आहे. यानुसार तुम्हाला विशिष्ट वेळ आणि कारणासाठी त्या देशात प्रवेश करण्याची, राहण्याची किंवा प्रवास करण्याची अनुमती मिळते. ही बाब आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी महत्त्वाची आहे. कारण ती तुम्हाला सीमा ओलांडू देते आणि कायदेशीररीत्या दुसऱ्या देशात निरनिराळे व्यवहार करू देते. 'एच१बी व्हिसा' हा अमेरिकेत दाखल होण्यासाठीचा एक प्रकारचा व्हिसा आहे. हा व्हिसा इमिग्रेशन ॲण्ड नॅशनॅलिटी ॲक्टच्या कलम १०१ नुसार दिला जातो. अमेरिकेत काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक व्हिसांपैकी हा एक आहे. हा व्हिसा परदेशी लोकांना अमेरिकेत ठरावीक मुदतीसाठी ये-जा करण्यासाठी तसेच पगारी काम करण्यासाठी देण्यात येतो. व्हिसा अनेक प्रकारच्या व्यवहारांसाठी वापरता येतो. जसे की काम करणे, अभ्यास करणे किंवा फक्त परदेशी देशाला भेट देणे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर भारतीयांना किती व्हिसा मिळणार आणि त्यात काही कपात होणार का, या प्रश्नाची चर्चा सध्या सुरू आहे. अमेरिकेचे येऊ घातलेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या प्रचारात स्थलांतरितांचा मुद्दा मांडला होता. त्यामुळे या मुद्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकत्याच काही नियुक्त्या केल्या आहेत. त्यामुळेही चर्चेला बळ मिळाले आहे. उदाहरणार्थ त्यांनी मूळचे भारतीय असलेले श्रीराम कृष्णन् यांना वरिष्ठ सल्लागार म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विभागात नेमले आहे. या नेमणुकीमुळे ट्रम्प यांचे पाठीराखे नाराज झाले आहेत तसेच अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षाचे आणखी एक प्रभावी नेते विवेक रामास्वामी यांनी एच१बी व्हिसाधारकांच्या अमेरिकेतील आर्थिक विकासातील योगदानाबाबत अनुकूल स्वरूपाचे वक्तव्य केले. यामुळे आणखी एक वाद अमेरिकेत निर्माण झाला आहे. ट्रम्प यांनी सूत्रे हाती घेण्याअगोदरच अमेरिकेत वाद उफाळला आहे. याची नोंद घ्यायला हवी. शिवाय असे की, विरोध करणारे लोक डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिक पक्षाचे सदस्य आहेत, हेही लक्षात ठेवले पाहिजे. ट्रम्प सरकारमध्ये ज्या ॲलन मस्क यांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे, ते स्वतः एक स्थलांतरित आहेत. त्यांनी एच१बी व्हिसाचे समर्थन केले आहे. आजचे अमेरिकेचे पूर्ण माहिती तंत्रज्ञान क्षेत्र एच१बी व्हिसाधारकांच्या प्रयत्नातून उभे झाले आहे, असे मत मस्क यांनी अत्यंत ठामपणे मांडले आहे. निवडणूक प्रचारात ट्रम्प यांची घोषणा होती की, 'मला अमेरिकेला 'ग्रेट' बनवायचे आहे.' अमेरिकेत आलेल्या स्थलांतरितांनीच अमेरिकेला 'ग्रेट' बनविले आहे, असा मस्क यांच्या भूमिकेमागचा विचार आहे. अमेरिकेच्या इतिहासात एका उद्योगपतीने ॲलन मस्क यांनी दिली, इतकी मोठी रक्कम देणगी म्हणून एखाद्या उमेदवाराला दिलेली नाही, यावरून काय ते समजावे.

अमेरिकन कंपन्या, उद्योजक, भांडवलदार हे एच१बीचे समर्थक आहेत तर अमेरिकेतील नागरिकांचा एच१बीला विरोध आहे. कारण अमेरिकेतल्या अनेक आयटी कंपन्या परदेशातून एच१बी व्हिसावर आलेल्या अत्यंत गुणवान तरुणांनासुद्धा कमी पगारावर नेमतात. टीसीएस, इन्फोसिस आणि कॉग्निझंटसारख्या काही या आयटी कंपन्या निर्धारित संख्येपेक्षा जास्त एच१बी व्हिसाधारकांना नोकरीवर ठेवतात. व्हाईट हाऊसच्या म्हणण्यानुसार अमेरिकन नागरिक असलेल्या आयटी नोकरदाराचा वार्षिक पगार १.५० लाख यूएस डॉलर्स एवढा असलाच पाहिजे; त्याच गुणवत्तेचा एच१बीधारक असेल (परदेशी नागरिक असेल) तर त्याला ६० ते ६५ हजार डॉलर पगार दिला तरी चालते. म्हणजे एच१बी धारक नोकर नेमला तर कंपनीचे ८५ हजार डॉलर वाचतात. म्हणून आयटी कंपन्या ६० ते ६५ हजार डॉलर्स एवढाच पगार देऊन जास्तीत जास्त एच१बी व्हिसाधारकांना नोकऱ्या देत. परदेशी नागरिकांना कमी पगार द्यावा लागत असल्याने या कंपन्या अमेरिकी नागरिकांना नोकरीवरून काढून टाकीत किंवा नेमतच नसत. यामुळे अमेरिकेतली बेरोजगारी वाढत असल्याचा आरोप अमेरिकी राजकारणी करीत असतात. अमेरिकेत कोरोनामुळे चार कोटी लोक बेरोजगार झाले. बहुतांश बेरोजगार वर्ग मध्य अमेरिकेत राहतो. कॅनसस, मिसुरी, ओक्लाहोमा, कॅन्सस, इलिनॉईस ही त्यातली काही राज्ये आहेत. ही तुलनेने मागासलेली, गरीब राज्ये तर आहेतच; ट्रम्प यांची समर्थक राज्येही आहेत. तुमची गरिबी, दारिद्र्य यावर मी उपाय शोधीन, असे आश्वासन ट्रम्प यांनी त्यांना निवडणूक प्रचारादरम्यान दिले होते. 'अमेरिकेच्या जोरावर इतर अनेक देशांनी आर्थिक प्रगती केली. त्या देशांचा फायदा झाला; त्याचवेळी आणि त्याचमुळे अमेरिकेची आर्थिक व्यवस्था पार ढासळली. आता आम्ही आमच्या लोकांचाच प्राधान्याने विचार करू. त्यांना अधिकाधिक रोजगार कसा उपलब्ध होईल, याचा विचार करू' असे ट्रम्प प्रचारात म्हणत असत. एच१बी व्हिसाधारकांबाबत कठोर पावले उचलण्यामागचे हे एक पाऊल उचलण्याच्या विचारात ट्रम्प असावेत, असे एक मत आहे. अमेरिकन कंपन्यांना विज्ञान, कायदे, वास्तुरचना, गणित, शिक्षण आदी क्षेत्रांतील प्रवीण व्यक्तींची गरज असते. अशा व्यक्तींनाच या कंपन्या व्हिसा देण्याच्या प्रयत्नात असतात. नोकरी देताना दरवर्षी साधारण ८५ हजार कुशल परदेशी कर्मचाऱ्यांना अमेरिकेत सामावून घेतले जाते. हे बंद झाले तर ही क्षेत्रे माघारतील आणि अमेरिकेचेच फार मोठे नुकसान होईल, असे दुसरे मत आहे. एच१बी व्हिसावर टीका आत्ताच होते आहे असे नाही. उजव्या विचारांचे लोक 'हे धोरण बदलावे' अशी मागणी सतत करीत आले आहेत. एखादी कंपनी एच१बी व्हिसा देऊन परदेशातील कर्मचारी भरती करणार असेल तर ३० दिवस आधी त्यांनी ही जाहिरात दिली पाहिजे. देशात कर्मचारी किंवा तज्ज्ञ मिळाले नाहीत तरच या कंपन्यांना बाहेरच्या देशांमधून कर्मचारी मागविता येतात. सन २०१६ मध्ये डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यानंतर अमेरिकी काँग्रेसच्या कनिष्ठ सभागृहात त्यांनी एक विधेयक मांडले होते. त्यानुसार एच१बी व्हिसावर अनेक निर्बंध आणण्यात आले.

अमेरिकेने एखाद्या जबाबदार बलिष्ठ राष्ट्राप्रमाणे व्यवहार करावा हे अपेक्षित आहे. अनेक सर्वेक्षण संस्थांनी आपापल्यापरीने जागतिक राजकारणविषयक प्रश्नांबाबत सर्वेक्षणे केली आहेत. संयुक्त राष्ट्र संघटना तर अगतिकपणे अनेक अपप्रकारांकडे किंकर्तव्यमूढ होऊन अगतिकपणे सर्व प्रकारच्या अनिष्ट घटनांकडे उघड्या डोळ्यांनी मुकाटपणे पाहत उभी आहे. अशा निर्णायकी काळी अमेरिकेने नेतृत्व गुणांचा परिचय देण्याची आवश्यकता होती आणि आहे, पण असे घडले नाही. अमेरिकेतील दोन्ही राजकीय पक्ष आणि अमेरिकन जनमानस यांच्या भूमिकांचा मागोवा घेतला तर अपेक्षाभंगाशिवाय दुसरे काहीही पदरात पडत नाही.

गेल्या वर्षीच्या उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार अमेरिकेने २ लक्ष ६५ हजार ७७७ व्हिसा मंजूर केले होते. त्यापैकी ७८ टक्के व्हिसा भारतीयांच्या वाट्याला आले होते. अमेरिकेच्या तांत्रिक उद्योगात भारत किती महत्त्वाचा सहभाग देतो आहे, ते यावरून लक्षात यावे. अमेरिकेला स्वस्तात कुशल मनुष्यबळ मिळाले, तर भारतीयांना अर्थप्राप्तीची संधी प्राप्त झाली. थोडक्यात काय की, एच१बी व्हिसा उभयपक्षी फायदेशीर आहे.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# इस्रोच्या कामगिरीची जगाला भुरळ

१६ जानेवारी रोजी भारताने पुन्हा एकदा यशाचे शिखर पादाक्रांत करीत जगामध्ये दबदबा निर्माण केला. स्पेस डॉकिंग करणारा भारत हा जगामध्ये चौथा देश ठरला. अंतराळ क्षेत्रामध्ये रशिया, चीन व अमेरिकेसारख्या राष्ट्राचा दबदबा असतानाही भारताने ही मोहीम यशस्वी केली. अंतराळामध्ये स्थानक तयार करण्यासाठी आणि चंद्रावर मानव पोहोचविण्यासाठी भविष्यामध्ये हे तंत्रज्ञान एक मैलाचा दगड ठरणार आहे. स्पॅडेक्स मिशनमध्ये दोन २२० किलोग्रॅमचे उपग्रह चेसर आणि टार्गेट पीएसएलव्ही-सी ६० द्वारे ४७० किमी उंचीच्या कक्षेत प्रक्षेपित करण्यात आले होते. या उपग्रहांनी प्रथम २० किमी अंतर राखून एकमेकांच्या जवळ येत ५ किमी व नंतर ३ किमी अंतरावर जवळ येऊन यशस्वी डॉकिंग केले. डॉकिंगनंतर दोन्ही उपग्रहामध्ये विद्युत शक्ती हस्तांतरणाची यशस्वी चाचणीही करण्यात आली. ही प्रक्रिया भविष्यामधील अंतराळ मोहिमांसाठी फारच महत्त्वपूर्ण आहे. हे तंत्रज्ञान भविष्यातील मानवाची अंतराळातील उड्डाणे, अंतराळामध्ये स्थानकाची उभारणी व उपग्रहाच्या देशभालीसाठीही अतिशय उपयुक्त ठरणार आहे. अंतराळामध्ये दोन उपग्रह एकमेकांना जोडणे व त्यांना अलग करणे हे वाटते तेवढे सहज सोपे नाही. परंतु, भविष्याचा वेध घेत इस्रो देशासाठी अथक प्रयत्न करून यश संपादन करीत आहे. त्यामुळेच इस्रो ही संस्था जगामध्ये मानाच्या स्थानावर आहे. अंतराळामध्ये गुरुत्वाकर्षण नसल्याने तेथे उपग्रह अतिशय वेगाने फिरत असतात. हा वेग नियंत्रित करून येणाऱ्या आव्हानांना तोंड देत इस्रोने ही कामगिरीही यशस्वीपणे पार पाडली. भारताने या कामास सन २०१६ पासूनच सुरुवात केली होती. १९६० च्या दशकामध्ये नासाने अंतराळामध्ये उपग्रहाचे डॉकिंग करून अपोलो चांद्रमोहिमेचा मार्ग मोकळा केला होता. नासा अजूनही याच तंत्रज्ञानाचा वापर करून इंटरनॅशनल स्पेस स्टेशनचे संचालन यशस्वीरीत्या करीत आहे. २०३५ पर्यंत स्वतःचे अंतराळ स्थानक उभारण्याचा आणि २०४० पर्यंत मनुष्याला चंद्रावर पाठविण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश समोर ठेवून इस्रोची भविष्यातील वाटचाल सुरू आहे. ही बाब प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाची आहे. या यशानंतर इस्रो ३० टन वजनापर्यंतचा भार पृथ्वीच्या निम्न कक्षेत म्हणजेच जवळपास दोन हजार किमीवर पोहोचवू शकणारे नवीन हेवी लिफ्ट प्रक्षेपण वाहन तयार करण्याची तयारी करीत आहे. चांद्रयान मोहिमेद्वारे चंद्रावरील दगड, मातीचे नमुने पृथ्वीवर आणले जातील. त्यासाठी वेगवेगळ्या यानांना अवकाशामध्ये जोडून पुन्हा त्यांना अलग करण्याची प्रक्रिया साधावी लागणार आहे. सन २०२८ ते २०३५ या कालावधीमध्ये भारतीय अंतरिक्ष स्टेशनची निर्मिती टप्प्याटप्प्याने डॉकिंगद्वारे केली जाणार असून भारतीय यानांनी अवकाश स्थानकाला भेट देण्यासाठी ही प्रक्रिया अतिशय आवश्यक आहे. सन २०४० मध्येही चंद्रावर भारतीय नागरिक पाठविताना स्पेस डॉकिंग याच प्रक्रियेचा अवलंब केला जाईल. भारत हे सर्व स्वबळावर विविध तंत्रज्ञान विकसित करून भविष्याची वाटचाल करीत आहे. अवकाश मोहिमांचे उद्दिष्ट सहज साध्य करणे एवढे सोपे नाही. चांद्रयान-२ या मोहिमेद्वारे प्रत्येक भारतीयाने याचा अनुभव घेतला आहे. हे अतिशय आव्हानात्मक कठीण कार्य आहे. पृथ्वीचे किंवा एखाद्या ग्रहाचे निरीक्षण करावयाचे असल्यास एखाद्या उपग्रहावर विविध उपकरणे बसवून त्या उपग्रहाला ग्रहाच्या कक्षेमध्ये स्थापन करून अपेक्षित नोंदी घेतल्या जातात. परंतु, एखाद्या ग्रहाच्या पृष्ठभागावर यान उतरवून पृथ्वीवर नमुने आणणे अशा एका यानाद्वारे अवघड असते. अशा मोहिमा अनेक यानाच्या समन्वयाद्वारे यशस्वी केल्या जाऊ शकतात. त्यामुळे स्पेस डॉकिंग ही उपलब्धी भारतासाठी अतिशय महत्त्वाची उपलब्धी आहे. हे यश इस्रोला सहज साध्य झाले असेही नाही. त्यामध्ये इस्रोच्या अनेक वैज्ञानिकांचे अथक परिश्रम आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जिद्द, चिकाटी आणि देशाच्या प्रगतीची असलेली मनातील अभिलाषा आहे. नरेंद्र मोदी यांच्या काळात भारताची होत असलेली चौफेर प्रगती विरोधकांसाठी वेदनादायी ठरत आहे. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यास न जुमानता देशासाठी झटत आहेत. नागरिकांच्या स्वप्नातील सुंदर आणि प्रगतिशील भारताचे चित्र साकारण्यास इस्रोचे हे यशस्वी पाऊल आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# नैसर्गिक शेतीतून स्थायी विकासाची क्रांती

**दत्तात्रेय आंबुलकर**

मोदी सरकारने प्रारंभापासूनच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबलेले दिसते. देशभरात नैसर्गिक शेतीला मिशन मोडमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी 'राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियाना'चाही शुभारंभ करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने नैसर्गिक शेतीचे विविध आयाम आणि त्याचे कृषी उत्पादकतेवरील परिणाम यांचा हा ऊहापोह...

नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला मोठे पाठबळ लाभले आहे. यासंदर्भात केंद्र सरकारच्या नैसर्गिक शेतीला पूरक ठरणारे राष्ट्रीय धोरण व त्याची अंमलबजावणी या बाबीही आता तितक्याच महत्त्वाच्या ठरल्या आहेत. या नव्या व महत्त्वपूर्ण धोरणांतर्गत आगामी २०२५-२६ या वर्षांपर्यंत नैसर्गिक शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक आणि मार्गदर्शक अशा शेतजमिनीचा अभ्यास करून कृषी उत्पादकता वाढ, कृषी उत्पादनात विविधतेसह दर्जात्मक वाढ व त्याद्वारे ग्रामीण भागात अधिकाधिक रोजगार वाढीतून स्थायी स्वरूपात विकास साधणे, या उपक्रमांवर विशेष भर दिला जाणार आहे. ग्रामीण विकासाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमांची केंद्र सरकारच्या प्रचलित-प्रस्थापित व भौगोलिक परिस्थितीशी सांगड स्थायी विकासाच्या प्रयत्नांशी घालण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला जाणार आहे. याच प्रयत्नांचा प्राथमिक व महत्त्वाचा टप्पा म्हणून आता केंद्र सरकारतर्फे ग्रामपंचायत स्तरावर १५ हजार विकास केंद्रे विकसित केले जाणार आहेत. या ग्रामीण व कृषी विकास केंद्रांच्या माध्यमातून सुमारे साडेसहा लाख हेक्टर्सच्या कृषी क्षेत्रात नैसर्गिक शेती उपक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. यातूनच जैविक संसाधन विकास केंद्र, आदर्श नैसर्गिक शेती प्रकल्पचा विकास करण्याची व्यापक योजना निश्चित करण्यात आली आहे. या प्रयत्नांना प्रत्यक्षात साकारण्यासाठी सुमारे १९ लाख शेतकऱ्यांना थेट आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे काम ३० हजार कृषी-सखींच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावर व व्यापक प्रमाणात केले जाईल. प्रशिक्षण-प्रकल्पाद्वारे शेती आणि शेतकरी या उभयतांच्या प्रत्यक्ष सहभागावर विशेष भर दिला जाणार आहे. त्यामुळेच यामध्ये शेतजमिनीचा अभ्यास, परीक्षण, निगा व विकास, जैविक पद्धतींचा अधिकाधिक वापर, बदलत्या वातावरण व हवामानाशी अभ्यासपूर्ण सांगड व त्यातून अधिक उत्पादक व उपयुक्त शेती साधने असे व्यापक ध्येय निश्चित करण्यात आले आहे. नव्या संदर्भातील नैसर्गिक शेतीमध्ये खालील आयामांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.



**अनावश्यक रसायनांचा वापर टाळणे** : यामध्ये अनावश्यक व प्रसंगी अहितकारी रसायने व रासायनिक खतांचा वापर पुरतेपणी टाळला जाणार आहे. ही बाब शेती आणि शेतकरी या उभयतांसाठी अधिक उत्पादक व उपयुक्त ठरणार आहे.

**स्वदेशी जैविक पद्धतीचा अवलंब** : शेतीला स्वदेशी जैविक पद्धतीची जोड देण्यात येणार आहे. यामध्ये सेंद्रिय खतांच्या वापराला चालना मिळून, त्याद्वारे खऱ्या अर्थाने नैसर्गिक शेतीच्या प्रभावी उपयोगाद्वारे स्थायी विकास साधला जाऊ शकेल.

**शेत जमिनीच्या आरोग्याचा विकास** : नैसर्गिक शेतीसाठी शेतीचा कस वाढवून व शेतीच्या आरोग्य विकासाद्वारे उत्पादक शेतीवर अधिक भर असेल. यासाठी तंत्रज्ञानासह प्रगत संशोधनावर विशेष भर दिला जाणार आहे.

**पाण्याचे प्रगत नियोजन** : विकासामध्ये पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता, नैसर्गिक शेतीमध्ये पाण्याचे नियोजन व संवर्धनावर विशेष भर दिला जाईल. त्याशिवाय त्याला शेती परिसरातील आर्द्रतेच्या उपयोगाची जोड देण्यात येणार असल्याने नैसर्गिक शेती प्रक्रियेमध्ये उपलब्ध जलस्रोतांचा अधिकाधिक व कायमस्वरूपी उपयोग होणार आहे.

**आर्थिक सक्षमता** : शेतीला आर्थिकदृष्ट्या फायदेशीरच नव्हे तर किफायतशीर बनविण्यासाठी नैसर्गिकदृष्ट्या केलेले प्रयत्न विविध प्रकारे फायदेशीर ठरावे. यामध्ये विशेषतः नैसर्गिक वा परंपरागतरीत्या उपलब्ध स्रोतांचा अधिकाधिक उपयोग करण्यात येणार असल्याने शेतीच्या उत्पादन खर्चात लक्षणीय कपात होईल व अशाप्रकारे स्थायी विकासाच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण विकास साधता येईल. नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून स्थायी विकास साधण्यासाठी केंद्र सरकारच्या नैसर्गिक शेती व विकास उपक्रमांतर्गत व त्याच्या परिणामकारक उपाययोजनेसाठी प्रामुख्याने पुढील उपाययोजना करण्यात आली आहे.

**अर्थसंकल्पीय तरतूद** : नैसर्गिक शेतीद्वारा 'स्थायी विकास योजने'साठी शासकीयदृष्ट्या व प्राधान्य तत्त्वावर केंद्र स्तरावर २ हजार ४८१ कोटी व राज्यांच्या स्तरांवर ८९७ कोटी रुपयांची तरतूद २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आली आहे. आगामी दोन वर्षांच्या कालावधीत सुमारे एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रेरित करून मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये विविध भौगोलिक प्रदेश व धान्योत्पादनानुसार निवडक राज्यांचा समावेश केला जाणार आहे. नैसर्गिक शेतीची सुरुवात करून त्याला प्रोत्साहन देण्यासाठी देशपातळीवर सुमारे १० हजार शेतकरी मार्गदर्शन केंद्र स्थापण्यात येणार आहेत.

**कृषी विज्ञान केंद्रांचा सहभाग** : देशांतर्गत दोन हजार कृषी विधान केंद्रांची निवड करून त्यांच्या माध्यमातून प्रायोगिक स्तरावर शेतकऱ्यांसाठी विशेष कृषी मार्गदर्शन केंद्रे स्थापन केली जाणार आहेत.

**प्रचार-प्रसार** : नैसर्गिक शेतीला अधिक चालना देऊन त्याचा अधिकाधिक प्रचार-प्रसार करण्यासाठी 'नैसर्गिक शेती योजने'त सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना त्या संदर्भातील नामांकनासह प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहित करण्याची योजना आखली जाणार आहे.

ग्रामीण युवकांना विशेष कौशल्य : योजनेंतर्गत समाविष्ट केलेल्या 'ग्रामीण युवा कौशल्य विकास' या विशेष उपक्रमाद्वारे विविध प्रदेशातील ग्रामीण युवकांना नैसर्गिक शेतीच्या दृष्टीने आवश्यक अशा कौशल्यांचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल. यातून ग्रामीण युवकांना त्यांच्या या कौशल्याच्या आधारावर रोजगार स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. याशिवाय विविध राज्य सरकारांचे साहाय्य व सक्रिय सहभाग याद्वारे नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ केली जाईल. तुलनात्मकदृष्ट्या सांगायचे झाल्यास २०१२ साली नैसर्गिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या देशपातळीवर सुमारे ४० हजार होती; ती सध्या ८० हजार झाली आहे.

थोडक्यात म्हणजे नैसर्गिक शेतीला प्रयत्नपूर्वक अधिक प्राधान्य दिल्यास त्याद्वारा देशातील शेती आणि शेतकऱ्यांना बहुविध फायदे होणार आहेत.


(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### अनियंत्रित वाहतुकीला आवरा, स्वतःला सावरा

फटाक्याचे आवाज करत जाणाऱ्या बाईक्सचे सायलेन्सर्स निकामी करण्याबाबतच्या वाहतूक विभागाच्या कारवाईची बातमी नुकतीच वाचण्यात आली. वाहतूक विभागाने उचललेले हे पाऊल निश्चितच अभिनंदनीय आहे. काही दुचाकी तसेच चारचाकी वाहनचालक वाहनाच्या मूळ दिव्यांच्या जागी फार प्रखर दिवे किंवा जास्तीचे दिवे, पिवळे दिवे लावून विरुद्ध दिशेने येणाऱ्या चालकांचे डोळे दिपवून टाकतात. त्यामुळे अपघाताची शक्यता खूप जास्त असते. वाहतूक विभागाने याबाबत लक्ष घालून कारवाई करावी. तसेच आजकाल रॉंग साईडने वाहन चालविण्याचे प्रकार खूपच वाढले आहे. समोरच्याला काही म्हटले तर तोच उलट शिव्याशाप, प्रसंगी हाणामारी करायलाही मागेपुढे पाहत नाही. ऑटोवाल्यांबद्दल तर न बोललेलेच बरे. संपूर्ण रस्ता त्यांचा आणि नियमही त्यांचेच आहेत, या आविर्भावात ते ऑटो चालवतात. नियम न पाळता ऑटो चालवण्यात त्यांचा हात कुणीही धरू शकत नाही. त्यांच्यावरही वचक बसावा, हीच अपेक्षा.



**विनय निजसुरे**/९५७९९६८१४४

### ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाचा कोतेपणा!

पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील सिडनी येथील अखेरचा कसोटी सामना तिसऱ्याच दिवशी ६ गड्यांनी जिंकत ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघाने या सामन्यासह मालिका ३-१ अशी खिशात घातली. पहिला कसोटी सामना सोडल्यास ५ सामन्यांच्या या संपूर्ण मालिकेत कांगारूच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले आणि तब्बल एका दशकानंतर बॉर्डर-गावस्कर चषक उंचावला. हा चषक समारंभपूर्वक ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा विजयी कर्णधार पॅट कमिन्सने त्या क्रिकेट संघाचे माजी कर्णधार ॲलन बॉर्डरकडून स्वीकारला.

वास्तविक पाहता क्रिकेट विक्रमादित्य सुनील गावस्कर हे सुद्धा सिडनी मैदानावर उपस्थित होते आणि बॉर्डर-गावस्कर यांच्या नावाचा हा चषक १९९६ पासून विजयी संघाला प्रदान केला जातो. मात्र लिटिल मास्टर सुनील गावस्कर तेथे उपस्थित असतानाही त्यांना पुरस्कार वितरण समारंभाला आमंत्रित न करता ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने आपल्या मनाचा कोतेपणा दाखवला. मला आठवतं १९८६ ला भारतीय क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर होता. तेव्हा कसोटी मालिकेतल्या कुठल्यातरी एका सामन्यात भारतीय संघ पराभवाच्या छायेत होता. तेव्हा सुनील गावस्कर खेळपट्टीवर होते. त्यांनी आपल्या प्रदीर्घ आणि संयमी खेळीने भारताला पराभवाच्या छायेतून सुखरूप बाहेर काढत विजयाच्या उंबरठ्यावर आणले. तेव्हा ऑस्ट्रेलियन नियतकालिकाने सुनील गावस्कर यांच्या संस्मरणीय डावाविषयी गौरवोद्गार काढताना लिहिले होते की, ''सुनील गावस्कर अजिंक्य भारतीय खेळाडू आहेत. त्यास ऑस्ट्रेलियाच काय तर संपूर्ण क्रिकेट विश्व पराभूत करू शकत नाही.''

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### रस्ते अपघात टाळण्यासाठी उपाययोजना असाव्यात

सध्या आपल्या राज्यात पोलिस भरतीसाठी युवकांकडून मोठ्या प्रमाणात तयारी चालू आहे. या प्रक्रियेत ग्रामीण भागातील युवकांनाही शारीरिक चाचणीसाठी मुख्य रस्त्यांचा सराव करावा लागतो. मात्र, या सरावामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो, तसेच रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांमुळे अपघात होण्याचा धोका निर्माण होतो. कालच, बीड -परळी रस्त्यावर राज्य परिवहन बसने तीन उमेदवारांना चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. यामध्ये निष्पाप युवकांचा जीव गेला आणि त्यांच्या कुटुंबांवर शोककळा पसरली.

या दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना तातडीने केल्या जाव्यात अशी सामान्य जनतेची सरकारकडून अपेक्षा आहे. त्यात प्रत्येक गावात किंवा जिल्ह्यात पोलिस भरतीसाठी किंवा अन्य क्रीडा सरावासाठी धावण्याच्या स्वतंत्र मार्गांची व्यवस्था करावी. उमेदवारांसाठी सुरक्षित आणि मोकळी मैदाने उपलब्ध करून द्यावी. वाहनचालकांसाठी अशा ठिकाणी अधिक सतर्क राहण्याच्या सूचना द्याव्यात, फलक लावावे, आवश्यकतेनुसार सिग्नल यंत्रणा किंवा पोलिस कर्मचारी तैनात करावेत. सरकारने या बाबतीत तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आहे. या उपाययोजनांमुळे अशा अपघातांची पुनरावृत्ती रोखता येईल आणि युवकांचे भविष्य सुरक्षित राहील.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सखी वन स्टॉप सेंटर अंतर्गत स्त्री शक्ती पोर्टल नोंदणी

## ए.जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये राबविण्यात आला उपक्रम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**
विजापूर रोड सैफुल जवळील ए.जी. पाटील तंत्रनिकेतन मध्ये जागृती महिला विचारमंच तर्फे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अंतर्गत सखी वन स्टॉप सेंटर मार्फत स्त्री शक्ती पोर्टल मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.

स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. त्यावरती आळा घालण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभागातर्फे विविध योजना राबविण्यात येतात तसेच महिला सबलीकरण व सक्षमीकरण यासाठी महिला उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येते. त्या संदर्भात शुभांगी कांबळे यांनी स्त्री शक्ती पोर्टल कसे वापरावे व त्यावरती कशी नोंदणी करावी याचे मार्गदर्शन केले. संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याचा उद्देशाने केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाकडून सखी वन स्टॉप सेंटर ही योजना कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष एस.ए. पाटील, उपाध्यक्ष एस.एस.पाटील, कॅम्पस डायरेक्टर व प्राचार्य डॉ. एम.ए. चौगुले व उपप्राचार्य एस.के. मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे संपूर्ण कामकाज जागृती महिला विचार मंचाच्या समन्वयक एल.एस.बिराजदार यांनी पाहिले. सूत्रसंचालन प्राध्यापिका ए.जी. सोलंकर व प्राध्यापिका जे.सी. सचदेव यांनी केले.

# गावडेवाडीत मायलेकास मारहाण

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**
गावडेवाडी (ता. दक्षिण सोलापूर) येथे मायलेकास लाथाबुक्क्याने जबर मारहाण करून जखमी करण्यात आले. अंबुबाई मल्लिकार्जुन कोले (वय ५१), पंडीत मल्लिकार्जुन कोले (वय २९, रा. गावडेवाडी) अशी जखमींची नावे आहेत. १९ जानेवारी रोजी सायंकाळी राहत्या घरी असताना




घरातील बल्ब काढताना बल्ब का काढता असे म्हणाल्यानंतर नवनाथ मल्लिकार्जुन कोले यांने अंबुबाई व पंडीला लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये दोघांच्याही सर्वांगास मुका मार लागल्याने दोघांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# आजपासून बौद्धिक संपदेवर कार्यशाळा

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**
हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे २१ ते २५ जानेवारी दरम्यान होणाऱ्या बौद्धिक संपदा अधिकारवर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश प्राध्यापकांचे 'बौद्धिक संपदा तयार करण्यासाठीच्या प्रक्रिया' या क्षेत्रातील ज्ञान आणि कौशल्ये वाढवणे आहे. या कार्यक्रमात शासनाचे बौद्धिक संपदा धोरण, पेटंटिंग आणि कॉपीराइट कायद्यां, यासाठी लागणाऱ्या कायदेविषयक प्रक्रिया इत्यादी आयपीआरच्या विविध पैलूंचा समावेश असेल. या कार्यक्रमात प्रख्यात संस्थांमधील तज्ञ वक्ते आणि प्रशिक्षक असतील. सहाय्यक बौद्धिक संपदा अधिकारी भारत सरकार निलेश पाटील, सारंग खाडिलकर, एस. एस धारणे तसेच बौद्धिक संपदा कनसलटन्ट डॉ प्रीती तायडे, देवेंद्र वर्मा, सिद्धार्थ कुंभार, डॉ अनिलकुमार कट्टी, डॉ. श्रीकांत जहागीरदार, प्रा वैभव कुलकर्णी, डॉ ओम प्रकाश अष्टनकर आदी प्रशिक्षक असतील. इच्छुक सहभागींना नोंदणी करण्यासाठी कार्यक्रमाचे संवाहक डॉ. पंकज डोळस यांच्याशी मो: ९४२२३७००८० वर संपर्क साधावा, असे प्राचार्य डॉ. सत्यजित शाह यांनी केले आहे.


## Classifieds

### पाहिजेत

**हेवेनली ब्युटी लेडिज सलोन अ‍ॅन्ड अ‍ॅकॅडमी पत्ता : शॉप नं. ७ मेलोडी अपार्टमेंटजवळ आयएमएस स्कूल येथे अनुभवी स्टाफ पाहिजेत. बेसीक टू अ‍ॅडव्हॉन्स कोर्स चालू आहेत.**
**संपर्क : ८८८८४३३२८५**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my client Mr. Jayendra Krushnasagar Mitthapalli is the owner of Survey no. 123/2/1 Plot No. 114 admeasuring 1144 sq. mtrs. Situated at Solapur.

That it is inform to the public at large that the original Reg. Sale Deed no.6219/2000 has been lost at Vijapur Road to Saiful Road Solapur on 02/01/2024 at around 7.00 p.m. My Client has filed FIR for the same at Vijapur Naka Police Station lost report No. 3582/2024. If any one finds it, is requested to return the same or inform on the Mobile No. 8400004297 to us at below mentioned address. All the persons are here by informed that not to carry on any transactions on the basis of said missing document. On behalf of the client Mr. Jayendra Krushnasagar Mitthapalli (owner of the above mentioned property) the undersigned Advocate hereby invites claims or objections if any for the transfer of said property. In case of any claims /objections kindly intimate the under signed advocate along with the relevant documents to support their claims / objections within 07 days from the date of publication of this notice.

This public notice dated 18/01/2025.

**sd/-**
**Advocate for Client**
**Adv. Shaileshkumar K. Potphode**
**B.Sc.LL.B., Advocate**
**Office: 10/1, Yashwant Hsg. Society,**
**Kumtha Naka, Solapur.**
**Mob. 9975638389/9404333339**

**दिवाणी न्यायालय जे. डी. आणि जे.एम.एफ.सी. औसा**
**माननीय दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग)**
**यांच्या न्यायालयात औसा येथील**

### जाहीर प्रगटन

**दावा दाखल दि. २६/०९/२४, आर.सी.एस. क्र. ९१९ /२०२४**

**सायरा उर्फ शारुबी अफसर शेख** - **वादी**
(वय ५१ वर्षे) धंदा. शेती,
रा सुंभा ता. जि. धाराशिव (उस्मानाबाद)
विरुद्ध
**१. बाबासाहेब S/o सुजात व्होगाडे**
(वय ४९ वर्षे) रा. भेटा ता औसा, जि. लातूर.
**२. नूरजहान फारुक पठाण**
(वय ५४ वर्षे) वरील दोघेही या. अंदोरा औसा, जि. लातूर

दावा:-प्रतिवादीकडून फसवणूक करून आणि सत्य, तथ्य लपवून त्यागपत्राच्या घोषणेचा दावा वादीकडून अंमलात आणला गेला, आणि त्यावर आधारित फेरफार नोंदी बेकायदेशीर, निरर्थक आहेत, त्याकरिता माननीय दिवाणी न्यायाधीश न्यायालय औसा येथे कायमस्वरूपी मनाई आदेश रद्द करावयाबाबत

औसा तालुक्यातील सर्वांना कळविण्यात येते की, सदर दावा दाखल केलेले माझे पक्षकार सायरा उर्फ शारुबी अफसर शेख (वय ५१ वर्षे) धंदा. शेती, रा सुंभा ता. जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचा दावा दाखल दि. २६/०९/ २४, रोजी, ज्याचे आर.सी.एस. क्र. ९१९ /२०२४ असून औसा तालुक्यातील मौजे भेटा येथील गट क्र. ७५/६२ भेटा ता. औसा येथील शेत जमीनीचा दावा औसा - लातूर दिवाणी न्यायालयात चालू असून सदर जमीनी बाबत कोणीही कसल्याही प्रकारचे व्यवहार किंवा देवाणघेवाण करू नये. सदर प्रकरण हे औसा दिवाणी न्यायालयात चालू असून सदर जमीन ही शक्तीपीठ नागपूर - गोवा महामार्गत अधिगृहण होत आहे, त्याबाबत मा. उपविभागीय अधिकारी, औसा-रेणापूर उपविभागीय कार्यालय, लातूर यांनाही पत्राद्वारे प्रकरण कोर्टात दाखल असल्याचे कळविले आहे, तरी या जमिनी बाबत जमिनीच्या विषयी कसल्याही प्रकारचे अधिगृहणाबबत आदेश किंवा वटहुकूम (अवाड) काढू नये, किंवा जमीनीबद्दल कोणताही व्यवहार करू नये. ह्या शेत जमिनीचे प्रकरण जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून त्याबाबतीचे न्यायालयीन कागदपत्र सदर आहेत, याची सर्वांनी नोंद घ्यावी. दि. २६/०९/२०२४

**अर्जदार सही/-**
**सायरा उर्फ शारुबी अफसर शेख**
**रा सुंभा ता. जि. धाराशिव**

**सही/-**
**अ‍ॅड. आर.एम. जाधव**
जिल्हा दिवाणी न्यायालय लातूर

# सिध्दनाथ शुगर मिल्स लि. तिऱ्हे

**ता. उ. सोलापूर जि. सोलापूर**
फोन नंबर.०२१७/२२८३७२२ ई-मेल- siddhanath.sugar@gmail.com

### जाहीर नोटीस

सिध्दनाथ शुगर मिल्स लि. तिऱ्हे या साखर कारखान्याचे कार्यक्षेत्रातील सभासद/बिगर सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते कि, कारखान्याचा गाळप हंगाम २०२४-२०२५ हा जानेवारी २०२५ च्या चौथ्या आठवड्यादरम्यान बंद होणार असल्याने ज्यांचा कारखान्याकडे नोंद असलेला ऊस अद्याप तोडणी अभावी तसाच उभा आहे, अशा सर्व शेतकऱ्यांनी आमचे कारखान्याचे शेती विभागाशी संपर्क साधून आपला ऊस स्वत्ताःमालकतोड व वाहतूक करुन कारखान्यास गळीतास पोहोच करावा.

सदर नोंद/करार केलेला ऊस मुदतीत स्वत्तःमालकतोड व वाहतूक करुन गळीतास पोहोच न केल्यास व असा ऊस गाळपाअभावी शिल्लक राहिल्यास त्यास कारखाना जबाबदार राहणार नाही व शिल्लक राहिलेल्या उसाची नुकसान भरपाई मागणेचा हक्क कोणासही राहणार नाही, याची कृपया सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी.

| **मा.आ.दिलीप ब्र.माने** | **धनंजय अ. भोसले** | **पृथ्वीराज दिलीप माने** |
|---|---|---|
| चेअरमन व कार्यकारी संचालक | संचालक | संचालक |

**सिध्दनाथ शुगर मिल्स लि. तिऱ्हे ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर**

# महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती, औ.वि.केंद्र परळी-वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम/ बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र. ३०००५४०१९ | एएमसी फॉर ओएचपी पम्प सर्विसिंग अँड अलाईड वर्क ऑफ ओएचपी अ‍ॅट बीएम-१ टीपीएस, २५० एमडब्ल्यू परळी-वै. | ३.७२ लाख ७२२२/- | २१.०१.२०२५ ते ०४.०२.२०२५ | ०५.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४०२३ | अ‍ॅन्युअलमेंटेनेस कॉंट्रॅक्ट फॉर सर्विसिंग ऑफ मोटोराइज्ड वॉल्व ऐक्चुएटर्स अ‍ॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अ‍ॅट इलेक्ट्रिकल टेस्टिंग यूनिट ६ अँड ७ टीपीएस परळी वै | ३.८१ लाख ७३२०/- | २१.०१.२०२५ ते ०४.०२.२०२५ | ०५.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४२३२ | सप्लाय ऑफ स्टॅकर रिक्लेमर स्पेअर्स फॉर १४०० एमएम कन्वेयर्स ऑफ सीएचपी यू-६/७,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै. | ८.०८ लाख ११५८०/- | २१.०१.२०२५ ते ०४.०२.२०२५ | ०५.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५३८४७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ गियर बॉक्स फॉर सीओसी ऑफ कोल फीडर अ‍ॅट बीएम - १, २५० एमडब्ल्यू, टीपीएस परळी वै. | ७.९१ लाख ११४२०/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५३८४९ | प्रॉक्यूरमेंट ऑफ एचपी अँड वी अँड एस पम्प्स फॉर कोल मिल बीबीडी-४७७२ अ‍ॅट बीएम १,२५० एमडब्ल्यू टीपीएस परळी वै. | ५४.३४ लाख ५७८४८/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५३८७३ | द इयर्स वर्क कॉंट्रॅक्ट फॉर ऑपरेशन, अप कीपिंग अँड मॉनिट्रिंग सर्विसेस फॉर फोर कंटीन्यूअस ऐम्बीअन्ट एयर क्वालिटी मॉनिट्रिंग स्टेशन्स अ‍ॅट२५० एमडब्ल्यू, टीपीएस परळी - वै. | ७३.०० लाख ७६५०३/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५३९२५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ ऑइल गन अँड कोल फीडर स्पेअर्स रिक्वायर्ड अ‍ॅट बीएम यू-८ टीपीएस परळी वै. | ७.४२ लाख १०९२१/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५३९८३ | सप्लाय ऑफ परफोरेटेड प्लेट्स ऑफ ट्रान्स्पोर्टेशन वेसल इन ईएसपी फॉर फ्लाय अ‍ॅश कण्वेईंग सिस्टम अ‍ॅट एएचपी २५० एमडब्ल्यू, टीपीएस यू-६ परळी वै. | ३.१० लाख ६६०१/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४०२१ | वर्क ऑफ रिकन्डीशनिंग ऑफ स्क्रू कण्वेअर असेम्ब्ली अलॉन्ग वीथ ॲप्लिकेशन ऑफ हाय परफॉर्मेंस रिब्बोंस फॉर बीबीडी ४७७२ कोल मिल अ‍ॅट बीएम-१ टीपीएस २५० एमडब्ल्यू परळी वै. | ५३.२१ लाख ५६७१३/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४०३९ | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर मेंटेनेंस ऑफ ईएसपी अ‍ॅश हॉपर लेवल सिस्टम अँड हॉपर हीटर थर्मोस्टाट अ‍ॅज अँउ व्हेन रीक्वायर्ड अ‍ॅट आयएनसी -२ टीपीएस, २५० एमडब्ल्यू परळी वै. | १.३३ लाख ४०१५/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४०७१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ न्यूमेटिक ओपरेटेड ३०० एनबी केजीव्ही फॉर वेट कोर्स अँड ड्राय फ्लाय अ‍ॅश इवैक्युऐशन अँड कण्वेईंग सिस्टम अ‍ॅट एएचपी यू - ८,२५० एमडब्ल्यू टीपीएस परळी वै. | २९.५० लाख ३३०००/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४०७४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ रोटरी २७.५ व्हीआयएमटी २००० एयर प्रीहिटर गियर बॉक्स स्पेअर्स रीक्वायर्ड अ‍ॅट बीएम यू-८ २५० एमडब्ल्यू, टीपीएस परळी वै. | २२.६७ लाख २६१७८/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४१०६ | प्रॉक्यूरमेंट ऑफ ३६" ग्राबीमेट्रिक को फीडर वेल्ट रिक्वायर अ‍ॅट बीएम २,२५० एमडब्ल्यू, टीपीएस परळी वै. | ३.६१ लाख ७११८/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४१२५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्मार्ट पोजीशनर्स फॉर कंट्रोल बॉल्स अ‍ॅट आय अँड सी-२,२५० टीपीएस परळी वै. | २.०७ लाख ५५७२/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४१२८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ लोड सेल फॉर ग्रावीमेट्रिक फिडर्स इन्स्टॉल्ड अ‍ॅट आय अँड सी-२,२५० एमडब्ल्यू टीपीएस परळी वै. | १.५० लाख ४५२६/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४१३३ | प्रॉक्यूरमेंट ऑफ सिग्नल अँड स्कॅनर केबल फॉर आयएनसी-१,२५० एमडब्ल्यू टीपीएस, परळी वै. | १२.४० लाख १५९०१/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |
| ई-निविदा क्र. ३०००५४१३८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ मेन ऑइल टॅंक अँड एफआरएफ ऑइल टॅंक लेवल ट्रान्समिटर (गाइडेड वेव रडार टाइप) रीक्वायर्ड फॉर यूनिट ६ अ‍ॅट आयएनसी१,२५० एमडब्ल्यू टीपीएस परळी वै. | ७.८२ लाख ११३२२/- | २१.०१.२०२५ ते ११.०२.२०२५ | १२.०२.२०२५ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:०० निविदा किंमत व बायना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावायची आहे. सर्व निविदांसाठी निविदा किंमत रु.११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती : मुख्य अभियंता, टीपीएस परळी -वैजनाथ, मेल आय डि - parlitpsrpa@mahagenco.in, cegenparl@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या https://eprocueremen.mahagenco.in SRM help desk Email ID - etendering.prl@mahangeco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक - ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३९४/२०२४**

**१) आजीम हनील मुलाणी,** — **अर्जदार**
रा. शिंदे प्लॉट, यशवंतनगर, माळशिरस, ता. माळशिर, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** — **गैरअर्जदार**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा आफताब आजी मुलाणी, रा. शिंदे प्लॉट, यशवंतनगर, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २१ ऑक्टोबर २००० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा आफताब आजी मुलाणी यांचा दिनांक २१ ऑक्टोबर २००० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ४२३/२०२४**

**१) गोपालकृष्ण गोविंद कुलकर्णी,** — **अर्जदार**
रा. ६०१ सिल्वर क्रेस्ट, पौंड रोड, पुणे आ.मु. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** — **गैरअर्जदार**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा सुदर्शन बाळकृष्ण कुलकर्णी, रा. ६०१ सिल्वर क्रेस्ट, पौंड रोड, पुणे आ.मु. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०६ जानेवारी १९७४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा सुदर्शन बाळकृष्ण कुलकर्णी यांचा दिनांक ०६ जानेवारी १९७४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३८३/२०२४**

**१) श्रीमंत उद्धव ताकभाते,** — **अर्जदार**
रा. धामणगांव (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील ए. व्ही. सुरवसे)
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** — **गैरअर्जदार**
ग्रामपंचायत धामणगांव (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा गणेश श्रीमंत ताकभाते, रा. धामणगांव (दु.), ता. बार्शी यांचा मौजे धामणगांव (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ नोव्हेंबर १९८५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा गणेश श्रीमंत ताकभाते यांचा दिनांक ०१ नोव्हेंबर १९८५ रोजी मौजे धामणगांव (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ४२४/२०२४**

**१) मायादेवी नागनाथ सातपुते,** — **अर्जदार**
रा. फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** — **गैरअर्जदार**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील भागवत राजाराम सुरवसे, रा. फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०२ फेब्रुवारी २०१६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे वडील भागवत राजाराम सुरवसे यांचा दिनांक ०२ फेब्रुवारी २०१६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३६६/२०२४**

**१) प्रकाश मोहन गायकवाड,** — **अर्जदार**
रा. घोडके प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** — **गैरअर्जदार**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा सिद्धार्थ प्रकाश गायकवाड, रा. घोडके प्लॉट, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील बारबोले हॉस्पीटल बार्शी या ठिकाणी दिनांक १५ डिसेंबर २०२० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा सिद्धार्थ प्रकाश गायकवाड यांचा दिनांक १५ डिसेंबर २०२० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील बारबोले हॉस्पीटल बार्शी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३९३/२०२४**

**१) अजित रंगनाथ चिपडे,** — **अर्जदार**
रा. उत्तमनगर, पुणे
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** — **गैरअर्जदार**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. उत्तमनगर, पुणे यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०३ एप्रिल १९६५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०३ एप्रिल १९६५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## PUBLIC NOTICE

WE ARE PLEASED TO INFORM THAT 'MINISTRY OF ENVIRONMENT, FOREST AND CLIMATE CHANGE (MOEFCC)', GOVERNMENT OF INDIA, NEW DELHI HAS ACCORDED AN "ENVIRONMENTAL CLEARANCE" VIDE ITS EC IDENTIFICATION NO- EC24B2404MH5785328N DATED 13th JANUARY, 2025 TO "M/S. VAASAVAA PHARMACEUTICALS PRIVATE LIMITED" LOCATED AT PLOT NO. C-216 & C-217, CHINCHOLI MIDC, TAL.: MOHOL, DIST.: SOLAPUR, STATE: MAHARASHTRA. FOR EXPANSION OF "ACTIVE PHARMACEUTICAL INGREDIENTS & INTERMEDIATES" MANUFACTURING UNIT OF PRODUCTION CAPACITY 63.7 MT/M. COPY OF THE CLEARANCE LETTER IS AVAILABLE WITH THE MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD (MPCB), INDUSTRY AND MAY ALSO BE SEEN AT THE WEBSITE OF MINISTRY OF ENVIRONMENT, FOREST AND CLIMATE CHANGE; NEW DELHI, AT **http://parivesh.nic.in**

FOR "M/S. VAASAVAA PHARMACEUTICALS PRIVATE LIMITED"

**Managing Director**

## जाहीर निवेदन

आम्हाला कळविण्यास आनंद होतो की 'पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय'; भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्या दि. १३.०१.२०२५ रोजीच्या पत्र. क्र. EC24B2404MH5785328N द्वारे 'मे. वासावा फार्मास्युटिकलस प्रायव्हेट लिमिटेड, यांच्या प्लॉट नं. सी २१६, सी २१७ चिंचोली एम. आय. डी. सी., तालुका- मोहोळ, जिल्हा -सोलापूर, महाराष्ट्र येथील ॲक्टिव फार्मा स्टुटिकलस इनग्रेडिएन्दस आणि इन्टरमिडिएट्स विस्तारीकरण उत्पादन क्षमता ६३.७ मेट्रिक टन प्रति माह प्रकल्पास 'पर्यावरण मंजुरी मिळाली आहे. संबधित कागदपत्रांच्या प्रती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कारखाना आणि पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

http://parivesh.nic.in

मे. वासावा फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड करीता

**व्यवस्थापकीय संचालक**

## महत्त्वाचे

### पंतप्रधानांनी केले खो-खो खेळाडूंचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी भारतीय महिला आणि पुरुष संघांचे खो-खो विश्वचषक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले. ते म्हणाले, आजचा दिवस भारतीय खो-खोसाठी खूप मोठा आहे. रविवारी येथे झालेल्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय पुरुष संघाने नेपाळवर ५४-३६ असा शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. महिला संघाने अंतिम सामन्यात नेपाळला हरवून विजेतेपद पटकावल्यानंतर भारतीय पुरुष संघाने हे यश मिळवले. मोदींनी 'एक्स'वर लिहिले, पहिला खो-खो विश्वचषक जिंकल्याबद्दल भारतीय महिला संघाचे अभिनंदन. हा ऐतिहासिक विजय त्यांच्या अतुलनीय कौशल्य, दृढनिश्चय आणि सांघिक भावनेचा परिणाम आहे. या विजयामुळे भारतातील सर्वात जुन्या पारंपरिक खेळांपैकी एकाला अधिक प्रसिद्धी मिळाली आहे आणि यामुळे देशभरातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल. या कामगिरीमुळे येणाऱ्या काळात अधिक तरुणांना या खेळात सहभागी होण्यासाठी मार्ग मोकळा होईल अशी आशा आहे.

### ईस्ट बंगालकडून नीता एफएचा ४-१ पराभव

**भुवनेश्वर :** ईस्ट बंगाल फुटबॉल क्लबने पुन्हा एकदा शानदार कामगिरी केली आणि सोमवारी येथे झालेल्या इंडियन वुमेन्स लीग सामन्यात नीता एफएचा ४-१ असा पराभव केला. या विजयासह, ईस्ट बंगाल फुटबॉल क्लबने तीन सामन्यांतून नऊ गुण मिळवून गुणतालिकेत आपले अव्वल स्थान मजबूत केले आहे. बंगालकडून अंजू तमांगने ३० व्या मिनिटाला, सौम्या गुगुलोथने ४८ व्या मिनिटाला रेस्टी नानजिरीने ५० व्या मिनिटाला आणि संध्या रंगनाथनने ६७ व्या मिनिटाला गोल केले. घानाच्या स्ट्रायकर गिफ्टी अचेमपोंगने ६१ व्या मिनिटाला यजमान संघासाठी एकमेव गोल केला. तीन सामन्यांत एक विजय, एक बरोबरी आणि एका पराभवासह चार गुणांसह नीता एफए दुसऱ्या स्थानावर आहे.

### चॅम्पियन्स चषक जिंकून पुन्हा आनंद साजरा करू

**मुंबई :** जून २०२४ मध्ये, भारतीय संघाने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टी-२० विश्वचषक जिंकला. भारतीय संघाला जवळजवळ ११ वर्षांनी आयसीसी ट्रॉफी जिंकण्यात यश आले. आता भारतीय संघाला २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सहभागी व्हायचे आहे, ज्यासाठी संघाची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेत रोहित शर्मा मेन इन ब्लू संघाचे नेतृत्व करताना दिसेल. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी, भारतीय कर्णधाराने वानखेडेवर आणखी एक आयसीसी चषक आणण्याबद्दल मत व्यक्त केले.गेल्या रविवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान, रोहित शर्मासह मुंबईतील अनेक क्रिकेटपटू या कार्यक्रमात दिसले. यावेळी, भारतीय संघाचा सध्याचा कर्णधार रोहित शर्माने टी-२० विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीबद्दल मत व्यक्त केले. रोहित म्हणाला की, टी-२० विश्वचषकाप्रमाणे, तो चाहत्यांसोबत आणखी एक विजय साजरा करू इच्छितो.

### बॅडमिंटन प्रशिक्षकांचे वेतन वाढवण्यावर काम

**नवी दिल्ली :** भारतात बॅडमिंटन प्रशिक्षकांची संख्या वाढली आहे, परंतु चांगल्या सुविधांच्या अभावामुळे त्यांचे परदेशात जाण्याचे प्रमाण देखील खूप जास्त आहे. हे लक्षात घेऊन, बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडिया भारतीय खेळांचे एक नवीन मॉडेल बनवण्याची योजना आखत आहे. त्यानुसार भारतीय बॅडमिंटन प्रशिक्षकांचे वेतन वाढवणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. गेल्या तीन वर्षांत, पारुपल्ली कश्यप आणि आरएमव्ही गुरुसाईदत्त सारख्या अव्वल खेळाडूंनी पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे. ते एचएस प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत आणि प्रियांशु राजावत यासारख्या पुरुष एकेरी खेळाडूंसह तरुण खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धा आणि ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या माजी पुरुष दुहेरी जोडी मनू अत्री आणि बी सुमित रेड्डी यांनी तरुण दुहेरी खेळाडूंना प्रशिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

### अनुप श्रीधर सिंगापूरचे प्रशिक्षक म्हणून नियुक्त

**सिंगापूर :** भारताचा माजी बॅडमिंटन खेळाडू अनुप श्रीधर याला सोमवारी सिंगापूर बॅडमिंटन असोसिएशनने (एसबीए) एकल प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले. त्याने देशासाठी आशियाई स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. तथापि, दक्षिण कोरियाचा किम जिन ह्युन एसबीएचा मुख्य प्रशिक्षक आणि महिला संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून राहील. एसबीएचे उपाध्यक्ष प्रा. डेव्हिड टॅन यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, त्याच्या नियुक्तीची तारीख अद्याप निश्चित केलेली नाही कारण ती त्याच्या काम रसाठी व्हिसा मंजुरीवर अवलंबून असेल. आम्हाला नक्कीच ताश शक्य तितक्या लवकर संघात सामील व्हावा अशी आमची इच्छा आहे.

# हंगामातील पहिल्या विजेतेपदावर सात्त्विक-चिरागचे लक्ष

### आजपासून इंडोनेशिया मास्टर्स सुपर ५००



**जकार्ता, २० जानेवारी**

सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही भारतीय पुरुष दुहेरी जोडी मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या इंडोनेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत वर्षातील पहिले विजेतेपद जिंकण्याच्या ध्येयाने मैदानावर उतरेल, तर लक्ष्य सेन वर्षातील निराशाजनक सुरुवात मागे टाकल्यानंतर पुनरागमन करण्याच्या तयारीत आहे.

जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या सात्त्विक आणि चिरागची जोडी उत्तम फॉर्ममध्ये आहे. या स्टार जोडीने गेल्या दोन स्पर्धा, मलेशिया ओपन सुपर १००० आणि इंडिया ओपन सुपर ७५० च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. सात्त्विक आणि चिराग दोघेही उपांत्य फेरीत सरळ सेटमध्ये पराभूत झाले आणि आता त्यांचे लक्ष्य स्पर्धेत आणखी पुढे जाण्याचे राहणार आहे. ही भारतीय जोडी इंडोनेशिया मास्टर्समध्ये आपल्या मोहिमेची सुरुवात चायनीज तैपेईच्या चेन झी-रे आणि यू चिह लिन यांच्याविरुद्ध करेल.

भारताच्या एकल खेळाडू लक्ष्य सेन आणि पी. व्ही. सिंधूसाठीही आव्हान सोपे राहणार नाही. गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या सेनला गेल्या दोन स्पर्धांमध्ये पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला होता आणि तो येथे त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न करेल.

आणखी एक भारतीय खेळाडू प्रियांशु राजावत देखील मुख्य फेरीत आपले आव्हान सादर करेल. त्याचा पहिला सामना जपानच्या कोडाई नारोका विरुद्ध असेल. पुरुष एकेरीच्या पात्रता फेरीत किदाम्बी श्रीकांत आणि किरण जॉर्ज हे भारतीय खेळाडू एकमेकांसमोर येतील.

महिला एकेरीच्या ३२ व्या फेरीत, सिंधू आपल्या मोहिमेची सुरुवात चिनी तैपेईच्या सुंग शुओ युनविरुद्ध करेल. त्यांच्याशिवाय, आकर्षी कश्यपचा सामना जपानच्या नोझोमी ओकुहाराशी होईल आणि अनुपमा उपाध्यायचा सामना स्थानिक खेळाडू ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंगशी होईल. इंडिया ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा पराभव झाला आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती भारतीय खेळाडू येथे त्याची भरपाई करण्यास उत्सुक असेल.

तनिषा क्रॅस्टो आणि अश्विनी पोनप्पा या त्यांच्या महिला दुहेरी मोहिमेची सुरुवात थायलंडच्या ऑर्निचा जोंगसाथापोर्नपर्न आणि सुकिता सुवाचाई यांच्याविरुद्ध करतील. *(वृत्तसंस्था)*

# लखनौ सुपर जायंट्सच्या कर्णधारपदी ऋषभ पंत

### २७ कोटींना विकत घेतले

**कोलकाता, २० जानेवारी**

भारताचा धडाकेबाज फलंदाज ऋषभ पंतची लखनौ सुपर जायंट्सच्या (एलएसजी) कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. तो केएल राहुलची जागा घेणार आहे.

पंतची नियुक्ती जाहीर करताना फ्रेंच्यायझीचे मालक संजीव गोयंका म्हणाले, तो एक जबरदस्त खेळाडू आहे. मला वाटते की तो आयपीएलचा सर्वोत्तम कर्णधार होऊ शकतो. मेगा लिलावानंतर पंतला लखनौचा कर्णधार बनवण्याची चर्चा होती. फ्रेंच्यायझीने





### माझ्यावरील विश्वास सार्थ ठरवीन

मी माझे २०० टक्के देईन. त्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न करीन. ही एक नवीन सुरुवात आहे. नवीन हंगामात आम्ही चांगली कामगिरी करू अशी आशा आहे, असे ऋषभ पंतने सांगितले. मी माझ्या नवीन टीमसोबत खूप खूश आहे. संघात युवा आणि वरिष्ठ खेळाडूंचा समतोल चांगला आहे. आता या फ्रेंच्यायझीला नव्या उंचीवर कसे नेणार याचा विचार करायला हवा, याविषयी त्याने मत व्यक्त केले. पंतसाठी एलएसजी हा आयपीएलमधील दुसरा संघ आहे. यापूर्वी त्याने २०१६ मध्ये दिल्ली कॅपिटल्समधून आयपीएलमध्ये कारकीर्दीची सुरुवात केली होती. त्यावेळी डेअरडेव्हिल्सने (दिल्ली कॅपिटल्सचे जुने नाव) २०१६ च्या लिलावात त्याला १.६ कोटी रुपयांना विकत घेतले होते.

नोव्हेंबर-२०२४ मेगा लिलावात पंतला २७ कोटी रुपयांना विकत घेतले होते. यासह पंत आयपीएलचा सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. पंतने यापूर्वी तीन हंगामात (२०२१, २०२२ आणि २०२४) दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व केले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघ २०२१ प्लेऑफमध्ये पोहोचला. कार अपघातानंतर तो २०२३ च्या हंगामातून बाहेर पडला होता. ऋषभ पंत लखनौ सुपर जायंट्समध्ये केएल राहुलची जागा घेणार आहे. केएल राहुलने मागील हंगामात (२०२२, २०२३, २०२४) एलएसजीचे नेतृत्व केले. पहिल्या दोन वर्षांत या संघाने प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला, मात्र अंतिम फेरी गाठू शकला नाही. *(वृत्तसंस्था)*

## मला काहीही सिद्ध करण्याची आवश्यकता नाही : पटेल

**कोलकाता, २० जानेवारी**

डावखुरा गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल हा कोणत्याही वेळी अनुभवी रवींद्र जडेजाची जागा घेऊ शकतो. परंतु मला कोणालाही काहीही सिद्ध करण्याची गरज नाही, असा दावा अक्षर पटेलने केला आहे. अक्षर सोवारी ३१ वर्षांचा झाला. अक्षरने आपल्या ११ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत तिन्ही स्वरूपात १८४ गडी बाद केले. त्यापैकी ५५ गडी १४ कसोटी सामन्यात घेतल्या. या १४ पैकी दोन सामन्यात अष्टपैलू जडेजा खेळला नव्हता. भारतीय क्रिकेटमधील बदलांबद्दल आणि त्याचा फायदा होईल का असे विचारले असता तो म्हणाला की, नक्कीच, बदलाचे युग येणार आहे. पण शेवटी हा निवडकर्त्यांचा आणि कर्णधाराचा निर्णय असतो. मला कोणालाही काहीही सिद्ध करण्याची गरज नाही. माझे काम, मला सोपवलेली भूमिका पार पाडण्यावर आणि सतत सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित करणे आहे.



मेलबर्न येथे सोमवारी झालेल्या ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये चौथ्या फेरीच्या सामन्यात युक्रेनची एलिना स्वितोलिना रशियाच्या वेरोनिका कुडरमेतोवालाचा फटका परतवताना

## रणजी सामन्यासाठी रोहित, यशस्वी मुंबईच्या संघात

### अजिंक्य रहाणे कर्णधार



**मुंबई, २० जानेवारी**

२३ जानेवारीपासून येथील एमसीए-बीकेसी मैदानावर होणाऱ्या जम्मू आणि काश्मीर विरुद्धच्या रणजी करंडक सामन्यासाठी सो वारी भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि युवा सलामीवीर यशस्वी जयस्वाल यांचा म ुंबईच्या संघात सम ावेश करण्यात आला आहे. अनुभवी खेळाडू अजिंक्य रहाणे संघाचा कर्णधार राहणार आहे. शनिवारी रोहितने रणजी ट्रॉफीच्या पुढील फेरीत आपला सहभाग निश्चित केला होता. घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत खराब कामगिरी केल्यानंतर रोहितच्या दीर्घ फॉर्मबद्दल काही काळापासून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अलिकडेच सर्व करारबद्ध खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेटमध्ये भाग घेणे अनिवार्य केले आहे.

## उमाबाई श्राविका विद्यालयाचा चित्रकला परीक्षेचा निकाल शंभर टक्के



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

सप्टेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला परीक्षा एलिमेंट्री व इंटरमीजीएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा या दोन्ही परीक्षांमध्ये प्रशालेचा शंभर टक्के निकाल लागला.

या मध्ये एलिमेंट्री ड्रॉइंग ग्रेड परीक्षेमध्ये ६ विद्यार्थ्यांना ए ग्रेड २३ विद्यार्थ्यांना बी ग्रेड व ३९ विद्यार्थ्यांना सी ग्रेड मिळाला.

तसेच इंटरमीडिएट परीक्षांमध्ये ७ विद्यार्थ्यांना ए ग्रेड, २५ विद्यार्थ्यांना बी ग्रेड व १६ विद्यार्थ्यांना सी ग्रेड मिळाला. सर्वांना कलाशिक्षक प्रवीण कंदले यांचे मार्गदर्शन मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्राविका संस्थेचे विश्वस्त यतीन शहा, अंजली शहा, डॉ रोहिणी शहा, अतुल शहा, अनिल जमगे, सीईओ देवई शहा ,वरिष्ठ दिप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुर मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित,पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

**एलिमेंट्री ड्रॉइंग ए ग्रेड :** आरोषी कोळी, प्रणाली माळी, श्रवण मकरिये, श्रुती शिंदे, श्रुतिका सुरवसे, श्रद्धा सुरवसे

इंटरमीडिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा पात्र **विद्यार्थी :** आर्या होनपारखे, भक्ती वराडे, अक्षदा गुरव धनश्री होनपारखे, समृद्धी भांडेकर, संस्कृती कसबे.



## शोएब कुरेशी तिरंगा क्लासिकचा मानकरी

### जिल्हा शरीरसौष्ठव स्पर्धा : अकबर कुरेशी उपविजेता

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

श्री छत्रपती रंगभवन येथे झालेल्या जिल्हा शरीरसौष्ठव स्पर्धेत सोलापूरचा शोएब कुरेशी हा तिरंगा क्लासिक २०२५ चा विजेता ठरला. अकबर कुरेशीला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

५५, ६०, ६५, ७०, ७५ व ७५ किलोवरील अशा ६ वजनी गटात प्रत्येक गटात २५००, २०००, १५०० व १ हजार अशी ४ बक्षिसे सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन विजयी खेळाडूंना गौरविण्यात आले. या स्पर्धेत माढा, करमाळा, पंढरपूर, अकलूज, अक्कलकोट, धाराशिव, टेंभुर्णी येथून ८० स्पर्धकांनी भाग घेतला होता. प्रत्येक गटातील विजयी खेळाडूमधून झालेल्या स्पर्धेत शोएब कुरेशी सरस ठरला. त्याला १० हजार रुपये, सन्मान चिन्ह व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. प्राईस रियालीटीचे बिल्डर्स इरफान शेख, रोहन डेव्हलपर्सचे रोहन फाळके स्मार्ट सिटी डेव्हलपर्सचे शैलेश वाघमारे यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. के.राज. फिटनेस जीमचे ऋषिकेश कटकधोंड व आरिफ मदेवार यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. जिल्हा सचिव प्रमोद काटे, नझीर शेख, आसिफ शेख, शकील बडेघर, शफि शेतसंदी, शरणकुमार कुंभार, राजकुमार अलगुडे व रतिकांत पाटील यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, अजित कंडरे, मनोज भागवत, प्रतिक भागवत, पृथ्वी सुरवसे, गोरख गडसिंग व अल्ताफ सिद्दीकी यांनी अभिनंदन केले.

### सोलापूर जिल्हा संघ जाहीर

या स्पर्धेतून पनवेल (रायगड), संभाजीनगर व थेऊर पुणे येथील स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचा संघ निवडण्यात आला.

संघ : सलीम शेख (पंढरपूर), अक्षय जगताप (माढा), योगेश सवारे (बार्शी), वैभव होळकर, अजय जमादार, गणेश जाधव, आकाश वाघमारे, निखिल चव्हाण, अकबर कुरेशी, समाधान पुणेकर, सोहेब कुरेशी, यशपाल वाघमारे (सर्व सोलापूर).

## 'एसव्हीसीएस'च्या आवताडेची राज्य स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**



श्री छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे झालेल्या जिल्हास्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत १७ वर्षे वयोगट मुलींच्या स्पर्धेत ७० किलो वजन उचलत एस. व्ही.सी.एस. हायस्कूल एम आय डि सी येथील श्रावणी आवताडेनी प्रथम क्रमांक पटकावली असून तिची राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूला क्रीडा शिक्षक हनुमंत यळमेली यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोष कुमार तारके यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## लिटिल स्टार इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी**

कुमठे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लिटिल स्टार इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

याचे उद्घाटन संस्थेचे प्रमुख जयकुमार माने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विश्वस्त प्रा. स्वाती माने उपस्थित होत्या. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या व सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत माने यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापिका शुभांगी पवार, शाळा समन्वयक एम.जी. कोरे, हायस्कूलचे मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नाईकनवरे उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी क्रीडा शिक्षक विक्रम पवार, ओम जमादार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल मागाडे यांनी केले. अनघा कौजलगी यांनी आभार मानले.



## तायक्कांदो स्पर्धेत रावजी सखाराम हायस्कूलची ९ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

प्रोटॉन क्लब पुणे येथे आयोजित तायक्कांदो स्पर्धेमध्ये रयत शिक्षण संस्था संचलित रावजी सखाराम हायस्कूलच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण, २ रौप्य, ३ कांस्य पदकासह ९ पदकांची कम ाई केली.

सानिका गायकवाड, दिव्या कोने, अंश जाधव, ओम जगदाळे यांना सुवर्ण व सृष्टी शिंदे, प्रलय माने यांना रौप्य तर नम्रता बनसोडे, वैष्णवी शिंदे, राज जाधव यांना कांस्य पदक मिळाले. त्यांचे संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील, संस्था सदस्य प्राचार्य डॉ सुरेश देरे, स्थानिक व्यवस्थापन कमिटीचे सदस्य केतनभाई शहा, उद्योजिका माधुरीताई पाटील, कर सल्लागार धीरज जवळकर, मुख्याध्यापक संतोष वालवडकर, मुख्याध्यापिका कल्पना सर्वगोड, अमर देशमुख, चंद्रकला भोरे, क्रीडा शिक्षक अझहर शेख आदींनी अभिनंदन केले.

**बेस्ट फायटर पुरस्कार**

सानिका गायकवाड, दिव्या कोने, ओम जगदाळे या खेळाडूंना बेस्ट फायटर पुरस्कार देऊन पुणे येथे विशेष सन्मानित करण्यात आले.

## महावीर हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी**

विकास नगर येथील महावीर हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास उत्साहात सुरुवात झाली. याचे उद्घाटन जेष्ठ शिक्षक अभिनंदन विभूते, मुख्याध्यापिका उज्वला पाटील यांच्या हस्ते झाले.

या क्रीडा सप्ताहात कबड्डी, रस्सिखेच, संगीत खुर्ची, बॅडमिंटन, स्लो सायकलींग क्रिकेट अशा सांघिक व वैयक्तिक प्रकारच्या स्पर्धा होतील. या क्रीडासप्ताहच्या उद्घाटन प्रसंगी विभूते म्हणाले की विद्यार्थ्यांना अभ्यासाइतकच खेळ महत्वाचा आहे खेळामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक विकास होतो. मुख्याध्यापिका पाटील म्हणाले की प्रत्येकाने कोणत्याही एक खेळ खेळायला पाहिजे खेळामुळे नेतृत्व आणि खेळाडूवृत्ती निर्माण होते. क्रीडा सप्ताह यशस्वी करण्यासाठी शिक्षक विजय पाटील, संजय बिडवाई, क्रीडा शिक्षक राजेंद्र खोत, मनीषा निनगुरकर व शिक्षकेतर कर्मचारी आनंद कोठे, महेश म्हेता, मोहन साळुंखे, दीपक चौधरी आदी परिश्रम घेत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# नामसंकीर्तन सभागृहाचे ८० टक्के काम पूर्ण

## केवळ २० टक्केच काम बाकी; राज्य शासनाने उर्वरित वीस टक्के कामासाठी निधी दिल्यास चार ते सहा महिन्यांत होणार काम

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२० जानेवारी-**

महाराष्ट्रातील तमाम नाट्य रसिकांसाठी अतिशय भव्य, अद्ययावत आणि सुसज्ज असे 'नामसंकीर्तन सभागृह' पंढरपूर सारख्या अध्यात्मिक नगरी मध्ये उभारण्यात आले आहे. या सभागृहाचे जवळपास ऐंशी टक्के काम पुर्ण झाले असून केवळ वीस टक्केच काम बाकी आहे. जर राज्य शासनाने आणखीन राहिलेल्या वीस टक्के कामासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन दिला तर येत्या चार ते सहा महिन्यात या नामसंकीर्तन सभागृहाचे काम पुर्ण होवून आषाढी एकादशीच्या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या भव्य वास्तुचा लोकार्पण सोहळा देखील होवू शकतो आहे. त्यामुळे शासनाने केवळ वीस टक्के कामासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी पंढरपूरकर तसेच राज्यातील तमाम नाट्यरसिकांकडून केली जात आहे.

राज्याचे तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगुंटीवार यांनी विठ्ठलच्या पंढरीनगरी मध्ये भव्य असे नामसंकीर्तन सभागृह उभारले जावे या भावनेतून 'नामसंकीर्तन सभागृहाच्या कामास मंजुरी देवून त्यासाठी अर्थमंत्री म्हणून भरघोस निधीची तरतूद देखील केलेली होती. पंढरपूर पालिकेने या नाट्यगृहासाठी दोन ते अडीच एकर जागा देखील उपलब्ध करुन दिलेली आहे. या नामसंकीर्तन सभागृहासाठी आत्ता पर्यंत दोन टप्प्यात सुमारे ५२ कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यामुळेच या नामसंकीर्तन गृहाची अतिशय देखणी वास्तू पंढरपूरात आकारास आलेली आहे. या नामसंकीर्तन सभागृहाच्या प्रवेशाच्या ठिकाणी अतिशय सुंदर असे श्री विठ्ठलाचे मंदिर उभारण्यात आले आहे. यातील व्यासपीठ (स्टेज) हे तब्बल ४ हजार स्केअर फूटाचे आहे. यामध्ये कलाकारांसाठी स्वतंत्र चेंजिंग रूम्स आहेत. त्यामध्येच डायनिंगची देखील सोय आहे. त्याच्या ठीमागील बाजूस जेवणासाठी आणि पार्किंगसाठी मोठी जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या बरोबरच नामसंकीर्तन सभागृहात साऊंड सिस्टिम व लाइटिंगची आधुनिक पद्धतीने रचना करण्यात आली आहे. दरम्यान या नाम संकीर्तन सभागृहाच्या पूर्णत्वासाठी वारंवार पाठपुरावा होणे गरजेचे आहे. उर्वरीत निधी शासनाकडून वेळेत मिळाल्यास लवकरच सभागृह पूर्ण होईल.



पंढरपुरातील नामसंकीर्तन सभागृह हे महाराष्ट्रातील अतिशय सुंदर व भव्य असे नाट्यगृह म्हणून ओळखले जाईल. या सभागृहामुळे पंढरपूरच्या वैभवात निश्चितच भर पडणार आहे. येत्या काळात हे काम पुर्ण होईल. नाट्यरसिक तसेच नागरिकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. नाट्यगृह पूर्ण होण्यासाठी राज्यशासनाकडून निधी मिळण्याबाबत पंढरपूर नगरपरिषदेला पुर्ण सहकार्य मिळत आहे.

**- डॉ. प्रशांत जाधव, मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर**

### टप्पा एक, दोनसाठी शासनाकडून मिळाला भरीव निधी

नामसंकीर्तन सभागृह टप्पा क्रमांक एक मध्ये मंजुरी निविदा रक्कम २६ कोटी ९२ लाख यामध्ये पूर्ण आरसीसी काम, फेरो सिमेंट, दगड काम, अंडरग्राउंड वॉटर टँक असे कामाचे स्वरूप होते. तर टप्पा क्रमांक २ मध्ये मंजूर निविदा रक्कम २५ कोटी ८८ लाख यामध्ये सिलिंग काम, लाइटिंग काम, एअर कंडिशन, फायर काम, कंपाउंड वॉल, ट्रान्सफारमेंट सिस्टीम, स्टेज लायजिंग, सेटिंग अरेंजमेंट आणि लिफ्ट असे कामाचे स्वरूप आहे.

### नगरपालिकेकडून निधीची अपेक्षा

या नामसंकीर्तन सभागृहाचे आत्तापर्यंत ऐंशी टक्के ऐवढे कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित वीस टक्के काम केवळ बाकी राहिलेले आहे. या वीस टक्के कामासाठी निधी नगरपालिका प्रशासनाने दिल्यास येत्या सहा ते आठ महिन्यातच हे काम पूर्ण होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त



### तडवळेतील यशवंतराव चव्हाण प्रशालेमध्ये हळदी-कुंकू समारंभ

**वैराग, दि. २० जानेवारी-**

तडवळे येथील यशवंतराव चव्हाण प्रशालामध्ये मकर संक्रांतीच्या निमित्ताने हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सुरुवातीला विठ्ठल-रुक्मीणीच्या मूर्तीचे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उखाणे, संगीत खुर्ची या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी संगीत खुर्ची स्पर्ध्येमध्ये प्रथम शुभांगी शंकर निंबाळकर, द्वितीय भाग्यश्री राजेंद्र वाघ तर तृतीय लक्ष्मी तानाजी निंबाळकर यांचा आला आहे. विजेत्या महिलांना सन्मानपत्र प्रशालेचे मुख्याध्यापक सुनिल भोसले यांच्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर तीळगुळ वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक सुनील भोसले, दादासाहेब जाधव, दीपक गायकवाड, ताटे, रोहित भोसले, गणेश गोसावी, कुडवे, वर्षा जाधव, कारंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन दादा जाधव यांनी केले.

### नागेश खेडकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर



**माढा, दि. २० जानेवारी-**

माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक नागेश खेडकर यांना पुणे येथील महात्मा जोतिबा फुले इतिहास अकादमी यांच्याकडून दिला जाणारा महात्मा जोतिबा फुले-सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असून गुरूवारी २३ जानेवारी रोजी पुण्यात वितरण करण्यात येणार आहे. त्यांच्या कामाची दखल घेत महात्मा फुले इतिहास अकादमीचे अध्यक्ष प्रा. श्रीमंत कोकाटे व सचिव राहुल पोकळे यांनी हा पुरस्कार त्यांना जाहीर केला आहे. या पुरस्काराचे वितरण युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्या हस्ते होणार असून या समारंभाला माजी आमदार दत्तात्रय सावंत, आयकर अधिकारी विपुल वाघमारे, शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, श्रीलेखा पाटील, गणेश देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




### नांदोरे येथील एसपी स्कूलचे बुद्धिवंत प्रज्ञाशोधमध्ये यश

**करकंब, दि. २० जानेवारी-**

बुद्धिवंत पब्लिकेशनतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बुद्धिवंत प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये पायल फाउंडेशन नांदोरे संचलित एसपी स्कूलच्या २३ विद्यार्थ्यांनी केंद्र, जिल्हा तसेच राज्य यादीमध्ये स्थान मिळवून नेत्रदिपक यश संपादन केले. सहावीमधून वेदांत संतोष वलगे राज्यात प्रथम, दुसरीमधून श्रेया महेश जिरेकर राज्यात द्वितीय, स्मृती सोमनाथ वलगे व अंजुम युन्नुस शेख जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळविला. दुसरीमधून कल्याण उलभगत, तनिषा उलभगत, धनुष मोहरे, श्राव्या सातुरे, तिसरीमधून अनिरुद्ध गायकवाड, ऋतुजा सातुरे, करण भिंगारे, सानवी मुळे, ओमराज कदम, चौथीमधून यशराज व्यवहारे, संस्कार पाटील, प्रगती पाटील, वेदिका उलभगत, शौर्य सातुरे, आदर्श वलगे, सहावीमधून पूजा सुतार, दानवी नरसाळे, सिद्धांत भिंगारे व कल्याणी उलभगत या विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरीय यादीमध्ये स्थान मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक डॉ. नंदकुमार होनराव, संस्थेचे अध्यक्ष डॉ. संतोष वलगे, सचिव अश्वराज वाघ, खजिनदार विक्रम भिंगारे, सहसचिव बाळासाहेब चव्हाण, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण यांनी अभिनंदन केले.

### भंडारकवठे येथे डॉ. अमृतानंद महास्वामीजी यांचे अध्यात्मिक प्रवचन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**



अध्यात्मिक सेवा समिती, भंडारकवठे यांच्या वतीने गुरुदेव आश्रम, बालगाव, येथील डॉक्टर अमृतानंद महास्वामीजी यांचे अध्यात्मिक पंधरा दिवसीय प्रवचन कार्यक्रमाचे शुभारंभ २० जानेवारी रोजी करण्यात आला. अध्यात्मिक प्रवचन कार्यक्रम २० तारखेपासून सकाळी ६.३० ते ७.३० पर्यंत जीवन विकास प्रशालेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रम सोहळ्याला परमपूज्य पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी (माळकवटे), श्री गुरु गुरुपादेश स्वामीजी (हाताळी),बसवराज स्वामीजी अमोघसिद्धेश्वर मठ (बोरगाव), भरतमुनी महाराज (बसवनगर), महांतेश हिरेमठ (तदेवाडी), बसवानंद स्वामीजी (गदग) या प्रमुख स्वामीजींच्या उपस्थितीत अध्यात्मिक कार्यक्रम सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमावेळी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे सचिव एमडी कमळे यांनी डॉक्टर अमृतानंद महास्वामी यांचे स्वागत केले. सामाजिक जीवन जगत असताना सध्या मूल्यशिक्षण गरजेचे आहे सुख, शांती, समाधान चांगल्या कर्माने येते ना की धन संपत्तीने, असे मत महांतेश हिरेमठ (तदेवाडी) यांनी व्यक्त केले. या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ जास्तीत जास्त सद्भक्तांनी घ्यावा, असे आवाहन अध्यात्मिक सेवा समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

### मलिकपेठ येथे पिता-पुत्राला मारहाण

**मोहोळ, दि. २० जानेवारी-**

तू बारसकर व राजू खरे यांचे स्टेटस् का ठेवतो म्हणून अजित पवार गटाच्या कार्यकर्त्याने फिर्यादीस व त्याच्या वडीलास शिवीगाळ व दमदाटी केली. ही घटना मलिकपेठ (ता. मोहोळ) येथे घडली.

याबाबतची हकीकत अशी की, मालिक पेठ (ता. मोहोळ) येथील गणेश तानाजी माळी हे मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर व शरद पवार गटाचे विद्यमान आमदार राजू खरे यांचे पक्षाचे काम करतात. हे व त्याच्या फोटोच वेगवेगळे स्टेटस त्यांच्या मोबाइलवर ठेवतात. हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नागेश साठे यांना योग्य वाटले नाही. आवडले नाही, म्हणून त्यांनी गणेश माळी यांना मारहाण केल्याची घटना घडल्याने अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.




### डॉक्टर प्रिमियर लिगमध्ये श्रीपूर वारियार्स अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २० जानेवारी-**

येथील डॉक्टर्स व मेडिकल असोसिएन यांच्यावतीने घेण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत श्रीपूर वारीयर्स अजिंक्यपद पटकाविले तर यशवंतनगरच्या लॉयन्स संघ उपविजेता ठरला.

येथील डॉक्टर्स व मेडिकल असोशिएन यांच्यावतीने १७ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान माळशिरस डॉक्टर प्रिमियर लिग २०२५ क्रिकेट स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेचे उद्घाटन डॉ एम.के.इनामदार यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत अकलूज सुपर किंग्ज, श्रीपूर वारीयर्स, यशवंतनगर लॉयन्स, वेळापूर, अश्विनी हॉस्पिटल अकलूज, पंढरपूर वारीयर्स, एलेवन स्टार्स, माळशिरस एलेवन या आठ संघांनी सहभाग घेतला. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत श्रीपूरच्या संघाने अजिंक्यपद पटकाविले तर यशवंतनगर लॉयन्स संघ उपविजेता ठरला.या विजयी व उपविजेत्या संघास मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. टी. आर. कदम, डॉ. संजय सिद, डॉ. संजय गायकवाड, एपीआय जानकर, माळशिरस मेडिकल असोसिएनचे सर्व सदस्य तसेच आयएमए संघटना, निमा संघटना व होमिओपॅथिक संघटनेचे सर्व सदस्य, अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

### विजयपुरात तीन कामगारांना अमानुष मारहाण; तिघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. २० जानेवारी-**

विजयपूर शहराजवळील गांधी नगर येथे रोजंदारीवर काम करणाऱ्या तीन कामगारांना अमानुष प्रकारे मारहाण करण्यात आल्याची तक्रारीवरुन पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

कामगार सदाशिव बसाप्पा मादार सदाशिव चंद्रप्पा बबलदी आणि उमेश मलप्पा मादार यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यांतर्गत बसवनगर येथील खेमू राठोड यांच्या मालकीच्या इटंगी भाटी येथे काम करून राहत होते. दि. १३ जानेवारी संक्रमण सणानिमित्त सर्व कामगार आपापल्या गावी गेले. दि. १५ जानेवारी रोजी वीट भट्टीच्या मालकाने काम गारांना बोलावून कामावर येण्यास सांगितले, त्यानंतर कामगारांनी सणासुदीच्या खर्चासाठी १० हजार रुपये मागितले, मालक खेमू राठोड त्यांना बोलावून घेतले व मुलगा रोहन राठोड आणि इतर काही जणांनी मिळून एका खोलीत कामगारांचे हातपाय बांधून त्यांना प्लॅस्टिकच्या पाईपने मारहाण करून खोलीत डांबून ठेवले. नंतर १८ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता कामगारांना खोलीतून बाहेर काढण्यात आले आणि पुन्हा मारहाण करण्यात आली असे तक्रारीत म्हटले आहे. सदर घटनेबाबत विजयपूर ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हा दाखल. खेमू राठोड, सचिन मानवर, विशाल जुमनाळ या तीघांना याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींना पकडण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

### विष्णुपंत देशपांडे इंग्लिश मीडियम कृतीशिल शाळा पुरस्काराने सन्मानित




**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २० जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने दिला जाणारा 'कृतिशील शाळा पुरस्कार श्री विष्णुपंत देशपांडे इंग्लिश मिडीयम स्कूल, मंद्रुप या प्रशालेस माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी गुरूनाथ वांगीकर, शंकर वडणे, राजेंद्र आसबे, मारुती गायकवाड, समाधान घाडगे, सरदार नदाफ व कृती समितीचे पदाधिकारी, विष्णुपंत देशपांडे इंग्लिश मिडियम स्कूलचे संस्थापक यल्लप्पा खंदारे, मुख्याध्यापिका संगीता शिंदे, एस. बी. बिराजदार, एस. ए. साबळे, आर. एस. सुतार, ए. जी. पवार, बी. टी. कांबळे, एम. जे. मोमीन, एस. एस. कुंभार, एस. एस. तेली, एम. आर. डोकडे, एस. ए. बगले, जी. आर. अडोळे, पी. एम.भोसले, एन. एम. पाटील, आर. एम. व्हनमाने, के. जी. जमादार, आर. एन. मुजावर, आर. एस. गजाकोश, आर. ए. गजाकोस, एम. जी.भिमदे, एम. डी. देशपांडे, एन. ए. सय्यद शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आनंद बाजारातून मिळतेय व्यवहाराचे ज्ञान : काळे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

येथील दत्तनगरमधील माऊली प्री इंग्लिश स्कूलमध्ये आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सुमारे ४५ विद्यार्थ्यांचे स्टॉल होते तर ३७ हजार रुपयांची उलाढाल झाली. यातून व्यवहाराचे ज्ञान मिळत असल्याचे उमेश काळे यांनी सांगितले.

सर्व प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, इडली, समोसा, वडापाव, कचोरी, भेळ, पाणीपुरी, बदाम शेक, फळे इत्यादी खाद्यपदार्थ, स्टेशनरी, किराणा सामान, इमिटेशन ज्वेलरी, खेळणी, काही बुद्धिवर्धक आणि मनोरंजक खेळ होते. कार्यक्रमासाठी युवा उद्योजक अभिजीत राऊत, वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे, राणादादा देशमुख, संदीप पवार उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना व्यवहारिक, बौद्धिक गुणांना चालना मिळण्यासाठी,विक्री कौशल्य विकसित होण्यासाठी, व्यवहाराचे प्रत्यक्ष ज्ञान आनंद बाजारातून मिळत असल्याचे मत उमेश काळे यांनी व्यक्त केले. माऊली प्री इंग्लिश स्कूलकडून वृक्ष लागवडीसाठी आवश्यक असणारे साहित्य खोऱ्या, टिकाव, खुरपे वृक्षसंवर्धन समितीस भेट देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. विजयसिंह पाटील, सचिव प्रा. अर्चना पाटील, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# श्रमसंस्कारातून सेवाभाव निर्माण होतो

### माजी प्राचार्य डॉ. किसन झिपरे : सी. बी. खेडगी महाविद्यालयाच्या शिबिरात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२० जानेवारी**

सामाजिक बांधिलकीची भावना व सेवाभाव वृत्तीची शिकवण जीवनात खऱ्या अर्थाने श्रमसंस्कार शिबिरातून प्राप्त होते, असे मत श्री राजेराय मठाचे सचिव तथा माजी प्राचार्य डॉ. किसन झिपरे यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व सी. बी. खेडगी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दहिटणे येथे सात दिवस युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास या ब्रीदवाक्यखाली आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी हे होत्या. यावेळी संस्थेचे सचिव



सुभाष धरणे, प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट, उदगीर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.बसवराज वेळापूरकर, सरपंच नितीन मोरे, माजी सरपंच चन्नवीर बोधले, उपसरपंच विकी चौधरी, ग्रामसेवक पी. एल. पवार, तलाठी पूजा सरोटे, कार्यक्रम अधिकारी डॉ. गुरुसिध्दय्या स्वामी, प्रा. सिध्दाराम पाटील, प्रा. प्रकाश सुरवसे उपस्थित होते. डॉ. झिपरे पुढे म्हणाले, यशस्वी जीवन घडवण्यासाठी जीवनात श्रम व संस्काराची कास धरणे आवश्यक आहे. जग बदलत आहे. पण आपल्या पूर्वजांनी दिलेली संस्काराची व श्रमाची जपणूक करणे आपले कर्तव्य आहे.

#### सुसंवाद लुप्त होऊ नये

विज्ञान तंत्रज्ञानाने जग झपाट्याने बदलत आहे, पण माणसामाणसांतील सुसंवादाचे नाते हे लुप्त होत आहे. संवेदनशील विचाराने आज एकत्र येणे खरी गरज असल्याचे अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट यांनी सांगितले.

सरपंच नितीन मोरे म्हणाले, श्रमाचे महत्त्व व त्याची उपयुक्तता याचे मोल अनमोल आहे. संस्काररूपी समाज निर्मितीसाठी श्रमसंस्कार शिबिरे होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यातूनच सामाजिकतेचे बीजारोपण करणे आवश्यक आहे. यावेळी युवा नेते समाधान होटकर, श्रीकांत चौधरी, शरणप्पा कोळशेट्टी, दादा शेख, राजेंद्र मोरे, बाबाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा. रामकृष्ण कांबळे, प्रा. संध्या इंगळे, डॉ.लता हिंडोळे, डॉ. गीता हारकूड, डॉ. मधुरा गुरव, प्रा. श्रीराम चव्हाण, प्रा. स्नेहा हेबळे, प्रा.दीपिका दिवटे, प्रा. रत्नप्रभा रिंगणे, प्रा. अभिजीत कुंभार, प्रा. महेश पाटील, प्रा. नागेश विजापुरे, ग्रामस्थ मंडळ, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी नागराज भंगुरगे, प्रीती जैनजांगडे, रोहिणी बन्ने, जयभीम इसामंत्री, आकांशा धावर, समर्थ धर्मशाले आदींनी परिश्रम घेत आहेत. प्रास्ताविक डॉ. गुरुसिद्धय्या स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले. प्रा. सिध्दाराम पाटील यांनी आभार मानले. सायंकाळी गावातील प्रमुख मार्गावरून जनजागृतीपर मशाल फेरी काढण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ५१ कोटींच्यावर अनुदान रखडले

## नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दखल घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी अत्याधुनिक शेती करण्याची कास धरुन लाखोंचे उत्पन्न काढण्याचे सत्र अवलंबिले आहे. दरम्यान, शासनाकडून या शेतकऱ्यांना विविध योजनांद्वारे देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत नुसती आश्वासने मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी दैनिक तरूण भारतकडे नाराजी बोलून दाखविली. दरम्यान, याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून माहिती घेतली असता ५१ कोटी ९३ लाखांचे अनुदान रखडल्याची अधिकृत माहिती मिळाली.



दरम्यान, नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या गरीब शेतकऱ्यांना ही सवलतीची रक्कम वेळेत मिळावी यासाठी राज्य आणि केंद्र शासनाकडे गतीने पाठपुरावा करावा, अशीही मागणी जाणकार शेतकऱ्यांनी केली आहे.

सन २०२४-२५ योजना निहाय प्राप्त निधी, खर्च निधी व प्रलंबित दायित्वासाठीची विस्ताराने माहिती घेतली असता पुढील माहिती मिळाली. जिल्ह्यात राष्ट्रीय कृषी विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक या योजनेचे ७ हजार ६२६ लाभार्थी शेतकऱ्यांचा २३ कोटी ४१ लाखाचे अनुदान प्रलंबित आहे. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना-पुरक अनुदान या योजनेतील १३३४ लाभार्थ्यांचे २ कोटी २० कोटी थकले आहेत. भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना लागवडीतील २ हजार ८९३ शेतकऱ्यांचे १६ कोटी ७८ लाख थकले आहेत. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेचे सानुग्रह अनुदान २ कोटी ७० लाख थकले आहेत. तर चालू आर्थिक वर्षातील ३ कोटी ५१ ला येणे आहेत. तर इतर शेतकऱ्यांच्या लाखातील थकीत रकमा वेगळ्या आहेत. अशी जवळपास १९ हजार २१२ शेतकऱ्यांचे विविध योजनांतील अनुदान ५१ कोटी ९३ लाखाची रक्कम शासनाकडून येणे थकीत आहे.



हे अनुदान मिळण्यासाठी अनेक शेतकरी कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून तर कधी कार्यालयात येवून थेटतात आणि साहेब, आमचे अनुदान कधी मिळेल हो...अशी आर्त विनवणी करतात. यावेळी संबंधित अधिकारीही ऑनलाईनने आपल्या खात्यावर थेट रक्कम जमा होईल, अशी समजूत काढून वाटं लावतात. बळीराजाने अनुदान येणार म्हणून गावातील सावकार मंडळी, पै-पाहुण्यांकडून उसनवारी केलेली असते किंवा व्याजाने पैसे काढलेले असतात आणि योजना आपल्या शेतात राबविलेली असते. पैसे वेळेत नाही मिळाल्यास बळीराजा आर्थिक कचाट्यात सापडून कर्जबाजारी होतो. यामुळे शासनस्तरावरून हा अनुदान निधी शेतकरी बांधवांना वेळेत वितरित होणे गरजेचे असते.

### चालू आर्थिक वर्षात ५४ कोटी ५७ लाखांचे अनुदान वाटप

राज्य आणि केंद्रीय सरकारकडून शेतकरी बांधवांसाठी विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये अटल भूजल योजना-पुरक अनुदान, ठिबकसिंचन, शेततळी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, फळबाग योजना, सोयाबीन व गळीत धान्य उत्पादकता वाढ, कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री सुक्ष्म खाद्य कृषी उन्नयन योजना अशा विविध योजनांकरिता चालू आर्थिक वर्षात ५५ कोटी ६६ अनुदान प्राप्त झाले तर यातून १९९०३६ लाभार्थी शेतकऱ्यांसाठी ५४ कोटी ५७ लाख ७५ हजार इतका निधी खर्च झाला आहे.

# अल्पवयीन मुलींना दिल्लीला नेण्याचा प्रयत्न उघडकीस

## बेंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस मधील घटना

## मुलींना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात प्रशासनाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

कर्नाटक एक्स्प्रेसमधून जबरदस्तीने दोन मुलींना दिल्लीला नेण्याचा प्रयत्न एक्स्प्रेसमधील टीसींनी प्रवाशांच्या मदतीने उघडकीस आणून त्या मुलींची सुटका करून त्यांना पालकांच्या स्वाधीन केले. बेंगळुरू - नवी दिल्ली कर्नाटक एक्स्प्रेसमध्ये दोन अल्पवयीन मुली रडत असून त्यांना जबरदस्तीने दिल्लीला नेण्यात येत असल्याचे एका प्रवाशाला समजले. सोलापूर ते मनमाड येथे (गाडी नं. १२६२७) बेंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस या ट्रेनमध्ये कर्तव्यावर असणारे सोलापूर रेल्वे विभागातील प्रवासी तिकीट निरीक्षक संतोष कुमार यांच्याकडे एका प्रवाश्याने संपर्क साधून परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रवाशाने तात्काळ अहमदनगर येथील मुख्य तिकीट निरीक्षक संतोष कुमार आणि सूर्यवंशी यांना घटना सांगितली.



पुढे तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी तात्काळ आरपीएफ आणि नियंत्रण कक्ष यांना सदरील घटनेची संपूर्ण वर्णनात्मक माहिती दिली. दरम्यान रेल्वे कर्मचाऱ्यांनी अधिक माहिती गोळा करण्यासाठी मुलींशी संवाद साधला आणि त्यांच्याशी ओळखीची पुष्टी करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला. पुढे ट्रेन बेलापूर स्थानकावर पोहोचल्यानंतर पुढील तपास आणि आवश्यक कारवाईसाठी मुलींना आरपीएफकडे सुरक्षितपणे सोपवण्यात आले. संतोष कुमार आणि सूर्यवंशी यांनी दाखवलेल्या समर्पणामुळे आणि अधिकाऱ्यांनी दिलेल्या जलद प्रतिसादामुळे मुलींना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात रेल्वे प्रशासनाला यश आले. सोलापूर विभाग तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या धाडसी आणि सतर्कतेबद्दल सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक यांनी कौतुक केले.

# मोफत हृदयरोग तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि एसीएस हॉस्पिटलच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि एसीएस हॉस्पिटल सोलापूर त्यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी सोलापूर जिल्ह्यातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनीष केत यांनी प्रस्तावना केली. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलाने कार्यक्रमास सुरुवात झाली. शहराचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, शिवसेनेच्या प्रदेश प्रवक्त्या ज्योती वाघमारे, भाजपा प्रदेश सरचिटणीस वृषाली चालुक्य, ज्येष्ठ पत्रकार राकेश टोळये, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत बडवे, मराठा समाजाचे नेते माऊली पवार, ठाकरे गटाचे युवा सेनाप्रमुख विठ्ठल वानकर, सदर बझार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित लकडे आदी उपस्थित होते.

आयुक्त एम. राजकुमार यांनी पत्रकारांनी फिटनेस संदर्भात माहिती देत दररोज किमान पाच ते दहा किलोमीटर रनिंग केले पाहिजे आणि स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेच असल्याचा मत व्यक्त केले. हृदयरोग तपासणी शिबिरा अगोदर एसीएस हॉस्पिटलचे डॉ. सिद्धांत गांधी यांनी हृदयविकाराचा झटका आल्यानंतर पहिल्यांदा काय केले पाहिजे या संदर्भातील प्रात्यक्षिक सर्वांना दाखवले. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित करण्यात आलेल्या हृदयरोग तपासणी शिबिरामध्ये इसीजी, २ इको, बीपी, शुगर या सर्व तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. सर्व पत्रकारांच्या तपासणीसाठी डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. प्रमोद पवार, डॉ. राहुल कारमुंगी, डॉ. दीपक गायकवाड या सर्व हृदयरोग तज्ञांनी परिश्रम घेतले. या हृदयरोग तपासणी शिबिरामध्ये शंभर पेक्षा अधिक पत्रकार, पत्रकारितेतर कर्मचारी, आणि पत्रकारांच्या कुटुंबीयांनी लाभ घेतला.

# चिंताकिंदी कारखान्याजवळून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

शहरातील अक्कलकोट रोडवरील एमआयडीसीमधील चिंताकिंदी कारखान्याजवळून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत महेश गणेश महेश्वर (वय ४०, रा. घर नं. १५०, कलावती नगर, एमआयडीसी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ जानेवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास महेश महेश्वर यांनी त्यांची एमएच १३ एएस ५२७५ क्रमांकाची दुचाकी ही चिंताकिंदी कारखान्याजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.



# डॉ. अनिल देशमाने यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव येथील प्राचार्य डॉ. अनिल के. देशमाने यांचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स मशीन लर्निंग: बिल्डिंग द फ्युचर हे नववे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.

प्रा. डॉ. देशमाने यांना शैक्षणिक क्षेत्रात ३२ वर्षांचा अनुभव आहे. सध्या ते भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव, सोलापूर येथे प्राचार्य/ संचालक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर यांचे पीएचडीचे मार्गदर्शक म्हणून देखील काम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थ्यांनी पीएचडी केली आहे. त्यांनी DBTU Lonere विद्यापीठामध्ये अभ्यास मंडळावर पण काम केले आहे. डॉ. देशमाने यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांच्या नवीन पुस्तकामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंगच्या क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल माहिती दिली आहे. त्यांच्या या कार्यास संस्थेचे अध्यक्ष रविंद गायकवाड व संस्थेचे सचिव अनामिका गायकवाड, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.



# कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

ब्रम्हपुरी गावाजवळ कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. सतिश मनोहर सरवळे (वय ३०, रा. बेगमपूर, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. सतिश सरवळे हे १९ जानेवारी रोजी दुचाकीने इचलकरंजी ते बेगमपूर दिशेने येत होते. त्यावेळी ब्रम्हपुरी गावाजवळ रोडवर कुत्रा आडवा आल्याने सरवळे यांची दुचाकी घसरून अपघात झाला. त्यामध्ये सरवळे यांच्या चेहऱ्यास व सर्वांगास मार लागून ते जखमी झाले. त्यामुळे सतिश सरवळे यांना इचगाव टोळ नाक्यावरील रुग्णवाहिकेतून उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# प्रशासनाच्या डोळ्यात डंपरचालकांची धूळफेक

## असुरक्षित बांधकाम साहित्याची उघड्यानेच वाहतूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

शहर आणि उपनगरांमध्ये सुरू असणाऱ्या बांधकामांसाठी गरजेच्या खडी, वाळू, राडारोडा आणि इतर बांधकाम डंपरचालकांकडून साहित्याची उघड्यानेच वाहतूक केली जाते. त्यामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धूळ उडून अन्य वाहनचालकांचा अपघात होण्याची शक्यता आहे.

आरटीओ, पोलिस प्रशासनाने डंपर चालकांना साहित्य भरल्यानंतर ते झाकून वाहतूक करण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, या सूचनेला केराची टोपली दाखविण्यात येत आहे. असे असूनही त्यांच्यावर प्रादेशिक परिवहन विभागाकडून तसेच पोलिस विभागाकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.



शहरात मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू आहे. बांधकाम साइटवरील वाळू, खडी, राडारोड्याची डंपरमध्ये वाहतूक केली जाते. वाहतूक करताना धूळ उडू नये, यासाठी ताडपत्री झाकणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन न केल्यामुळे धूळ उडून वाहनचालकांच्या डोळ्यात जाऊ शकते. त्यामुळे अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वाहनांबाबत प्रशासनाकडे तक्रारी आल्यानंतर डंपरचालकांना आणि बांधकाम प्रकल्पाच्या प्रमुखांना वाहतूक करताना ताडपत्रीचा वापर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सुरुवातीचे काही दिवस या नियमांची अंमलबजावणी झाली. मात्र, पुन्हा येरे माझ्या मागल्या हा प्रकार सुरू झाला.

शहरात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. या बांधकाम प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात डंपरची वाहतूक सुरू आहे. डंपरचालकांकडून रस्ते वाहतूकीच्या नियमांचे पालन होताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर आरटीओ आणि वाहतूक पोलिस कारवाई न करता त्यांच्यावर मेहेरबान का आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित चालकांवर कारवाई करून दिलासा देण्याची मागणी जोर धरत आहे.

### डंपरमुळे अनेकांचे जीव गेले

शहरात बांधकामाचे साहित्याची वाहतूक करण्यासाठी जड वाहनाच्या प्रकारामध्ये मोडणाऱ्या डंपरच्या जागी आता लहान स्वरूपातील डंपर वापरण्यात येऊ लागले आहेत. हे डंपर साहित्य काठोकाठ भरून अतिवेगात व निष्काळजीपणे वाहन चालवितात. त्यामुळे अशा डंपरमुळे शहरात अनेक लहान-मोठे अपघात झाले असून त्यामध्ये अनेक निष्पापांचा जीव गेला आहे.

### डंपरमुळे प्रदूषणात मोठी भर...

थंडी सुरू झाल्यानंतर शहरातील प्रदूषण वाढत आहे. हवेमध्ये धुळीचे कण वाढल्याचे दिसून येत आहे. खडी, वाळू, मुरूम आणि राडारोड्याची विनाताडपत्री वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणात भरच पडत आहे. मात्र, त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. या वाहनांमुळे पाठीमागील वाहनचालकांच्या डोळ्यात धूळ जाऊन त्रास होतो. त्यामुळे अपघात घडण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे आरटीओ व पोलिस प्रशासनाने या वाहनांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी सामान्य नागरीकांमधून होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### दत्त ग्लोबल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

डोणगाव (ता. उत्तर सोलापूर) येथील श्री दत्त ग्लोबल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. प्रथमतः श्री दत्तात्रेयच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सतीश घंटेनवरू यांनी प्रास्ताविक केले. संचालिका श्रेया घंटे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. आरोही सुरवसे व शौर्य पाटील यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. त्याच बरोबर लोकगीत स्पर्धा घेण्यात आली. यासाठी परीक्षक म्हणून विलास कुलकर्णी व रेवणसिद्ध कट्टे यांनी काम पाहिले. सांस्कृतिक कार्यक्रमात गणेश वंदना, गाव सुटेना, गुलाबी साडी अशा गाण्यांवर बालचमूंनी नृत्य सादर केले. प्रा. युवराज मेटे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् या गीताने झाली. याप्रसंगी सरपंच राजर्षी आमले, बाबा आमले, माही वे चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालिका रश्मी मोहोळकर, अक्षता चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन रश्मी मोहोळकर व प्रज्ञा चराटे यांनी केले.



### सिद्धेश्वर यात्रेनिमित्त कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये टेक्निकल प्रदर्शन

**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट शाखेत श्री सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेचे आणि मकरसंक्रांत सणाचे औचित्य साधून टेक्निकल प्रदर्शनाचे आयोजन केले होते. एमआयटी कॉलेजचे कोऑर्डिनेटर श्यामसुंदर माने हे अध्यक्षस्थानी होते आणि त्यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यासाठी केटीआय मुंबई ऑफिस येथून सिनियर रिजनल मॅनेजर स्नेहा कामठे उपस्थित होत्या. केटीआयच्या सर्व ट्रेडच्या विद्यार्थ्यांनी १५ प्रोजेक्टस सादर केले. यामध्ये इलेक्ट्रिकल, एसी आणि रेफ्रिजरेशन, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर हार्डवेअर आणि नेटवर्किंग, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर, मोबाईल रिपेअरिंग या ट्रेडनी विविध प्रोजेक्ट मांडले होते. यासाठी अनेक शाळांमधून विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी भेट दिली इंडस्ट्रियल एरियातून अनेक मान्यवर यांनी या प्रात्यक्षिकांना भेट देऊन सोलापूरमध्ये विद्यार्थ्यांमध्ये नवीन कल्पना व त्या प्रत्यक्षात आणण्याची क्षमता आहे, असे नमूद केले. प्रदर्शनासाठी केटीआयचे शाखा व्यवस्थापक वल्लभ कुलकर्णी, ज्ञानेश्वर सुतार, आनंद देशपांडे, विजयकुमार श्रीमल, सचिन पोवाडे,राजश्री सलगर, एसआरओ सुप्रिया मोरे, सुरज माने यांनी परिश्रम घेतले.



### पत्रकार संघटना शहराध्यक्षपदी कोकणे, सरचिटणीसपदी अकबर बागवान

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना सोलापूर शहराध्यक्षपदी पत्रकार परशुराम कोकणे, कार्याध्यक्षपदी विकास कस्तुरे यांची तर सरचिटणीसपदी पत्रकार अकबर बागवान यांची निवड करण्यात आली आहे. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक राजा माने यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शहराध्यक्ष प्रशांत कटारे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहावर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सोलापूर शहराचे नवीन पदाधिकारी निवडण्यात आले. यावेळी राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, जिल्हाध्यक्ष प्रवीण नागणे, पंढरपूर शहराध्यक्ष सचिन कुलकर्णी, राज्य कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, डॉ. रवींद्र चिंचोळकर, जनक्रांती न्यूज चॅनलचे प्रमुख संजय पवार उपस्थित होते. यावेळी इतरही पदाधिकारी निवडी जाहीर करण्यात आल्या. डिजिटल मीडियात उत्तम काम करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. शासन दरबारी अडचणी मांडून त्या सोडवण्यात ही आम्हाला यश येत आहे. लवकरच सावंतवाडी या ठिकाणी डिजिटल मीडिया संपादक पत्रकारांचे अधिवेशन होणार आहे.' असे डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी सांगितले.

**डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक राजा माने यांची प्रमुख उपस्थिती**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'जैन गुरुकुलचा' दिग्विजय सुरवसे राज्य गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

श्री ऐ. प.दि. जैन पाठशाळा संचलित श्री दि. जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील दिग्विजय सुरवसे (इयत्ता ९ वी क) हा शासकीय चित्रकला इंटरमिजिएट परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीमध्ये ६३ व्या तर प्रशालेमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. या



परीक्षेसाठी प्रशालेतुन १२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले असून सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण होत. प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला. प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी 'अ' श्रेणीत ७, 'ब' श्रेणीत ४ व 'क' श्रेणीत १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांना चेतनकुमार महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# नूतन पालकमंत्र्यांवर भार सोलापूर विकासाचा

## उड्डाणपूल, विमानसेवा, जलवाहिनीसह नागरी समस्यांचा प्रश्न; पालकमंत्री गोरे पाळतील शेजारधर्म!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

सन २०१९ पासून सोलापूर जिल्ह्याला सतत उपरा पालकमंत्री असून यंदाही सोलापुरात भाजपाचे पाच आमदार असतानाही मंत्रिमंडळात कोणाची वर्णी न लागणेही शोकांतिका आहे. आताही उपरा पालकमंत्री ही सोलापूरकरांची अपरिहार्यता असल्याचे स्पष्ट होत आहे. ठिक आहे, उपरा पालकमंत्री द्यावा परंतु तो केवळ बैठकांपुरता मर्यादित नसावा. सोलापूर आपला जिल्हा नाही म्हणून पालकमंत्र्यांनी दुर्लक्षित सोलापूरकरांकडे दुर्लक्षच करू नये. तर शहरातील रखडलेले प्रलंबित दोन उड्डाणपूल, प्रलंबित विमानसेवा, दुहेरी जलवाहिनी, जिल्ह्यातील भूसंपादनाचे प्रश्न, जिल्ह्यातील अर्धवट सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी झटणारा पालकमंत्री सोलापूरकरांना हवा असून नक्कीच आपल्या शेजारच्या सातारा जिल्ह्यातील मूळचे असलेले नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून सोलापूरकरांच्या अपेक्षा पूर्ण होतील अन् ते नक्कीच शेजारधर्म पाळतील. तसेच महापालिका, जिल्हा परिषद, पोलिस प्रशासनासह सर्वच प्रशासकीय यंत्रणेवर नूतन पालकमंत्र्यांची मजबूत पकड गरजेची आहे. सक्षम पालकमंत्री म्हणून सोलापूरकरांकडून ना. गोरे निश्चितच वाहवा मिळवतील यात प्रारंभी तर शंका मूळीच नाही. एकेकाळी महाराष्ट्राला एकाचवेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देणारा सोलापूर जिल्हा गेल्या काही वर्षात राजकीय नेतृत्व नसलेला जिल्हा झालेला आहे. सन २०१४ ते २०१९ या कालावधीत सोलापूरला दान मंत्रीपदे मिळालेली होती. परंतु या काळात सोलापूर जिल्हाचे नेतृत्व विकसीत झाले नसल्याची शोकांतिका आहे. या कालावधीत सोलापूर जिल्ह्याचे नेतृत्व करणारे नेता पाच वर्षात सोलापूरकरांना मिळणे अपेक्षित होते. पण तसे न झाल्याने पुढील पाच वर्षे आणि आता यंदा देखील सोलापूरला स्थानिक पालकमंत्रीपद मिळालेले नाही. सोलापुरातील भाजपाच्या पाचपैकी एकाही आमदाराला राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान दिलेले नाही. एकनाथ शिंदे सेना आणि अजित राष्ट्रवादी यांना सोलापूर जिल्ह्यातील ११ पैकी एकही विधानसभेची जागा जिंकता आलेली नाही. २०१४ ते २०१९ या कालावधीत सोलापूरला दोन मंत्रीपदे होती तर पालकमंत्रीपदही सोलापूरच्याच सुपूत्राकडे होते. ही सुवर्णसंधी असतानाही हा काळ केवळ आपसातील











पक्षातंर्गत भांडणातच गेल्याचे सोलापूरकरांनी पाहिले आणि भाजपा श्रेष्ठींनी ते फारच मनावर घेतल्याने सोलापूरला उपरा पालकमंत्री देण्याची जणू आता प्रथाच पडल्याचे स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे राज्यातील गत सत्तेची पाहिली अडीच वर्षे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात होते. या कालावधीत सोलापूरचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे होते. त्याकाळातही राष्ट्रवादीने सोलापूरला उपराच पालकमंत्री दिलेला होता. राष्ट्रवादीमध्ये अनुभवी स्थानिक आमदार असतानाही त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळवता आले नव्हते अथवा ते सक्षम नव्हते अशीही चर्चा राजकीय वर्तुळात होती. त्यानंतर महायुतीच्या सत्तेतही सोलापूरला अनुभवी आमदार असतानाही त्यांच्या सत्ताधारी पक्षांनी मंत्रिमंडळात कोणालाही स्थान दिलेले नव्हते. भाजपाने सोलापूरला उपराच पालकमंत्री दिलेला होता. आताही भाजपाने सोलापूरला उपराच पालकमंत्री दिलेला असून आपल्या शेजारच्या सातारा जिल्ह्यातील मंत्री जयकुमार गोरे हे सोलापूरचे पालकमंत्री झाले आहेत. नूतन पालकमंत्र्यांवर सोलापूरच्या रखडलेल्या अनेक विकासकामांचा भार असून हे शिवधनुष्य ते सक्षमपणे पेलतील यात शंका नाही. सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक विकासकामे प्रलंबित अथवा रखडलेली आहेत. यात प्रामुख्याने उजनी ते सोलापूर समांतर दुहेरी जलवाहिनीचे काम रखडलेले आहे. हे काम झाल्यास सोलापूरकरांचा पाण्याचा वनवास संपण्याची शक्यता आहे. सध्या आठवड्यातून एकदा होणारा पाणीपुरवठा किमान एकदिवसाआड तरी होईल, अशी सोलापूरकरांना अपेक्षा आहे. शहरातील दोन उड्डाणपूलांचे सोलापूरकरांचे अधुरे स्वप्न कधी पूर्ण होणार हे आता कोणी ज्योतिषीही सांगू शकणार नसल्याची दयनिय स्थिती आहे. सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरु होणार की हे सोलापूरकरांचे दिवास्वप्नच ठरणार याची देखील उत्सुकता ५० लाख सोलापूरकरांना आहे. प्रचंड वाहतुकीची वर्दळ असलेला आसरा रेल्वे पूल रुंदीकरणासह डी-मार्ट ते आतारनगर दुपदरी रस्ता कधी होणार याकडे जुळेसोलापूरकर नजरा लावून बसलेले आहेत. सोलापूर महापालिकेचा कारभार तर रामभरोसे असून स्मार्ट सिटीतून होणाऱ्या आणि झालेल्या कामांचा दर्जा न सांगण्याजोगाच आहे. शहर व हद्दवाढमध्ये अनेक अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे सातत्याने होत असतानाही पालिका प्रशासनाने अक्षम्य दुर्लक्ष आहे. सोलापुरातील भुईकोट किल्ल्यामुळे परिसरातील अनेक इमारतींचा विकास खुंटलेला आहे. जिल्ह्यातील अनेक सिंचन योजना रखडलेल्या आहेत. मुंबई, पुण्याला मेट्रोसाठी हजारो कोटी रुपये देणाऱ्या सरकारने सोलापूर जिल्ह्यातील अर्धवट सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी काही शे कोटी रुपयांचा निधी दिला तरी ही कामे पूर्ण होणार आहेत. पंढरपूर कॉरिडॉर, नमामी चंद्रभागा, उजनी पर्यटन, उजनी धरणातील गाळ काढणे, जिल्ह्यात अनेक ठिकाणी बॅरेजस उभारून सिंचनक्षेत्र वाढवणे, सोलापूरसह जिल्ह्यातील एसटी बस स्थानकांची सुधारणा करणे, आरोग्य सेवा सुधारणे आदी अनेक विकासकामे करणारा पालकमंत्री सोलापूरकरांना हवा आहे. नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून सोलापूकरांना खूप मोठ्या अपेक्षा आहेत. केवळ डीपीसी अथवा अन्य बैठका, दौरे निमित्ताने सोलापूरला न येता महिन्यातून किमान एक वेळातरी पालकमंत्री गोरे यांनी सोलापुरात येवून विकासकामांचा आढावा आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेणे खूपच अत्यावश्यक आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

### पालकमंत्री गोरे यांनी प्रत्येक महिन्याला सोलापूरला एक तरी दौरा करावाच

गेल्या काही वर्षात सोलापूरच्या विकासाकडे मोठे दुर्लक्ष झालेले आहे. परंतु ना. जयकुमार गोरे यांच्या रूपाने सोलापूरकरांना एक संवेदनशील पालकमंत्री मिळालेले आहेत. नक्कीच गोरे यांच्याकडून सोलापूरकरांना दिलासा मिळेल. सोलापूरचा रखडलेला विकास होईल, रखडलेल्या विकासाच्या योजना मार्गी लागतील, सर्वच प्रशासकीय विभागांवर पालकमंत्र्यांची पकड अन् करडी नजर असेल. पालकमंत्री गोरे यांनी महिन्यातून किमान एक तरी सोलापूर दौरा करून महापालिका, जिल्हा परिषद, पोलिस प्रशासनासह सर्वच विभागांच्या आढावा बैठका घ्याव्यात म्हणजे सोलापूरचा विकास निश्चितच होईल.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### कुत्रा आडवा आल्याने भोगावजवळ दुचाकी घसरून तरूण जखमी

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

कुत्रा आडवा आल्याने भोगावजवळ दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरूण जखमी झाला. नितीन अंकुश भोसले (वय ३५, रा. भोगाव, ता. उत्तर सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २० जानेवारी रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास नितिन भोसले हे त्यांच्या दुचाकीवरून भोगाव येथून सोलापूरच्या दिशेने येते होते. त्यावेळी भोगावजवळच कुत्रा आडवा आल्याने भोसले यांची दुचाकी घसरून अपघात झाला. यामध्ये भोसले यांच्या सर्वांगास मुका मार लागून जखमी झाल्याने त्यांना मित्र खंडू कांबळे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पैशाच्या व्यवहारातून मारहाण

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

पैशाच्या व्यवहारातून एकास गाडीच्या चैनने मारहाण करण्यात आली. शुकुर अब्दुल शेख (वय ४८, रा. कमला नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २० जानेवारी रोजी पहाटे तीनच्या सुमारस कुमठ्या नाक्याजवळील आर आर टेलर या दुकानाजवळ शुकुर शेख यास पैशाच्या व्यवहारातून इस्माईल कुरेशी व इतर अनोळखी एकाने मिळून गाडीची चैन, लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये शेख यांच्या डोक्यास व सर्वांगास मुका मार लागल्याने नातेवाईक नजर शेख यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### कुत्रा आडवा आल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

घरात येत असताना कुत्रा आडवा आल्याने तोल जाऊन पडून तरूण जखमी झाला. बालाजी विठ्ठल पवार (वय ३४, रा. मुरारजी पेठ, सिध्देश्वर सोसायटी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १७ जानेवारी रोजी साडेदहाच्या सुमारास बालाजी पवार हे राहत्या घरी येत होते. त्यावेळी कुत्रा आडवा आल्याने बालाजी पवार हे तोल जाऊन पडल्याने त्यांच्या डोक्यास मुका मार लागला. त्यामुळे त्यांना उपचारासाठी अंजली पवार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बाथरूमवरून पडून आठ वर्षांचा बालक जखमी

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

खेळता खेळता बाथरूमवर चढलेला ८ वर्षीय बालक खाली पडून जखमी झाला. हसनैम मोसिन पठाण (वय ८, रा. नई जिंदगी, सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव आहे. २० जानेवारी रोजी सकाळी दहाच्या सुमारास मजरेवाडी येथील नागनाथ नगरात खेळता खेळता हसनैम हा बाथरूमवर चढला. त्यावेळी बाथरूमवरील खाली पडून हसनैम याच्या डोक्या मार लागून तो जखमी झाला. त्यामुळे त्यास आई आयेशा पठाण यांनी त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तरूणास लाकडाने मारहाण

**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

अज्ञात कारणावरून तरूणास लाकडाने मारहाण करून जखमी करण्यात आले. प्रदीप मारूती वाघमारे (वय २८, रा. २ नंबर झोपडपट्टी, विजापूर नाका, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १९ जानेवारी रोजी रात्री नऊच्या सुमारास प्रदीप वाघमारे हा राहत्या घरापाशी थांबला होता. त्यावेळी अज्ञात कारणाने २ ते ३ अज्ञात लोकांनी मिळून प्रदीप यास लाकडी वासा व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. प्रदीप यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### रेल्वे स्टेशनमधील तिकिट काऊंटरजवळ तरूणास मारहाण

**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

शहरातील रेल्वे स्टेशनमधील तिकिट काऊंटरजवळ तरूणास लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी करण्यात आले. तमिम शकील गोगी (वय १८, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १९ जानेवारी रोजी रात्री साडेहाच्या सुमारा तमिम हा सोलापूर रेल्वे स्टेशन येथील तिकिट काऊंटरच्या पोर्चपाशी थांबला होता. त्यावेळी अज्ञात १५ ते २० जणांनी मिळून तमिम यास अज्ञात कारणाने लोखंडी रॉडने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये तमिम याच्या सर्वांगास मार लागल्याने त्यास उपचारसाठी भाऊ तमजीम गोगी याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करणाऱ्याविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा लैंगिक छळ करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन भरत बालाजी क्यातम (वय २०, रा. प्लॉट नं. २६८, विनायक नगर, पोशम्मा चौकाजवळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील पिडीत अल्पवयीन मुलीकडे तिच्या नातेवाईकांना मोबाईल सापडला. त्यावेळी त्यांनी पिडीतेकडे मोबाईलबाबत विचारणा केल्यानंतर तिला तो मोबाईल भरत क्यातम याने दिला असल्याचे सांगितले. भरत क्यातम हा पिडीतेकडे सारखा बघत होता, त्याने तिच्याजवळ जाऊन माझे तुझ्यावर प्रेम आहे, मी तुझ्याबरोबर लग्न करतो असे सारखे म्हणत तिचा पाठलाग करीत होता. १३ जानेवारी रोजी सायंकाळी भरतने पिडीतेला अडवून तिचा हात धरून त्याच्याजवळील एक मोबाईल पिडीतेला दिला. मी तुला फोन लावतो, तु फोन उचलून माझ्याबरोबर बोलत जा असे म्हणाला. त्यावर पिडीतेने मोबाईल परत दिल्यानंतरदेखील भरतने जबरदस्तीने पिडीतेला मोबाईल दिला. अशाप्रकार भरतने पिडीतेचा पाठलाग करून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिचा लैंगिक छळ केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक निलम घोरपडे पुढील तपास करीत आहेत.

## १६ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि.२० जानेवारी**

अशोक चौकातील बंद घर फोडून चोरट्याने १६ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत विकास विनायक कुलकर्णी (वय ४५, रा. ५९८, न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जानेवारी रोजी रात्री विकास कुलकर्णी हे घराला कुलूप लावून त्यांच्या बहिणीच्या गावी कर्देहळ्ळी येथे गेले होते. ते १९ जानेवारीला परत घरी आले असता त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने कुलकर्णी यांच्या बंद घराचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश करून घरातून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, देवाचे पितळी साहित्य असा १६ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुळेगाव येथे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्राचे उद्‌घाटन

### शेतकऱ्यांना मिळणार सोयाबीन मूग उडीद पिकांना आधारभूत किंमत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी**

शासनाच्या वतीने सोयाबीन, मूग, उडीद या पिकांसाठी किमान आधारभूत किंमत देवून खरेदी करण्यासाठी विविध ठिकाणी खरेदी केंद्रे उभा करण्यात येत आहेत. सोलापूरात ही रेवणसिध्देश्वर ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या वतीने मुळेगाव तांडा येथील बसव वेअर हाऊस येथे सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे.

या माध्यमातून शेतकऱ्यांना सोयाबीन, मूग, उडीद,या पिकांना आधारभूत किंमत मिळणार आहे. दरम्यान, याचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी किरण गायकवाड म्हणाले, हमीभाव खरेदी केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सोयाबीन मूग आणि उडीद या पिकांना आधारभूत किमतीच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. सदरची आधारभूत किंमत तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हा मार्केटिग फेडरेशनचे भोसले, बाजार समितीचे सचिव दत्तात्रय सुर्यवंशी, श्रीशैल अंबारे, सहदेव शिवशेट्टी, महेश बोराळकर आदी उपस्थित होते.

## असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सतर्फे स्थापत्य २०२५ प्रदर्शन

### २१, २२, २३ फेब्रुवारी दरम्यान सोलापूरकरांना सुवर्णसंधी

### स्टॉल बुकिंगला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सतर्फे २१, २२, २३ फेब्रुवारी रोजी नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर 'स्थापत्य २०२५' या बांधकाम साहित्य व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आल्याची माहिती असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे यांनी दिली. 'स्थापत्य २०२५' या प्रदर्शनाचे प्रायोजकत्व मेटारोल इस्पात प्रा. लि. जालना यांनी घेतले आहे.

हे प्रदर्शन तीन दिवस सकाळी १० ते रात्री १० यावेळेत पाहण्यासाठी खुले राहणार आहे. या प्रदर्शनात जागा विक्रीचे विविध प्रकल्प, प्रमोटर आणि बिल्डर, गृह कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था, डिझाईन सॉफ्टवेअर, सिमेंट कंपन्या, कन्स्ट्रक्शन केमिकल्स, स्टील, प्लंबिंग आणि सॅनेटरी वेअर, इलेक्ट्रिकल मटेरियल, बांधकामास लागणारी अत्याधुनिक यंत्रे आणि उपकरणे, दरवाजे आणि खिडक्या, रूफिंग मटेरियल, टाइल्स, घरातील अंतर्गत सजावट, फर्निचर, लँडस्केपिंग असे एकूण ७० स्टॉल असणार आहेत. स्थापत्य २०२५ चे घोषवाक्य 'सेव्ह एंव्हॉर्मेंट फॉर ग्रीन फ्युचर' हे आहे. या विषयाची माहिती देणारा स्टॉलदेखील या प्रदर्शनात असणार आहे. एक वर्षाआड होणारे स्थापत्य प्रदर्शनात घराच्या बांधकामाबाबत तसेच अंतर्गत सजावटी बाबत असलेल्या स्टॉलवरून माहिती घेऊन शेकडो नागरिकांनी आपली घरे बांधली आहेत. घर बांधू इच्छिणाऱ्या तसेच घरामध्ये आकर्षक सजावट करू इच्छिणाऱ्या सोलापूरकरांसाठी यंदाचे स्थापत्य प्रदर्शन सुवर्णसंधी ठरणार आहे.

### स्टॉल बुकिंग सुरू

स्थापत्य २०२५ या बांधकाम आणि अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनासाठी स्टॉल बुकिंग सुरू झाले असून इच्छुकांनी स्थापत्य प्रदर्शनामध्ये स्टॉल उभारण्याकरिता असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे (९८९०१८७०७७), सचिव इंजि. मनोहर लोमटे (९८५०५७०७९२), उपाध्यक्ष इंजि. बी. एम. जाधव (९४२२०६७१९६) किंवा खजिनदार इंजि. संतोषकुमार बायस (७०५५३०९०८०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे सचिव इंजि. मनोहर लोमटे यांनी केले आहे.


## पादचाऱ्याला धडक; एसटीचालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

शहरातील एस टी स्टॅन्ड परिसरात लघुशंकेसाठी पायी जाणाऱ्यास धडक देऊन पाय फ्रॅक्चर करणाऱ्या एस टी चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक मुरलीधर पवार (वय ४०, रा. कमला नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिमराय हुल्लाजी कांबळे (वय ४८, रा. बिल्लाळी, ता. मुखेड, जि. नांदेड) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जानेवारी रोजी सायंकाळी सोलापूर एस टी स्टॅन्ड परिसरात अशोक पवार हे लघुशंकेसाठी पायी जात होते. त्यावेळी एमएच २० बीएल ३८५८ क्रमांकाच्या एस टी बसचा चालक भिमराव कांबळे यांनी एसटी बस निष्काळजीपणे चालवून अशोक पवार यांना जोरदार धडक दिली. यामध्ये पवार यांचा पाय फ्रॅक्चर झाला.

## स्नॅक्स न दिल्याच्या कारणावरून तरूणास कोयत्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**




स्नॅक्स न दिल्याच्या कारणावरून बिअर शॉपी चालकाबरोबर होत असलेल्या वादावादीमध्ये विचारणा करण्यास गेलेल्या तरूणास कोयत्याने मारहाण करून जखमी करण्यात आले.

याबाबत आरिफ अ. रशिद गुंजेगाव (वय ३४, रा. प्लॉट नं. १३३, साईनाथ नगर, अमन चौक, मजरेवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शुभम कैय्यावाले (वय २४, रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी, कुमठा नाका, सोलापूर), सनी कैय्यावाले (वय २०), राम कैय्यावाले (वय २१, दोघे रा. उत्तर सदर बझार, बेडरपूल १४ नंबर शाळेजवळ, सोलापूर), चेतन ननवरे, अनोळखी ३ ते ४ व्यक्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जानेवारी रोजी रात्री ११ च्या सुमारास शुभम बिअर शॉपी येथे आरिफ गुंजेगाव होता. त्यावेळी शुभम कैय्यावाले यास बिअर शॉपी चालक राजेंद्र आंबेवाले याने त्याला स्नॅक्स दिले नाही या कारणामुळे शुभमने आंबेवाले यास धक्काबुक्की केली होती. त्यावेळी गुंजेगाव हा काय गडबड आहे अशी विचारणा करण्यास गेला असता त्यास शुभम कैय्यावाले याने गुंजेगाव याच्या डोक्यात कोयत्याने मारहाण करून त्यास जबर जखमी केले. तसेच सनी कैय्यावाले, राम कैय्यावाले, चेतन ननवरे व इतर अनोळखी ३ ते ४ जणांनी गुंजेगाव यास लाथाबुक्क्याने मारहाण करून कोयता उगावरून दमदाटी करीत दहशत निर्माण केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १००९

**पिंड पोसावें हे अधमाचें ज्ञान ।**
**विलास मिष्टान्न करूनियां ।।**

प्रेम हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. म्हणूनच की काय जेथे प्रेम नाही, तेथे सुख, शांती, समाधानाचे वास्तव्य राहात नाही. माणूस इतरांवर जसे प्रेम करतो, तसे तो स्वत:वरही प्रेम करतो. खरे म्हणजे माणसाने स्वत:वर प्रेम हे केलेच पाहिजे. कारण ज्याला स्वत:वर प्रेम करता येत नाही, तो इतरांवर खरे प्रेम करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. स्वत:वर प्रेम करायचे म्हणजे केवळ देहावर नव्हे, तर स्वत:च्या वर्तनावर, तत्वावर, विचारावर प्रेम करायला हवे. हे तत्व, विचार, वर्तन नीतीनियमाला अनुसरुनच असायला हवेत. नीती नियम, विचार, वर्तन, तत्व इत्यादीचा विचार न करता अनेकजण केवळ देहावर प्रेम करतात. देह पोसणे, त्याच्यात शक्ती वाढवणे, सौंदर्य खुलवणे एवढाच हेतू ठेवून प्रेम केले जाते. आपला देह धष्टपुष्ट व्हावा म्हणून भरपूर चांगले खायचे, मिष्टान्न खावून विलासी जीवन जगायचे म्हणजे वेडेपणा होय. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, पिंड पोसावें हें अधमाचें ज्ञान। विलास मिष्टान्न करूनिया।।



खाण्यापिण्यावर लक्ष देणारे खूप लोक आहेत. देह आडवा-उभा कितीही व कसाही सुटत गेला तरी चालेल पण खाण्यापिण्यात कसलीच बारकाई करायची नाही असे अनेकांचे वर्तन असते. माणसाने चांगले खावे-प्यावे यात शंकाच नाही. पण केवळ देहाची धष्टपुष्टता वाढावी एवढ्यासाठी सातत्याने खाण्यापिण्यावर लक्ष ठेवणे योग्य नसते. आपण समाजात पाहतो की असे अनेक तरूण आहेत जे कसल्याही प्रकारचे कष्ट करीत नाहीत. त्यांचे वयोवृध्द आई-वडील कष्ट करतात आणि त्यांच्या कष्टावर हे तरुण खाण्यापिण्याची मजा मारतात. तरुणांनी घरात बसावे आणि वृध्दांनी कष्ट करावीत हा एक प्रकारचा मानवी मनाला लागलेला रोग आहे. हा रोग कुटुंबात आपले अस्तित्व टिकवून आहे. देहाच्या पुष्टीसाठी कांहीही केले तरी ही पुष्टी कलांतराने का होईना हळू-हळू नष्टच होत जाते. केवळ पुष्टीच नष्ट होते असे नव्हे तर हा देहही नष्ट होतो. काळाच्या अधीन असलेल्या या देहावर एवढे अतोनात प्रेम करण्यापेक्षा या देहाकडून पार पडल्या जाणाऱ्या कर्तव्यावर प्रेम करावे. केवळ या देहाची पुष्टी करण्यापेक्षा या देहाकडून होणाऱ्या कर्तव्याची पुष्टी करावी. देहाच्या पोषणासाठी आवश्यक तेवढे निश्चित सेवन करावे. थोडक्यात खाण्यासाठी जगण्यापेक्षा जगण्यासाठी खावे. आपण दोन घास कमी खाल्ले तर उरलेले अन्न भुकेल्यांच्या कामी येऊ शकते. आपले अवास्तव खाणे कोणाच्या तरी भुकेला कारणीभूत होऊ शकते हे लक्षात ठेवावे. शरीराला आवश्यक आहे त्यापेक्षा खाणे हे कोणत्याही दृष्टीकोनातून चांगले व योग्य नसते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# आस्थापनांनी महिलांसाठी तक्रार निवारण समिती गठीत करावी

### जिल्हा महिला व बालविकास अधिका-यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**


कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध कायद्यानुसार, सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक, खासगी आस्थापनेमध्ये महिला तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. अशा आस्थापनांनी समितीचे गठन करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी केले आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण मिळण्यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ शासनाने हा कायदा केला असून या कायद्याचे कलम ४(१) अन्वये प्रत्येक शासकीय, निमशासकीय कार्यालयीन तसेच खाजगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती गठीत करणे बंधनकारक आहे. जे कार्यालय आस्थापना अंतर्गत तक्रार समिती गठीत करणार नाही त्या आस्थापनेच्या कार्यालय प्रमुखास अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये ५० हजार रुपया पर्यंत दंड करण्याची तरतूद सदर अधिनियमात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम २०१३ या कायद्याचे कलम ४ (१) प्रमाणे राज्य शासनास ३१ जानेवारीपर्यंत सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खासगी अस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समित्या स्थापन करणे बाबत आदेश दिले असून याबाबत फेब्रुवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात शासनास प्रतिज्ञा पत्र सादर करणे बाबतचे आदेशही दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी अस्थापनांनी त्यांच्या कार्यालयाची अंतर्गत तक्रार समिती गठीत केले बाबतच्या आदेशाची प्रत दिनांक २५ जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सी.एस. नं.१६०८/०९, प्लॉट नं.१२, पहिला मजला, शोभा नगर, सात रस्ता, बिग बझार च्या पाठीमागे सोलापूर. ई-मेल:- solšdwcdoyahoo.co.in या पत्यालवर पाठवावे . ज्या अस्थापनाच्या ठिकाणी समिती गठीत अशा कार्यालय, अस्थापना प्रमुखांच्या विरुध्द कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३ या अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये कार्यवाही होऊ शकते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (२७) स्वयंसेवक

स्वयंसेवक वैयक्तिक मानापमान तथा क्रोध-लोभ आदीची बाधा होऊ देत नाही. स्वभावात मधुरता - स्नेहभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणारा असतो. राष्ट्रसेवा करण्यासाठी स्वयंप्रेरणेनी अग्रेसर होणारा असतो. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आत्मियतेने, स्वयंप्रेरणेने आपले सार सर्वस्व अर्पण करण्यास सिद्ध असतो. संघात स्वयंसेवक व पुढारी हा भेद नसतो. परस्परांना समान समजतात. सर्वांवर सारखेच प्रेम करतात. इथे गरीब श्रीमंत किंवा उच्च नीच असा जातीभेद नसतो. संघातील स्वयंसेवकांमध्ये देशभक्ती; ध्येयनिष्ठा; प्रयत्नातील चिकाटी व वृत्तीतील विजयाकांक्षा सतत हवी असे डॉक्टरांचे सांगणे असे. डॉक्टरांनी सर्वांना जगावे कैसे असे शिकवले. वंदनीय गुरुजी नेहमीच म्हणायचे की स्वयंसेवकांनी माझी भारत माता हे आपले हिंदू राष्ट्रच आहे; मागे होते व स्वपराक्रमाने आपल्याला ते नित्या करिता सर्वश्रेष्ठ अवस्थेत राखावयाचे आहे, असे अभिमानाने म्हणणे, सांगणे व वागणे ही नितांत आवश्यक गरज आहे. कारण हिंदू राष्ट्र हे वादातीत सत्य आहे. माझी भारत माता माझे आराध्य दैवत आहे.

**- क्रमशः**



# राजू हौशेट्टी मित्र परिवाराच्या वतीने खासदार संजय पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

ईशान्य मुंबईचे खासदार संजय पाटील यांची गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार समिती (भारत सरकार) च्या सन्माननीय सदस्य पदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राजू हौशेट्टी मित्रपरिवारच्या वतीने मुलुंड मुंबई येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात शाल पुष्पगुच्छ व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी पाटील यांनी आपल्या सर्वांचे प्रेम असेच माझ्यावर सदैव राहो ही इच्छा व्यक्त केली व आपण सोलापूरहून येऊन माझा सत्कार केलात त्याबद्दल आभार मानले.

याप्रसंगी राजोल संजय पाटील, सुनील पवार, मामा मंचेकर, वाल्मीक माने, सुहास वाकोडे, सुनील आंगणे, किरण चव्हाण, प्रकाश जाधव, भाई पाटील, वैभव हाडगे तसेच मतदार संघातील भगिनी उपस्थित होते.

# कॉपीमुक्त अभियानासाठी शपथ ग्रहण व व्याख्यानमाला

### शिवालय शैक्षणिक संकुलामधील उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

शिवालय प्राथमिक/माध्यमिक आश्रम शाळा व ओमवैष्णव कनिष्ठ महाविद्यालय तळे हिप्परगा तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर या आश्रम शाळेमध्ये इयत्ता दहावी व इयत्ता बारावी या परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या कॉपीमुक्त अभियानांतर्गत

मी शपथ घेतो की मी फेब्रुवारी / मार्च २०२५ च्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब किंवा गैरमारगाचा विचार ही करणार नाही. परीक्षेस आत्मविश्वासाने निर्भीडपणे तणाव विरहित सामोरे जाईन. व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन शाळेचे , वडिलांचे व गुरुजनांचे नाव उज्वल करेन. जय हिंद अशी विद्यार्थ्यांनी शपथ ग्रहण केली.प्रथमत: शपथग्रहण व व्याख्यानमाला कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी सुयश अर्कॅडमीचे पाथरकरसर, ज्येष्ठ इतिहास शिक्षक श्री कलशेट्टी सर, त्याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ वाघचवरे मॅडम, संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर सर्व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना वाघचवरे यांनी केली. तर व्याख्याते श्री पाथरकर सर यांची ओळख रेऊरे सर यांनी करून दिली. तर श्री कलशेट्टी सर यांची ओळख श्री चौगुले सर यांनी करून दिली. तदनंतर विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियाना अंतर्गत शपथ ग्रहण केली. इयत्ता दहावीसाठी श्री पाथरकर सर यांनी गणित या विषयाचे मार्गदर्शन केले. तर इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना श्री कलशेट्टी सर यांनी इतिहास या विषयाचे अनमोल असे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नेताजी इंगळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मारुती शिंदे यांनी मानले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - कालाष्टमी |
| दि. २१ जानेवारी २०२५ | स्वामी विवेकानंद जयंती |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. सप्तमी - (१२.३९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (२३.३५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - धृति (२७.४८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२५.५९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ** : जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क** : आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलतेमुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह** : आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील. वडीलधाऱ्या व्यक्तिंच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**कन्या** : धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ** : आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक** : सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु** : आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर** : घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ** : उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन** : आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# मन मोकळे केल्याने जीवन आनंददायी बनते

### प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार; वीरशैव सेवा मंडळातर्फे तीळगुळ वाटप समारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

मनातल्या भावना इतरासमोर व्यक्त केल्याने आनंद द्विगुणित होतो, दु:खाची धार कमी होते. जगणे हवे हवेसे वाटते, जगण्यासाठी बळ मिळते. इतरांना समजून घेण्याची प्रेरणा मिळते. त्यासाठी आपल्या पूर्वजानी सांगितलेल्या मार्गानी आचरण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी वीरशैव सेवा मंडळ आयोजित तीळगुळ देवाणघेवाण समारंभात केले.

यल्लालिंग नगरातील मठात नागरिक मोठ्या संख्येने तीळगुळ समारंभासाठी आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्रामय्या स्वामी यांनी मन्त्रोचारातून करून सणाचे महत्व सांगितले.याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक व संस्थेचे माजी अध्यक्ष सिद्धराया दुलंगे यांच्या ८५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.सर्व नागरिकांनी एकमेकांना तिळगुळ देऊन 'तिळगुळ घ्या गोड बोलाचा संदेश दिला. अध्यक्षीय समारोप करताना सिद्धराया दुलंगे म्हणाले की, वीरशैव सेवा मंडळाचे कार्य अनुकरणीय आहे.असे सांगून संस्थेच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.यावेळी मनोहर तेलसंग यांनी इंग्लंड दौऱ्याचे अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीशैल शिळळे यांनी केले कार्यक्रमास विश्वनाथ मेरकर, संगमेश्वर पायमल्ले, सिद्रामय्या स्वामी, शिवराज चडचणकर, सूत्रेश्वर स्वामी, सुरेश चिक्कळी, गुरुनाथ हत्तीकाळे व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. सामूहिक प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.



# समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे डॉक्टरांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे काशी उज्जैन व श्रिशैल पिठाच्या ट्रस्टवर नेमणूक झाल्याबद्दल डॉ. शैलेश पाटील यांचा डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे नुकतेच डॉक्टर पदवी प्राप्त वृषाली रोडगीकर, कांचन वांगी व नागनाथ म्हेत्रे यांचा सत्कार माजी खासदारांच्या हस्ते करण्यात आला अध्यक्षस्थानी डॉक्टर जय सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज होते याप्रसंगी दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी चंद्रकांत रमणशेट्टी डॉ. नागनाथ म्हेत्रे, डॉ.वृषाली रोडगीकर, डॉ. कांचन वांगी, डॉ. शैलेश पाटील, भीमराव गंगधरे व रोडगीकर यांनी मनोगत व्यक्त केले जय सिद्धेश्वर महाराज भाषणात म्हणाले ज्येष्ठांची उपक्रम उत्तम आहेत त्यांचे कार्य व ऊर्जा तरुणांना लाजवण्यासारखे आहे प्रार्थना विमल पवाडे, प्रास्ताविक बाबुराव नरुणे, आभार चंद्रकांत बिराजदार व सूत्रसंचालन अशोक खानापुरे यांनी केले याप्रसंगी मन्मथ कोनापुरे आप्पाराव विभूते शिवलिंग शहाबादे व वीरशैव प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, सुरेश हत्ती, महादेव पाटील, माजी नगरसेवक अविनाश पाटील, अशोक म्हमाने, चंद्रप्रभू शहा शिवयोग धामचे भक्तगण उपस्थित होते व शेवटी तिळगुळ समारंभ झाला.

# केंद्र शासनाच्या बोट आणि सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये सामंजस्य करार

### विद्यार्थ्यांना रोजगार, नोकरीची संधी मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (बोट) सेंटर या केंद्र शासनाच्या संस्थेशी (वेस्टर्न रिजन) आणि एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाची स्वायत्त संस्था बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (पश्चिम क्षेत्र), मुंबई अर्थात बोट आणि सोलापूर एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात या दोघांमध्ये सामंजस्य करार झाला. याचा अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगला लाभ होणार आहे.भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या नॅशनल अप्रेंटिसशिप ट्रेनिंग स्कीम (NTS) अंतर्गत प्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (EDP) च्या अंमलबजावणीसाठी हा करार झाला. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या हॉलमध्ये या बोट (WR), मुंबई उपसंचालक एन.एन.वाडोदे आणि सिंहगड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळेस उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर टी व्यवहारे, प्रदीप तापकीरे, विनोद खरात, ए के शेख, विजय बिरादार, एस एस शिरगण, इम्रान चंदरकी यांची उपस्थिती होती.बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (वेस्टर्न रीजन) किंवा BOT (WR) हे बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंगचे प्रादेशिक कार्यालय आहे, जे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत आहे. यातून विद्यार्थ्यांचा सहभाग सुलभ करेल, आवश्यक पायाभूत सुविधा आणि समर्थन प्रदान करेल आणि प्लेसमेंटच्या संधींमध्ये मदत करण्यास मदत होणार आहे. शेकडो कंपन्या 'बोट' अंतर्गत नोंदलेल्या आहेत. अभियांत्रिकीसह आता पारंपरिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनाही त्यांच्याकडून जॉब तथा रोजगार, नोकरीची संधी मिळणार आहे. विद्यार्थी आणि तरुणांसाठी विविध उद्योगांमध्ये शिकाऊ प्रशिक्षण योजना राबवणे, कौशल्य विकासाला चालना देणे आणि प्रशिक्षणार्थींमध्ये रोजगारक्षमता वाढवणे, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि प्रशिक्षण संस्था यांच्यातील भागीदारी सुलभ करणे हे बोटचे मुख्य उद्दिष्टे आहेत. शिकाऊ उमेदवारांची नोंदणी आणि नोंदणी करणे, तसेच त्यांच्या प्रशिक्षणाचे निरीक्षण करणे, प्रशिक्षणार्थींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, मूल्यांकन आणि मूल्यमापन आयोजित करणे, प्रशिक्षणार्थींना त्यांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र देणे हे कार्ये आहेत. प्रशिक्षणार्थी व्यावहारिक कौशल्ये मिळवतात त्यांची रोजगारक्षमता वाढवतात, प्रशिक्षणार्थींना मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे मिळतात, ज्यामुळे त्यांच्या करिअरच्या शक्यता वाढतात, हे बोटचे विद्यार्थ्यांसाठी फायद्याचे आहे.



> सिंहगड महाविद्यालय विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील नामवंत कंपन्यांत प्लेसमेंटच्या संधीसाठी प्रसिद्ध आहे. त्यात या केंद्र शासनाच्या बोट संस्थेशी करार झाल्याचा विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. रोजगारांची संधी वाढण्यास मदत होणार आहे.
>
> **- डॉ. शंकर नवले,**
> प्राचार्य, एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय



# डॉ. असदुल्लाह खान स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

होटगी रोड स्थित डॉ. असदुल्लाह खान इंग्लिश मिडीयम स्कूलचा वार्षिक सांस्कृतिक महोत्सव 'आसमान और भी है' चा भव्य सोहळा हुतात्मा स्मृती मंदिर येथे उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रमात सामाजिक विषयांवरील नाट्यप्रयोग, देशभक्तीपर नृत्याविष्कार, आणि पिरॅमिड सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा दाखवली.

या महोत्सवात सोलापूरच्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना विशेष पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले . यात अय्यूबनल्लामांदू,डॉ. अमजद सय्यद, डॉ. फहीम गोलेवाले, पीआय रईसा शेख, रोटी बँक सोलापूर, जमीयत उलेमा ए हिंद सोलापूर, ॲड. रियाझ शेख आणि नियामत पटेल यांना युनिक लाईफटाईम अचिव्हमेंट आणि युनिक अचीव्हर्स अवार्ड ने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला खासदार प्रणिती शिंदे, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुरहान, डॉ. शफी चोपदार, सह शहरातील सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच संस्थापक डॉ. असदुल्लाह खान, झियाउल्लाह खान, ट्रस्टी, प्राचार्य सादुल्लाह खान, इबादुल्लाह खान, प्राचार्य साकिब सय्यद, आणि सीईओ आफताब मुल्ला हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला पालक आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रोत्साहन दिले. हा सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थी, पालक, आणि शिक्षकांसाठी संस्मरणीय ठरला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### कर्नाटकमधील घटनेचे अक्कलकोटमध्ये पडसाद

**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

१२ व्या शतकातील जगातील पहिले संसद स्थापना करणारे, क्रांतीसूर्य, जगदज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे काही समाजकटकांनी विटंबना केली आहे ही घटना कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात घडली आहे तर या घटनेचे पडसाद अक्ककोट मध्ये उपटले आहेत. याप्रसंगी मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली निषेध नोंदविण्यात आला. निवेदन तहसीलदार मगर यांनी घेतले असून लवकरच आरोपींवर गुन्हा दाखल करून त्याच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी राहुल वाडे, रुद्रय्या स्वामी, शिवराज जकापुरे, शिवशंकर स्वामी, धर्मा गुंजले, आनंद बुक्कानुरे, प्रशांत लोकापुरे, ऋषी लोणारी, धनराज पााटील, सत्यजित लोके, प्रीतीश किलजे, सौरभ हळके, प्रसन्न गवंडी, रोहित देशमख, रोहन देशमुख, मल्लिनाथ खुबा, सिद्धाराम माळी, निखिल पाटील, सुनील पाटील, अशोक जाधव, आदर्श पडणुरे, सिद्धाराम मशेट्टी, शरणू कापसे, दीपक रोडगे, शेखर वाले, संतोष स्वामी, मदन राठोड, नागू होलीकटी, सचिन पाटील, राज मद्रीकर, अनिल माने, अनिल नागणसूर, सिद्धाराम पाटील, शरण नडगेरी, बसवराज पटणे आदी उपस्थित होते.



### माढ्याच्या निलेश देवकुळे यांना नाथगौरव पुरस्कार प्रदान

**माढा, दि. २० जानेवारी-**

नाथसेवा प्रतिष्ठान लोहियानगर पुणे यांच्यामार्फत देण्यात येणारा नाथगौरव पुरस्कार माढ्याचे सुपुत्र व सुप्रसिद्ध ढोलकी वादक निलेश देवकुळे यांना नाथसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अतुल नाडे, प्रतिष्ठानचे आधारस्तंभ मार्गदर्शक तुल नाडे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी गायक साजन बेंद्रे, गायक रणजित खंडागळे, सपोनि आकाश विटे, अजय थोरात, विशाल शिंदे, संदीप कांबळे, संतोष मते, आशिष साबळे, प्रतिष्ठानचे सदस्य विशाल खरात, मनोज क्षीरसागर, आयान शेख, सद्दाम शेख, अमीर शेख, साई महापुरे, लखन मिसाळ, जय मोरे उपस्थित होते. या आधीही निलेश देवकुळे यांना कलारंग सांस्कृतिक कला गौरव पुरस्कार २००७ पिंपरी चिंचवड महाराष्ट्रभूषण कलेचे शिलेदार २०२३ हा सांगली पुरस्कार पिंपरी चिंचवड महानगरपालिका साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्याचबरोबर ढोलकी झाली बोलकी सह्याद्री वाहिनी प्रस्तुत तसेच झी युवा चॅनेल प्रस्तुत लाव रे तो व्हिडिओ या कार्यक्रमात ढोलकी वादनासाठी सहभाग नोंदवला आहे.




### सोगावमधील दोन सख्खे भाऊ झाले डॉक्टर

**करमाळा, दि. २० जानेवारी-**

उंदरगाव तसेच पूर्व सोगाव मध्ये रहिवासी असलेल्या निकत परिवारातील लक्ष्मण शिवदास निकत याच्या दोन्ही मुलांनी डॉ. माधव लक्ष्मण निकत व डॉ. केशव लक्ष्मण निकत एकाचवेळी एमबीबीएस पदवी प्राप्त करून गावात एक आदर्श निर्माण केला आहे. या दोन्ही मुलांनी बारावी झाल्यानंतर २०१८ साली रशियामध्ये प्रवेश घेतला. रशियामध्ये सहा वर्षाचा कोर्स पूर्ण करून त्यानंतर भारतामध्ये प्रॅक्टिस करण्यासाठी फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन यांची एक परीक्षा असते. या परीक्षेसाठी साठी दिल्लीमध्ये सहा महिने तयारी केली. १२ जानेवारीला ती परीक्षा देऊन काल २० तारखेला सायंकाळी त्याचा निकाल लागला आणि या परीक्षेत ही दोन्ही भावंड चांगल्या गुणवत्तेने उत्तीर्ण होऊन भारतीय सर्टिफिकेट मिळवून पुढील शिक्षण व डॉक्टर प्रॅक्टिस करण्यास पात्र झाले आहेत. या प्रवासामध्ये त्यांना त्यांच्या आई वडील, आजी आजोबा, नातेवाईक,मित्रपरिवार शिक्षक या सर्वांचे सहकार्य लाभले.



### गुळपोळीच्या बालआनंद बाजारात ३० हजारांची उलाढाल

**वैराग, दि. २० जानेवारी-**

भैरवनाथ माध्यमिक विद्यालय गुळपोळी येथे बाल आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व फित कापून चेअरमन कल्याण चिकणे, गणेश चिकणे, पोलीस पाटील बाळू पिसे, धनंजय बावणे आणि मुख्याध्यापक प्रमोद देशमुख यांच्या हस्ते बाल आनंद बाजाराचे उद्घाटन करण्यात आले. या बाजारात जवळपास १०८ स्टॉल लागले होते. यात सर्व प्रकारचा भाजीपाला, फळभाज्या, फळे तसेच स्टेशनरी, किराणा, चहा हॉटेल तसेच विविध खाद्यपदार्थांची दुकाने मुलांनी लावली होती. २९,५५७ रुपयांची उलाढाल झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या बाजारात खरेदी करण्यासाठी व विविध खाद्य पदार्थांची चव घेण्यासाठी गावकरी मोठ्या प्रमाणावर जमले होते. मुलांचे विक्री कौशल्य पाहून पालकांनी कौतुक केले. या आनंद बाजारत मुलांना विक्री कौशल्य दाखवण्याचे बळ मिळाले. यासाठी मुख्याध्यापक प्रमोद देशमुख, शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# साहेब पाणी कधी सोडणार? ज्वारी जळून गेली ओ

## बाभळगाव फाट्यावरील शेतकऱ्यांचा आर्त टाहो





**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २० जानेवारी-**

धरण उशाला कोरड घशाला अशीच अवस्था बोरी धरणाची झाली असून पाऊस काळ जास्त झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरूनही रब्बी हंगामातील पिकासाठी कॅनॉलद्वारे डिसेंबरमध्ये सोडण्यात येणारे पाणी जानेवारी चालला तरी आजून सोडण्यात आले नाही. त्यामुळे पाणी येणार म्हणून उसनवारी, व्याजाने पैसे काढून गरीब शेतकऱ्यांनी ज्वारी, गहू, हरभरा भरमसाठ पेरला. पण पाटबंधारे खात्याच्या गलथान कारभाराचा फटका त्यांना बसला हजारो एकरवरील ज्वारीचे पीक पाण्याअभावी जळून चालली आहेत. त्यातूनच शेतकऱ्यांनी साहेब पाणी कधी सोडणार असा आर्त प्रश्न पाटबंधारे च्या अधिकाऱ्यांना विचारला आहे.

तुळजापूर तालुक्यातील बोरी धरण नळदुर्ग येथील रब्बी हंगामासाठी कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यात येते. परंतु अद्याप पाणी न सोडल्याने पाणी कधी येणार याची शेतकरी वाट पाहत आहे. अणदूर परिसरातील बाभळगाव फाटा, खुदावाडी फाटा, शहापूर फाटा असे कॅनॉलचे मार्ग असून याद्वारे पाणी सोडण्यात येते. बाभळगाव फाटा कॅनॉलमध्ये मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे वाढले आहेत. कॅनॉल दुरुस्ती करणे आवश्यक असताना बाभळगाव फाटा कॅनॉलमध्ये कसल्याच प्रकारचे दुरुस्ती न करता पाणी सोडण्यात आले होते. कॅनॉलमध्ये झाडे, झुडपे, गवत मोठ्या प्रमाणात झाल्याने कॅनॉल फुटण्याची शक्यता निर्माण झाल्याने पाणी बंद करण्यात आले. जानेवारी महिन्यांचे पंधरा दिवस उलटले. अद्याप पाणी न सोडल्याने रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा ही पिके कोमेजून जात आहेत. पांटबधारे अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. होणाऱ्या नुकसानीला जबाबदार कोण, असा सवाल शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. डागडुजी काटेरी झुडपे काढले नसल्याने पाणी तुंबून पाणी गळती किंवा कॅनॉल फुटण्याचा धोका निर्माण झाला. त्यामुळे सोडले पाणी बंद करण्यात आले. काही ठिकाणी दुरुस्ती करून रडक्याचे डोळे पुसण्याचे काम संबंधितांकडून करण्यात आले आहे. कुरनूर धरणातील कॅनॉलच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपये खर्च झाले. कॅनॉल दुरुस्ती करून लवकरात लवकर पाणी सोडावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. प्रशासनाचा निष्काळपणाला शेतकरी वैतागला असून आजून कॅनॉल दुरुस्तीच नाही तर पाणी कधी येणार या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी एक महिन्यापासून पाणी सोडावे म्हणून मागणी करूनही प्रशासन जागचे हलत नाही.

#### आंदोलनाचा इशारा

शेतकरी संघटनेने निवेदन देऊन महिना उलटून गेला. पण पाणी सोडण्यात आले नाही. आर्थिक नुकसानीत असलेला शेतकरी मेटाकुटीस आला. पण त्याची कीव ना अधिकाऱ्यांना ना सत्ताधारी लोकांना आता शेतकरीच संघटित होऊन तीव्र आंदोलन करणार असल्याचे समजते. पिकांची अवस्था बघून युद्धपातळीवर कॅनॉल दुरुस्ती करून ताबडतोब पाणी सोडावे, अशी मागणी बाभळगाव फाट्यावरील शेतकऱ्यांनी केली आहे.

एक महिनाभरापूर्वी जवळपास १०० शेतकऱ्यांनी बोरी धरणाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन ५० शेतकऱ्यांनी रोख पाणीपट्टी भरली.अजून पाणी आले नाही. माझी ५ एकर ज्वारी असून व्याजाने पैसे जमा केले. पीक चांगले आले. पण पाण्याअभावी पिके वाळून जात आहेत. डोळ्यादेखत पीक पाण्याअभावी जळत असताना मन तीळतीळ तुटत आहे. निगरगट्ट प्रशासनाने आपल्या स्वतःच्या निष्काळजी पणाने शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यात अडकवले आहे. आता तरी लवकर पाणी सोडल्यास काहीतरी पदरात पडेल ही आशा आहे.

**- बालाजी राजपूत, शेतकरी, बाभुळगाव फाटा**

### भाजपा कार्यालय समोरून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २० जानेवारी -**

दहिटणे येथील भाजपा कार्यालयासमोरून चोरट्याने दुचाकी चोरून नेली. याबाबत उमेश चंद्रकांत कलागते (वय ४२, रा. प्लॉट नं. ४, लतादेवी नगर, कुमठा नाका, स्वागत नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उमेश कलागते यांनी १० जानेवारी रोजी दत्यांची एमएच १३ बीएल ३३३२ क्रमांकाची दुचाकी ही दहिटणे येथील भाजपा कार्यालयासमोरील ऑफीसच्या बाजूला हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेली. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.

## स्वामींच्या आशीर्वादाने सोशल मीडिया कार्याला गती लाभेल : प्रकाश गाडे



**स्तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी**

सर्व स्वामी भक्तांप्रमाणे मीही स्वामी समर्थांचा भक्त आहे. स्वामी समर्थांची कृपा म्हणजे माझ्या जीवनावर असलेली मोठी सावली आहे. या सावलीच्या आधारानेच मी महाराष्ट्र भाजप सोशल मीडियाच्या प्रमुख पदी कार्यरत आहे. स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने कार्य करण्यास

नेहमीच प्रेरणा मिळते, म्हणून आज येथे स्वामींचे दर्शन घेतल्यानंतर स्वामींच्या आशीर्वादाने माझ्या भारतीय जनता पार्टीच्या सोशल मीडिया कार्यास नक्कीच गती लाभेल असे मनोगत महाराष्ट्र भाजप सोशल मीडिया प्रमुख प्रकाश गाडे यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील वटवृक्ष देवस्थानला सदिच्छा भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी प्रकाश गाडे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना गाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, गणेश दिवाणजी, संतोष पराणे, विपुल जाधव इत्यादी उपस्थित होते.

## आंधळगावजवळ कारचे टायर फुटून अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० जानेवारी-**

सोलापूर-कोल्हापूर या राष्ट्रीय महामार्गावरील आंधळगाव जवळील नडगीरे हॉस्पिटल जवळ भरधाव वेगात जाणार्या एका कार गाडीचे टायर फुटून गाडी पलटी होवून अपघात घडल्याची घटना घडली असून या प्रकरणी कारचालक अनिल मच्छिंद्र कोतवाल (रा.हरंगुळ बु।। जि.लातुर) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी महेश बालाजी चामे (रा.लातुर) दि.८ जानेवारी रोजी फिर्यादीचे नातेवाईक आकाश वलसे (रा. लातुर) यांची महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ एम.एच.४३ सी. जी. ९००१ यामधून आकाश वलसे,तुषार रेड्डी,अनिल कोतवाल असे लातुर हून कोल्हापूर येथील लक्ष्मी दर्शन करिता गेले होते. दि.९ रोजी रात्री ८ वाजता लातुरकडे परत जात असताना मंगळवेढा-सांगोला या राष्ट्रीय महामार्गावरील नडगीरे हॉस्पिटल समोर आरोपी कोतवालने आपल्या ताब्यातील वाहन अती भरधाव वेगात चालवून वाहनाच्या समोरील डाव्या बाजूचे टायर फुटून वाहनावरील ताबा सुटल्याने कार रोडच्या खाली खड्ड्याम ध्ये आदळून अपघात झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले असून या वाहनाचे नुकसान झाल्याचे म्हटले आहे.




## टेंभुर्णीतील यशराज ॲग्रो इंडस्ट्रीज सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २० जानेवारी-**

नुकतेच ग.दी माडगूळकर नाट्यग्रह,पुणे येथे यशराज ॲग्रो इंडस्ट्रीज टेंभुर्णी या आपल्या कंपनीने अल्पावधीमध्ये शासनाच्या सर्व नियम व अटींचे पालन करून दिलेल्या विहित मुदतीमध्ये कॅटल फीड प्रकल्प यशस्वीरित्या सुरू केल्याबद्दल केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या वतीने यशराज ग्रो इंडस्ट्रीजला सन्म ाननीय अतिथींच्या उपस्थितीमध्ये गौरविण्यात आले.

यावेळी फिशरीज, निमल हसबंडरी अँड डेअरी केंद्रीय मंत्री राजीव राजनसिंग, केंद्रीय राज्यमंत्री एसपी सिंग बहेल, फिशरीज निमल हसबंडरी आणि डेअरी केंद्रीय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन, फिशरीज निमल हसबंडरी आणि डेअरी महाराष्ट्र मंत्री पंकजाताई मुंडे, प्रधान सचिव अलका उपाध्याय, डिपार्टमेंट ऑफ ॲनिमल हसबंडरी अँड डेरी भारत सरकार, गोसेवा आयोग मंडलचे अध्यक्ष शेखरजी मुंदडा, राज्यसभा सदस्य श्रीमती मेधाताई कुलकर्णी, विधान परिषद सदस्य श्रीमती उमाताई खापरे, विधान परिषद सदस्य अमित घोडके, प्रधान सचिव केंद्रीय पशुसंवर्धन विभाग श्रीमती वर्षा जोशी, अतिरिक्त सचिव केंद्र सरकार संजीवजी माथुर, पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र सरकार सचिव डॉ. एन रामास्वामी, पिंपरी चिंचवड म हानगरपालिका आयुक्त शेखर सिंह जी, आयुक्त पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन डॉ प्रवीण कुमार देवरे, स्टेट बँक ऑफ इंडिया चे मॅनेजींग डायरेक्टर व त्याचप्रमाणे केंद्र व राज्य शासनाच्या सदर विभागातील संबंधित खात्याचे सर्व वरिष्ठ अधिकारी त्याचप्रमाणे देशातील व राज्यातील अनेक नामांकित कंपन्यांचे उद्योजक या सर्वांच्या उपस्थितीमध्ये ग दि माडगूळकर नाट्यगृह, पिंपरी चिंचवड या ठिकाणी आजचा हा नयनरम्य सोहळा पार पडला.

## मानेगाव विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० जानेवारी-**

मानेगाव विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्साही वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सुभाष लऊळकर, बाळासो शिंदे, घोडके, उबाळे, रविंद्र वाघमारे, ताई बाबर, जगन्नाथ बाबर, आप्पासो बाबर, अर्जून बाबर, तानाजी साळे, नारायण बाबर यांच्याहस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सुभाष लऊळकर मनोगतात म्हणाले विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी विविध गुणदर्शन सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यामधूनच चांगले सर्वगुण संपन्न विद्यार्थी निर्माण होतात, त्यामुळे अशा कार्यक्रम ातून नवीन कलाकार जन्माला येत असतो. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी टिपरी नृत्य, मंगळगौर, अंबाबाई गोंधळ, कोळी नृत्य, थीम डान्स, शेतकरी गीत, वासुदेव गीत, लावणी, देश भक्तीपर गीत, रेकॉर्ड डान्स, अंधश्रद्धा वर आधारित नाटिका, शेतकरी आत्महत्या नाटिका अशा कला सादर केल्या. याप्रसंगी जालिंदर बाबर, मेजर माणिक बाबर, दगडू बाबर, अनिल बाबर, सचिन बाबर, वसंत बाबर, तुकाराम बाबर, विश्वनाथ पाटील, प्रा.प्रकाश बाबर, विनोद पाटील, पोपट बाबर, अशोक मोरे, लालासो बाबर, तानाजी बाबर, बाळासाहेब शिंदे, बंडू बाबर, महादेव बाबर, बाबुराव भजनावळे, आण्णासो कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक उबाळे, सूत्रसंचालन ऐवळे व शिंदे यांनी केले. आभार अरुण खटकाळे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळासो मिसाळ, ठोकळे, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी संस्था अध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी भेट दिली.

# बालकलाकारांनी साकारले प्रेरणादायी शिवचरित्र

### पोदार फिनिक्स लर्निंग स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

महाराष्ट्राच्या मराठी म नांना कायम प्रेरणा देणाऱ्या शिवचरित्रातील अत्यंत प्रेरणादायी प्रसंग साकारत पोद्दार फिनिक्स लर्नेड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिवकालीन इतिहास जिवंत केला. पोतदार फिनिक्स लर्नेड स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील सुसंवाद आणि मुख्याध्यापक व पालक आणि संस्थाचालक यांच्यातील वैचारिक देवाण-घेवाण यांचे दर्शन घडले.

वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, स्कूलचे मार्गदर्शक उपआयुक्त विजय कबाडे, संस्थेच्या अध्यक्ष ॲड. वैशाली कबाडे, संस्थेचे सचिव संदीप बर्डे, प्रमुख वक्ते विशाल गरड, कॅ. विलास सूर्यवंशी, मुख्याध्यापक संप्रहास संदगिरी यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्य पातळीवर मि ळवलेल्या विविध पुरस्कारांबद्दल त्यांचे संस्थेकडून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी संस्थेमधील प्रतिभा हावळे, विजय ढगे, हनुमंत चव्हाण, माया सावंत यांना समर्पित जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रथम श्रेणी मिळवलेले विद्यार्थी- पहिली प्रथम समृद्धी भड, स्वराज जाधव, सुहानी मगर, वल्लभ पोळ, अभयसिंह पाटील. दुसरी मुक्ता सुरवसे, वेद जहागीरदार, आयुष गाढवे. तिसरी स्वराली मस्के, आर्य डोईफोडे. चौथी शौर्य पवार, आराध्या घुटे, गुंजन सिंधी. पाचवी प्रथमेश देशमुख, प्रज्ञय बनसोडे. सहावी आधी गांधी. सातवी जय बुरगुटे. आठवी समृद्धी सातपुते. नववी उदयन गायकवाड. दहावी राजेश्वरी मसाळ (प्रथम), शर्वरी भोसले (द्वितीय), कुणाल करळे (तृतीय). पोद्दार फिनिक्स लर्निंग स्कूलमधील हे स्नेहसंमेलन उत्कृष्ट केशभूषा, वेशभूषा, अभिनय, संगीत, नृत्य, प्रकाश योजना, तसेच आनंदी उत्साही वातावरणात बागडणारे शाळकरी मुले, तसेच आपल्या मुलांचे कौतुक पाहायला आलेले त्यांचे पालक यांच्या उपस्थितीमुळे बहारदार ठरले.

#### क्रीडा क्षेत्रात यांनी मारली भरारी

**बुद्धिबळ स्पर्धा-** अनन्या उलभगत, अक्षरा देशमाने, अर्णव कालवे. **जलतरण स्पर्धा-** यशवर्धन भोसले, तनवी नवले, शौर्य नवले. मिस टीन महाराष्ट्र २०२४- सृष्टी मुखणे. **कला आणि संगीतमध्ये विशिष्ट प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी-** गार्वी गंभीर, प्रज्वल कोरके, प्रदीप्ती कोरके, अनन्या उलभगत, रुंजी चव्हाण, अनिरुद्ध वाळके, काव्या कुलकर्णी, आराध्या करवा.

#### स्केटिंगमध्ये विशेष प्राविण्य

पृथ्वीराज जाधव, इब्राहिम शेख.

**समर्पित शिक्षक पुरस्कार :** हनुमंत चव्हाण, प्रतिभा हावळे, माया सावंत, विजय ढगे यांना गौरवण्यात आले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अन्नछत्र मंडळाचे नियोजन प्रशंसनीय : जिल्हाधिकारी पाठक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाचे सुनियोजन नक्कीच प्रशंसनीय असल्याचे मनोगत बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी व्यक्त केले.



ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी लखन झंपले, अजय पाटील-कडबगावकर, पुरोहित अप्पू पुजारी, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, भारत पाटील, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. अरविंद कुंभार यांना साहित्य पुरस्कार प्रदान

**अकलूज, दि. २० जानेवारी-**

ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी लिहिलेल्या पक्ष्यांवरील संशोधन व संपादित 'पक्ष्यांची दुनिया' या पुस्तकाला मराठवाड्यातील एकता फौंडेशनने जाहीर केलेले राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. बीड जिल्ह्यातील दहिवंडी -शिरूर कासार येथील महात्मा फुले विद्यालयातील राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरीत आयोजित केलेल्या सातवे एकता मराठी साहित्य संमेलनात छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्षा तथा संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते डॉ.कुंभार यांना रोख रक्कम अडीच हजार व स्मृतिचिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड, विलास सिंदगीकर सह मराठवाडा साहित्य परिषदेचे माजी कोषाध्यक्ष व ग्रामीण साहित्यिक डॉ. भास्कर बडे, एकता फौंडेशनचे अध्यक्ष अनंत कराड व संमेलनाचे स्वागताध्यक्ष ड. भाग्यश्री ढाकणे - चेमटे हे उपस्थित होते. १७ व १८ जानेवारी रोजी भरविण्यात आलेल्या या संमेलनात शिरूर कासार तालुक्यातील महसूल अधिकारी, कार्यकारी अभियंता, बीड जिल्हा कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी, पोलीस निरीक्षक विविध क्षेत्रातील मान्यवर, परिसरातील नागरिक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कासेगाव येथील शिबिरात ७० जणांचे रक्तदान

**पंढरपूर, दि. २० जानेवारी-**

तालुक्यातील कासेगांव येथे पंढरपूर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती वसंतराव देशमुख यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये तब्बल ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. वसंतराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उघ्दाटन अनवली गावातील जेष्ठ नेते सिताराम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर श्री विठ्ठल रूक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमास सरपंच शोभाताई भोसले, शिवाजी भोसले, आबासाहेब देशमुख, उपसरपंच संग्रामसिंह देशमुख, संजय वाघमारे, प्रकाश रूपनर, दिपक जाधव, विनायक गुरव, औदुबर निकम उपस्थित होते.



### सेवालाल जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी चव्हाण

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

भारतातील सुमारे १५ कोटी बंजारा बांधवांचे आराध्य दैवत श्री संत सेवालाल महाराजांच्या २८६ व्या जयंतीनिमित्त उत्सव पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. अध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड छत्रपती शिवाजी महाराज चौकातील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप राठोड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. उपाध्यक्षपदी लाला जाधव, बबलू राठोड, कार्याध्यक्षपदी बाळू पवार, विनोद पवार, मिरवणूक प्रमुख बंडू पवार, सचिव अविनाश चव्हाण, सहसचिव दिलीप राठोड, खजिनदार मिथुन राठोड, सहखजिनदार अविनाश पवार, सुमित पवार यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी माजी नगरसेवक भोजराज पवार, ॲड. शिवाजी राठोड, माजी अध्यक्ष अंकुश गनरोद, शिवाजी राठोड, शिवाजी चव्हाण, रमेश चव्हाण, लक्ष्मण राठोड, सरपंच मल्लू पवार, अक्षय राठोड, राजू पवार, मोतीराम राठोड, सुनील पवार, चंदू चव्हाण, अशोक राठोड, विनोद राठोड, किसन राठोड, प्रवीण चव्हाण, किरण राठोड, संजय राठोड आदी उपस्थित होते.



### यशोदीप गायकवाडची विद्यापीठ फुटबॉल संघात निवड

**सांगोला, दि. २० जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरच्या आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने चांगली कामगिरी करत यशोदीप सिद्धेश्वर गायकवाड याची राजस्थान (वडोदरा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंना डॉ. सुरेश भोसले, प्रा. जगदीश चेडे, अध्यक्ष बाबुराव गायकवाड, तात्यासाहेब केदार, प्रा. पी. सी. झपके, नागेश गुळमिरे, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, साहेबराव ढेकळे, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी अभिनंदन केले.

## वाघ पकडण्यासाठी ६० जणांचे पथक

### महिन्यापासून बार्शीमध्येच वाघाचा मुक्काम; अनेक जनावरांवर हल्ले

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० जानेवारी -**

एक महिन्यापासून बार्शी तालुक्यामध्ये वाघ आणि बिबट्याने दहशत निर्माण केली आहे. त्यानी आतापर्यंत अनेक पाळीव जनावरांवर हल्ले केलेले आहेत. वाघ सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असल्याने संपूर्ण तालुक्यात घबराहटीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने या वाघाला पकडण्याचे आदेश काढलेले आहेत. याची जबाबदारी आतापर्यंत ६० पेक्षा अधिक वाघ पकडणाऱ्या पथकावर सोपविली आहे.

१६ डिसेंबरला चारे गावात वाघ आढळल्यानंतर त्याचा मुक्काम अद्यापही बार्शी व वैराग परिसरातच असल्याचे दिसत आहे. जवळपास महिनाभरापासून या वाघाने चारे, उक्कडगाव, चारे, ढेंबरेवाडी, पांढरी, मुंगशी (आर.) राळेरास, वैराग भागातील लाडोळे हद्दीत पाळीव जनावरांवर हल्ले करून दहशत निर्माण केल्यानंतर वाघाचा वावर तालुक्यातच आहे. आतापर्यंत वाघाने ज्या ठिकाणी प्रवास केला, तेथील पाळीव जनावरांवर हल्ले केलेले आहेत.

महिनाभराच्या कालावधीत बार्शी तालुक्यात वाघ व बिबट्याने हल्ला करून सुमारे २० शेतकऱ्यांच्या गायी, वासरे, रेडकू, बोकड अशा विविध पाळीव प्राण्यांवर हल्ला करून त्यांना ठार केलेले आहे. मात्र वन विभागाकडे आतापर्यंत फक्त सात पशुपालकांचा निधी उपलब्ध झाला असून यामध्ये अकरा प्रस्ताव अजूनही प्रलंबित आहेत तर दोन प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवले आहेत. महिनाभराच्या कालावधीत वाघ व बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांच्या मृत्यूनंतर मोबदला म्हणून मृत पाळीव प्राण्यांच्या बाजार भाव दराप्रमाणे ७० ते ८० टक्के निधी पशुपालकांना दिला जाणार आहे. यामध्ये मृत्यू झालेल्या पाळीव प्राण्याच्या वयाचा विचार केला जाणार आहे. सोलापूर वन विभागाच्या वतीने आतापर्यंत वाघ व बिबट्याच्या हल्ल्यात मयत झालेल्या जनावरांचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना खालील प्रमाणे देण्यात येणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

#### मदतीसाठी कागदपत्रे जमा करा

वनपालांनी जरी पंचनामा केलेला असला तरी संबंधित शेतकऱ्याकडून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्यामुळे ११ जणांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. ज्यांचे पंचनामे झालेले आहेत त्यांनी कागदपत्रे संबंधीत विभागाला द्यावी लागतील. कागदपत्रे जमा नसल्यामुळे त्यांचे प्रस्ताव पाठविता आलेले नाहीत. तरी ज्यांची कागदपत्रे अपूर्ण आहेत, त्यांनी लवकरात लवकर कागपत्रे जमा करावीत. म्हणजे त्यांचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविता येतील असे वनविभागाकडून सांगितले आहे.

#### यांना मिळणार मदत

मारुती ठाकरे १६ हजार, अक्षय पालकर ३२ हजार, रविराज सलगर ४२ हजार, नारायण ढेंबरे १४ हजार, हिरालाल मिरगणे १८ हजार, बालाजी सोनवणे १० हजार, महादेव चोरमले २० हजार पाचशे अशा एकूण सात शेतकऱ्यांना १ लाख ५२ हजार पाचशे रुपयांचा धनादेश दिला जाणार आहे. दोन जणांचे प्रस्ताव वरिष्ठ कार्याकडे पाठवण्यात आले आहेत.

## पिलीव परिसरात नेटवर्क नसल्यामुळे ग्राहक वैतागले

### तक्रार करुनही अधिकारी रेंजच्या बाहेरच!

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २० जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात जिओच्या नेटवर्कचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. मागील अनेक महिन्यांपासून पिलीव परिसरात जिओचे नेटवर्क व्यवस्थित नसल्यामुळे ग्राहक अक्षरशः वैतागले आहेत.

माळशिरस तालुक्यातील पिलीव हे एक मोठी बाजारपेठ असणारे गाव आहे. पण याठिकाणी नेटवर्क व्यवस्थित मिळत नाही. यामुळे उद्योग व्यवसायास मोठा अडथळा येत आहे. सध्याच्या तंत्रज्ञान युगात सर्वत्र कामे ही ऑनलाईन होत असून नवनीवन तंत्रज्ञानाचा उपयोग किंवा वापर करण्यासाठी चांगले नेटवर्क असणे फार आवश्यक आहे. सुरुवातीला जिओने चांगल्या ऑफर ग्राहकांना दिल्यामुळे जिओने आपल्याकडे ग्राहक मोठ्या संख्येने खेचले खरे आणि मार्केटमध्ये सर्वाधिक ग्राहक जिओने स्वतकडे खेचत अक्षरशः धुमाकुळ घातला खरे. पण नेटवर्क प्रॉब्लेम आल्यामुळे ग्राहकांची गळती सुरु झाली आहे. पिलीव परिसरात जिओकडून ग्राहकांना अजिबात चांगली सेवा मिळत नाही. याबाबत कंपनीकडे वारंवार ग्राहक तक्रार करीत आहेत. पण अधिकारी याबाबत बेदखलच आहेत. पिलीव परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून जिओ नेटवर्कचा अक्षरशः लपंडाव सुरू आहे. यामुळे नागरिकांना कॉलिंग करणे, मेसेज पाठविणे, एखादी फाईल डाऊनलोड करणे किंवा फाईल ट्रान्स्फर करणे किंवा नवीन माहिती शोधणे नेटवर्क नसल्यामुळे काहीच करता येत नाही. फक्त मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत अधिकाऱ्यांनी रेंजमध्ये येऊन नेटवर्कमध्ये सुधारणा करावी अन्यथा पिलीव परिसरातील जिओचे ग्राहक इतर कंपनीकडे वळतील हे जवळपास नक्की झाले आहे. कारण मोठ मोठ्या रक्कमेचा बॅलन्स करुनही ग्राहकांना चांगली सेवा मिळत नाही. हा मनस्ताप ग्राहकांना होत आहे.



## नारायण चिंचोलीत सूर्यनारायण यात्रेत पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जानेवारी-**

पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे ग्रामदैवत सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साहात सुरू असून ही यात्रा पौष महिन्यात महिनाभर चालते. यानिमित्ताने पालखी सोहळा काढण्यात आला.

विशेषतः पौष महिन्यामधील रविवारी या यात्रेस अधिक महत्त्व असते. दर रविवारी पंढरपूर तालुक्यासह जिल्ह्यातील हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देवाचे अतिप्राचीन मंदिर असून हे मंदिर पुरातन हेमाडपंती आहे.

स्थापत्य रचनेतील हा अद्भुत कलेचा नमुना आहे. कोणार्क नंतर देशातील एकमेव असे महाराष्ट्रातील पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देवाचे मंदिर असून विशेषतः पौष महिन्यातील तिसऱ्या रविवारी देवाचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो.

१९ जानेवारी रोजी हा पालखी सोहळा मोठ्या भक्ती भावाने हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. या यात्रा काळात दर रविवारी सूर्यनारायण देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ तसेच महाप्रसाद अन्नदाते यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे आयोजन केले जाते. या बरोबरच पालखी सोहळा पार पडण्यासाठी सूर्यनारायण देवस्थान ट्रस्ट व संचालक मंडळ, नारायण चिंचोली ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, विविध सामाजिक संघटनाचे पदाधिकारी तरुण वर्ग ग्रामस्थ हा पालखी सोहळा पार पडण्यासाठी त्यांचे मोलाचे सहकार्य लाभते.

## सततच्या बस बिघाडामुळे प्रवाशी त्रस्त

### सवलतीपेक्षा सुरळीत, निर्धोक सेवा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सदशिवनगर, दि. २० जानेवारी-**

रस्तात होणाऱ्या सततच्या बस घोटाळ्याने नागरिक त्रस्त झाले असून सवलती देण्यापेक्षा सेवा देण्याकडे लक्ष देण्याची आवशकता असल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

सर्वच आगारातील अनेक बस नादुरस्त आहेत. ज्या आहेत त्या शेवटच्या थांब्यापर्यंत पोहोचतील याची खात्री बसचालकांनादेखील नाही. अनेक बस नादुरुस्त झाल्याने व नव्याने बस उपलब्ध न झाल्याने अनेक आगारांनी बसेसच्या फेऱ्या बंद केल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक बस स्थानकावर प्रवाशांची तुडुंब गर्दी पहावयास मिळते. त्यामध्ये जेष्ठ नागरिक, महिलांना अनेक सवलती दिल्याने व सर्व सामान्यांना परवडणारी बस असल्याने सर्वच गाड्यांना प्रचंड गर्दी असल्याचे दिसून येते. काही बसेस रस्त्यात बंद पडतात, त्यावेळी त्यामधील प्रवाशांना दुसऱ्या बसमध्ये बसवून देण्यासाठी वाहकाला कसरत करावी लागते. बसमध्ये गर्दी असल्याने या प्रवाशांना ताटकळत बसावे लागते.



त्यामुळे वेळेवर पोहचणे मुश्कील होताना दिसून येत आहे. आता लग्नसराई सुरु असल्याने त्यात प्रचंड तान बसवर आहे. संबधित विभागाने आहेत त्या बस दुरुस्त कराव्यात अशी मागणी होत असून शासनाने सवलतीपेक्षा सेवा देण्याकडे भर देऊन सर्वसामान्याची बससेवा सुरळीत व सुरक्षित करावी अशी मागणी होत आहे. माळशिरस हे तालुक्याचे ठिकाण आहे. परंतु या ठिकाणी एकही बस मुक्कामी नाही. परंतु आता दररोज घोटाळा झाल्याली बस स्थानकात उभी दिसत आहे.

## चेतन जाधव यांना जिल्हास्तरीय कृतीशिल पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना प्रेरणा, प्रोत्साहित करण्यासाठी शाबासकीची थाप देणे गरजेचे आहे. त्यामुळे ते पुन्हा उत्साहाने काम करतील व भारताची भावी पिढी घडवतील. यासाठी गुणवंतांना जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे असे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी व्यक्त केले. यावेळी चेतन जाधव यांना जिल्हास्तरीय कृतीशिल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

केगाव येथील सिंहगड इन्स्टिट्यूट येथे महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे जिल्हास्तरीय पुरस्कार वितरणप्रसंगी माजी शिक्षक आमदार सावंत बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. शेखर जगदे, जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर, शंकर वडणे, परमेश्वर व्हसुरे, सुरेश नेलुरे, सरदार नदाफ आदी उपस्थित होते. अक्कलकोट तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून श्री अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर, जिल्हास्तरीय आदर्श



लिपिक म्हणून मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलचे चेतन जाधव, श्री शिवचलेश्वर प्रशाला मैंदर्गीचे आदर्श शिक्षक म्हणून रमेश येणगुरे, आदर्श मुख्याध्यापक राजकुमार कुलकर्णी, संजयकुमार लिंबितोटे सेवक यांना सन्मानित करण्यात आले. अक्कलकोट येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलचे शिक्षकेत्तर कर्मचारी चेतन जाधव यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय कृतिशील लिपिक पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## रन फॉर को-ऑपरेटिव्ह मुव्हमेंटचा नारा देत माढ्यात मॅरेथॉन

### सहकार महर्षी गणपतराव साठे यांची जयंती; राज्यातील स्पर्धकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २० जानेवारी-**

सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त माढा शहरात १६ जानेवारीपासून शहरासह परिसरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने माढा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी रन फॉर को ऑपरेटिव्ह मुव्हमेंट या टॅग लाइनखाली राज्यस्तरीय खुल्या मॅरेथॉन स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत सोलापूर, मुंबई, पुणे, नाशिक, सातारा, सांगली, चिपळूण, धाराशिव यासह अनेक ठिकाणाहून स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये पुरुषांच्या २१ किमी हाफ मॅरेथॉन पर्धेत सांगलीचा अंकुश हाके याने प्रथम क्रमांक मिळवला. महिलांच्या १० किमीच्या मॅरेथॉन स्पर्धेत चिपळूणच्या साक्षी जड्याळ यांनी अव्वल स्थान पटकावले.



-२१ किलोमीटर हाफ मॅरेथॉनमधे अंकुश हाके, सांगली (प्रथम), चैतन्य रुपनर, सांगली (द्वितीय), प्रवीण कांबळे, सांगली (तृतीय).
-१० किलोमीटर महिला गटात - साक्षी जड्याळ, चिपळूण (प्रथम), विशाखा शिंदे, पुणे (द्वितीय), आरती बाबर, सातारा (तृतीय).
-१० किलोमीटर १८ वर्षाखालील पुरूष श्रीकांत सरगर, सांगोला (प्रथम), बिरुदेव कोळेकर, सांगली, (द्वितीय), रोहित मिश्रा, सातारा (तृतीय).
-३ किलोमीटर प्रकारात - सूरज शेगर, धाराशिव (प्रथम), सचिन चौगुले, घाराशिव (द्वितीय), प्रथमेश चौगुले, (तृतीय).

रविवारी सकाळी सुरू करण्यात आलेल्या या स्पर्धेला माजी आमदार धनाजीराव साठे, तहसीलदार विनोद रणवरे, सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर यांच्यासह नगराध्यक्षा ॲड. मिनलताई साठे, दादासाहेब साठे, उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला प्रारंभ केला. यामध्ये पुरुष गटात १७५ तर महिलांमधून १२५ जणांचा सहभाग होता. विविध प्रकारात मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. या खुल्या मॅरेथॉन स्पर्धेत १२५ महिला धावल्या असून स्पर्धेच्या तिनही गटामध्ये महिलांचा सहभाग होता.

या स्पर्धेसाठी प्रवीण घाडगे, प्रकाश जाधव, गणेश जोशी, सिद्धेश्वर मारकड, सुहास चवरे, कृष्णा राऊत, विजय काळे, उमेश साठे, नाना साठे, ताना साठे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## धाराशिव जिल्ह्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान

### 30 जानेवारी ते १२ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**
धाराशिव जिल्ह्यात कुष्ठरोग शोध मोहिम ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत १०० टक्के ग्रामीण भाग व शहरी भागातील जोखीमग्रस्त लोकसंख्या असणाऱ्या भागामध्ये राबविण्यात येणार आहे.

३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२५ दरम्यानच्या या पंधरवाड्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृतीचे विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

त्याबाबतच्या जिल्हा समन्वय समितीची बैठक आज २० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात संपन्न झाली. या अभियानासाठी १२०२ पथके तयार करण्यात आलेली आहे.ही पथके ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत घरोघरी जाऊन कुष्ठरोगाबाबत माहिती सांगुन शारिरीक तपासणी करणार आहेत. तपासणीकरीता घरोघरी येणाऱ्या आशा व पुरुष स्वयंसेवकास सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### देवकन्या गाडे यांची निवड

**धाराशिव, दि.२० जानेवारी -**
महाराष्ट्रातील सर्वात मोठी सर्वधर्मीय मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती म्हणून धाराशिव शहरातील जयंती म्हणून ओळखली जाते. या शिवजयंतीच्या महिला उपाध्यक्षपदी देवकन्या गाडे यांची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्ष संदीप इंगळे यांच्या हस्ते देवकन्या गाडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मध्यवर्ती शिवजयंतीचे सर्वच पदाधिकारी उपस्थित होते.



### जिल्हाध्यक्षपदी अयुब शेख

**तुळजापूर, दि.२० जानेवारी -**
डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी आयुब शेख यांची निवड करण्यात आली. १९ जानेवारी रोजी नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी त्यांना नियुक्तीपत्र, शाल श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सदरची निवड केली आहे. यावेळी प्रदेशउपाध्यक्ष सतीश सावंत, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, राज्य समन्वयक इकबाल शेख हे प्रमुख उपस्थितीत होते.

### गणेश शिंदे यांचे व्याख्यान


**जळकोट, दि.२० जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील शिवशंभू सोशल फाउंडेशनच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश आत्माराम शिंदे यांचे जीवन सुंदर आहे. या विषयावर दि.२३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता जळकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व नागरिकांनी या व्याख्यानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवशंभू सोशल फाउंडेशनने केले आहे.





### येरमाळ्यात रस्ता सुरक्षा अभियान

**येरमाळा, दि.२० जानेवारी -**
रस्ता सुरक्षा अभियान १ जानेवारी ते ३१ जानेवारी अंतर्गत महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव हद्दीमधील धाराशिव सहकारी साखर कारखाना व एसपी. शुगर अँड ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड या ठिकाणी ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर, बैलगाडी व ट्रक चालक यांना रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत रस्ते वाहतुकीचे नियमाबाबत जनजागृती करून ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रेडियम व रिफ्लेक्टर लावण्यात आले. सदरील कार्यक्रमानिमित्त दोन्ही कारखान्यांचे अधिकारी व त्यांचे स्टाफसह महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथील प्रभारी अधिकारी निशिकांत शिंदे व पोहवा खराडे, वाडकर, तोडकर, फंड, कलशेट्टी, दहीहंडे व बारकुल उपस्थित होते.



### रवी शेरखाने यांचा सत्कार

**धाराशिव, दि.२० जानेवारी -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे रवी नागेश शेरखाने यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. रवी नागेश शेरखाने जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभरचे माजी विद्यार्थी आहेत. सोलापूर येथे राज्य राखीव बल मध्ये एसआरपीएफ पदी निवड झाल्यामुळे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्रा. गणेश शेटे, प्रा. चिंटू आगळे, नाईकवाडी, प्रा. नानासाहेब पवार, मोहन चव्हाण आदी उपस्थित होते.

### पुरस्काराने विजयकुमार मोरे सन्मानित

**जळकोट, दि.२० जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेचे सहशिक्षक विजयकुमार मोरे यांना अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला जिल्हा समितीच्यावतीने देण्यात येणारा सन २०२४-२५ चा जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला जिल्हा समितीच्यावतीने कळंब येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात विजयकुमार मोरे यांना सपत्नीक जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

# १३५० रुपये कोटींच्या गुंतवणुकीतून ३०० मेगावॅटचा सोलर प्रकल्प

### ▶▶ नामांकित दहा कंपन्यांचे सादरीकरण : कौशल्य विकासासह रोजगार निर्मितीला मिळणार मोठी चालना : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**
धाराशिव जिल्ह्यात वर्षातील सर्वाधिक दिवस स्वच्छ सूर्यप्रकाश उपलब्ध असल्यामुळे धाराशिव सोलार प्रकल्पासाठी राज्यात सर्वात अनुकूल जिल्हा आहे. त्यामुळे ३०० मेगावॅटचा क्षमतेचे सोलर प्रकल्प उभारणीसाठी तब्बल १३५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी देशभरातील नामवंत कंपन्यांनी पुढाकार घेतला आहे. यातून रोजगार निर्मितीलाही मोठी चालना मिळणार आहे. तुळजाभवानी मंदिर समितीच्या जमिनीवर उभारण्यात येणाऱ्या सोलार प्रकल्पाबाबत मंदिर समितीच्या कार्यालयात देशातील नामवंत कंपन्यांनी सादरीकरण केले असल्याची माहिती समितीचे विश्वस्त तथा आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ तथा महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ख्याती असलेल्या आई तुळजाभवानी देवीचे मंदिर आणि शेकडो वर्षांपासून तुळजाभवानी देवीच्या मंदिरात वेगवेगळ्या सेवा रुजू करणाऱ्या मठाच्या शाश्वत उत्पन्नात वाढ करण्याच्या अनुषंगाने मंदिर संस्थानच्या जागेवर सोलार प्रकल्प उभारण्याबाबत ठराव संमत करण्यात आला होता.

सोलार प्रकल्प उभारण्यासाठी इच्छुक असलेल्या देशभरातील नामांकीत कंपन्यांकडून सादरीकरणासाठी प्रस्तावही मागविण्यात आले होते. मंदिर समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशभरातील इच्छुक असणाऱ्या दहा कंपन्यांनी उत्स्फूर्तपणे सोलार प्रकल्प उभारण्यासाठी तयारी दर्शवली आहे. शुक्रवारी या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी तुळजाभवानी मंदिर संस्थान तसेच विविध मठांच्या जमिनीवर कशा पद्धतीने सोलार प्रकल्प साकारला जाणार याबाबतचे वस्तुनिष्ठ सादरीकरण केले असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले आहे.

मोदींजींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या अपारंपरिक ऊर्जानिर्मितीच्या धोरणाला पूरक भूमिका घेत मंदिर समितीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत रिलायन्स, जुनीपर, जेएसडब्यु, सॉलीटिस, एनएचपीसी, टीयूव्ही यासारख्या नामांकीत कंपन्यांनी शुक्रवारी मंदिर कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सादरीकरणात सहभाग घेतला. मंदिर संस्थानकडे जवळपास १५०० एकर जमीन उपलब्ध आहे. या जागेवर ३०० मेगावॅट क्षमतेचे सोलार प्रकल्प उभे केले जाऊ शकतात.

त्यातून तुळजाभवानी मंदिर संस्थान तसेच विविध मठांना आर्थिक उत्पन्नाचा शाश्वत स्त्रोत उपलब्ध होणार आहे. या सादरीकरणात अनेक महत्त्वाच्या बाजूची इत्यंभूत माहितीही सादर करण्यात आली. मंदिर संस्थानच्या मालकीची आणि मठांच्या ताब्यात असलेली ही १५०० एकर जमीन सोलार प्रकल्प उभारण्यासाठी भाड्याने देणे संयुक्तिक राहील काय? सोलार प्रकल्पाच्या उभारणीनंतर एकूण उत्पन्नातील हिस्सा घेणे अथवा प्रकल्पामध्ये अंशत: गुंतवणूक करणे आवश्यक आहे काय? आदी महत्वपूर्ण बाबींवर मंदिर समिती कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत चर्चा झाली. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबतही चर्चा झाली असून त्यानुसार पुढील कामाची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला. तुळजाभवानी देवीचे मंदिर आणि परिसर धार्मिक पर्यटनाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून नावारूपाला यावे यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. या महत्वाच्या बैठकीसही ऑनलाईन उपस्थित राहून सर्व बाबी नीट समजून घेतल्या तसेच दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने काही महत्वच्या सूचनाही यावेळी मांडल्या. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे, मंदिर संस्थानच्या तहसीलदार माया माने, तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्यासह विविध दहा कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

### तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण : आ. पाटील



या प्रकल्पात तब्बल रु.१३५० कोटींचा गुंतवणूक व त्यातून ५०० हुन अधिक रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. सौर व पवन ऊर्जा प्रकल्पासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आपण नियोजन केले आहे. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य विकासाचे अल्प कालावधीचे कोर्स चालू करण्यात येणार आहेत. मोदींजींच्या नेतृत्वातील केंद्र सरकार व देवेंद्रजीच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या पूरक धोरणानुसार राज्यासह धाराशिव जिल्ह्यात सौर व पवनऊर्जा या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती क्षेत्रातील नामांकित उद्योजक मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणार असल्याने प्रचंड रोजगारनिर्मिती होणार असल्याने स्थानिक युवकांना याबाबतचे प्रशिक्षण आपल्या परिसरतच उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे.

# तिर्थातील नागोबा मंदिरात अनाधिकृत देणगी; भक्ताकडून बळजबरीने वसुली

### ▶▶ विश्वस्तांवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० जानेवारी -**
मौजे तिर्थ बु. येथील श्री नागनाथ देवस्थान ट्रस्ट (नागोबा मंदिर) मधील विश्वस्थांवर बळजबरीने पैसे वसूल करीत असल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ चौकशी करून खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी समाजसेवक जयकुमार नागनाथ पांढरे यांनी जिल्हाधिकारी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात केली आहे .

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, नागनाथ देवस्थान ट्रस्ट नोंदणी क्र. अ-२८४९ दि. २/१/१९९७ यांच्यावतीने भात लिंपण्यासाठी रू. १५१ रूपयाची देणगी घेत आहेत. कुठल्या नियम व नियमावलीने घेत आहेत. व कुठल्या कारणासाठी देणगी घेत आहेत, देणगीच्या नावाखाली गोरगरीब नागरिकाला लुटण्याचे काम सध्या नागोबा मंदिरात चालू आहे.

दाब दडपशाही करून ज्या भाविकांकडे पैसे नसतील अशा भाविकांना भात लिंपण्यासाठी वंचित ठेवलं जात आहे व भाविकाकडे पैसे नसतील तर पैसे आल्यावर किंवा पुढच्या वर्षी या ७५ ते ८० वयाच्या आजीला केळी व भाताची लहान प्लेट घेऊन आल्यामुळे रू.१५१ रूपये दया असे म्हणून मंदिरातून हाकलून दिले आहे, असे संभाषण केलेले जयकुमार पांढरे यांच्याकडे व्हिडीओ रेकॉर्डिंग आहेत.

तरी जयकुमार पांढरे सुध्दा भात लिंपण्यासाठी लाईनने गेलो असता पांढरे यांना बळजबरीने पा. क्र. ०३९ दि.१९ जानेवारी रू. १५१ छापील पावती दिलेली आहे. याची चौकशी व स्थळ पाहणी करून पंचनामा करून योग्य ते अहवाल तयार करावा व तिथे होत असलेली बळजबरीची वसुली ताबडतोब थांबवावी व योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून केली असून सदरील निवेदनावर जयकुमार पांढरे यांची स्वाक्षरी आहे.

# शासकीय आयटीआयला कल्याणस्वामी महाराजांचे नाव

### भाजपा नेते मा. आ. सुजितसिंह ठाकूर यांनी मानले महायुती सरकारचे आभार...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२० जानेवारी -**
परंडा (जि.धाराशिव) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण कल्याणस्वामी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परंडा असे केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व निविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी आभार मानले आहेत.

याबाबत मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी सविस्तर माहिती देत म्हटले आहे की, कल्याण स्वामी हे समर्थ रामदास स्वामींचे पट्टशिष्य, योगी व समर्थांनी रचलेल्या दासबोध या ग्रंथाचे लेखनिक होते. कल्याण स्वामींची समाधी परंडा तालुक्यातील डोमगाव येथे असून तेथे समर्थ रामदास स्वामींनी सांगितला व कल्याणस्वामींनी लिहून घेतला त्या दासबोध या कल्याण स्वामींच्या हस्ताक्षरातील सोनेरी व रूपेरी शाईने लिहलेल्या हस्तलिखित ग्रंथाची मूळ आद्य प्रत आजतागायत आहे. कल्याणस्वामींनी इसवी सन १७१४ मध्ये परंडा येथे देह ठेवला. त्यांच्या पार्थिव देहाचे अंत्यसंस्कार डोमगाव येथे सीना नदीकाठी करण्यात आले. सीना नदीचे कल्याणस्वामींनी श्रमहरणी असे नामकरण करून त्याची आरतीही रचली आहे, असे सांगितले.



अशा या महान अध्यात्मिक विभुतीचे नांव परंडा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस दिल्याबद्दल महाराष्ट्रातील महायुती शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे आभार ठाकूर यांनी मानले आहेत.

# सोलार पंप योजनेची 'ऊर्जा' शेतकऱ्यांना मिळेना : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**
पी. एम. कुसुम योजना, मुख्यमंत्री मागेल त्याला सोलर पंप असेल किंवा महावितरण विभागाच्या धोरण नसलेल्या कारभाराने शेतकऱ्यांचा आर्थिक फटका बसत आहे. तर कंपन्या मालामाल होत असल्याच आ. कैलास पाटील यांनी म्हटले आहे. यासंदर्भात आयोजित बैठकीनंतर आ. पाटील पत्रकारांशी बोलत होते.

कुसुम योजनेमध्ये आतापर्यंत सात हजार शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत पण त्यातील तीन हजार तीनशेहुन अधिक शेतकऱ्यांना पैसे भरून व मुदत संपूनही सोलर पंप बसविलेला नसल्याच समोर आलं आहे. यामध्ये काम पूर्ण करताना शेतकऱ्यांना आर्थिक अडवणूक करणे, कामासाठी आवश्यक मुरूम, खडी आदी साहित्य आणायला लावणं असे प्रकार होत आहेत. साधारण १२० दिवसात नियमानुसार सोलर पॅनल बसवणे बंधनकारक आहे, अन्यथा एजन्सीकडून दंड वसूल करण्याची तरतूद आहे. अनेक प्रकरणात कामाच्या रक्कमेपेक्षा दंड अधिक असल्याच दिसून आले. मागेल त्याला सोलर पंप योजना तर



निव्वळ धुळफेक ठरत असल्याच वास्तव आहे. यामध्ये ५५ हजार शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत. त्यातील तीन हजार अर्जाची छाननी झाली आहेत तर त्यातील सातशे शेतकऱ्यांकडून पैसे भरून घेण्यात आले आहेत. पैसे भरले असले तरीही अजून एजन्सीची निवडच केली नसल्याच निदर्शनास आले. यामुळे एकही सोलार पंप पैसे भरूनही मिळालेला नाही. निवडणुकी अगोदर घोषणा करून शेतकऱ्यांचे पैसे घेतले पण नंतरच वास्तव हे शेतकऱ्यांच्या डोळ्यात धुळफेक केल्याचं दिसून येऊ लागलं आहे. आर.डीएस.एस. योजनेची कामे देखील संथ गतीने सुरु आहेत.

पंधरा महिन्यात फक्त ४० टक्केच कामे पूर्ण झाली आहेत आता जुनपर्यंत उर्वरीत ६० टक्के काम होतील का? असा प्रश्न आ. पाटील यांनी विचारला. तसेच ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत आ. पाटील यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

# भालकीतील घटनेच्या निषेधार्थ उमरगा-लोहारा, जळकोट कडकडीत बंद




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० जानेवारी -**
कर्नाटक राज्यातील भालकी येथे झालेल्या महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळा विटंबन प्रकरणाच्या निषेधार्थ उमरगा शहर सोमवारी (दि.२०) कडकडीत बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला.

या प्रकरणाच्या निषेधार्थ गुंजोटी, मुरूम नंतर सोमवारी उमरगा शहरात बंद पाळण्यात आला. सकाळी दहाच्या सुमारास लिंगायत समाज बांधव छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येऊन महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या नावाने घोषणा देत या घटनेच्या तीव्र शब्दात निषेध केला. याला उमरगेकरांनी उस्फूर्त प्रतिसाद देत येथील बाजारपेठ, विविध संस्था कडकडीत बंद ठेवली. यावेळी लिंगायत समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एस. मलंग, शरणाप्पा येळापूरे, चंद्रकांत मजगे, महेश माशाळकर, राजशेखर आरबळे, दिनेश बिराजदार, महेश आळंगे, अमोल पाटील, जगदीश दंडगे, नागेश दंडगे, प्रविण माशाळकर, इराण्णा बसगुंडे, सोनू जवळगे, बालाजी कुंडुबले, दयानंद मलंग, महादेव आरबळे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

**लोहारा** - लोहारा शहर दि.२० जानेवारी रोजी कडकडीत बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला. सकाळी सर्व समाज बांधव एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकात महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या नावाने घोषणा देत या घटनेचा तिव्र भाषेत निषेध व्यक्त केला. या प्रकरणात सहभागी असलेल्या समाजकंटकावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली. शहरातीला प्रमुख मार्गाने मोर्चा काढून पोलीस ठाणे व तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी शंकर जट्टे, दत्तात्रय बिराजदार, जालिंदर कोकणे, विजयकुमार ढगे, दिपक मुळे, मल्लिनाथ फावडे, ओम कोरे, प्रमोद बंगले, हरी लोखंडे, विर फावडे, आदींसह समाज बांधव सहभागी झाले होते.

**जळकोट** - कर्नाटकातील भालकीजवळ १२ व्या शतकातील महान समतानायक, जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांना अटक करुन कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी आलुर येथील लिंगायत समाजबांधवांनी महात्मा बसवेश्वर चौक येथे निषेध व्यक्त केला.

उमरगा तहसील कार्यालयात नायब तहसीलदार यांना याविषयी निवेदन देण्यात आले. यावेळी गावातील लिंगायत समाज बांधव सिद्धप्पा ब्याळीकुळ्ळे, कल्याणप्पा लाटे, सागर उमशट्टे, रेवणसिद्ध फुलमाळी, गुरबसय्या स्वामी, सिद्धाराम वाकडे, महादेव मासुडे, बसवराज पांढरे, शरणप्पा काशेट्टी, इरण्णा मातोळे, आनंद मासुडे, सुनिल दुधगे, बसवराज वाकडे, संजय कासार, बबलु इंगळे, शिवा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नेहरू युवा केंद्राच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२० जानेवारी -**
नेहरू युवा केंद्र भारत सरकार धाराशिव यांच्या माध्यमातून जिल्हाभर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

याचाच एक भाग म्हणून वाशी तालुक्यातील नांदगाव येथे क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात कबड्डी, खोखो, १०० मिटर रनिंग तसेच गोळाफेक अश्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये युवक, युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक धनंजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# २६ जानेवारीला सर्वधर्मीय धरणे आंदोलनाचा इशारा

## संतोष देशमुख, सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणातील आरोपींना फाशी द्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या करण्यात आली. याप्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या तसेच परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला. याप्रकरणतील दोषींना कठोर शिक्षा करण्यात यावी तसेच त्यांच्या मागील मुख्य सुत्रधारांचा शोध लावावा या मागणीसाठी दि २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी सर्वधर्मीय, सर्व जातीय शिष्टमंडळ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांचेमार्फत पाठविलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निघृणपणे हत्या करण्यात आली. तसेच सोमनाथ सुर्यवंशी, राजेश कोल्हाळ यांच्या मारेकऱ्यांना तत्काळ अटक करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हत्या होऊनही आरोपी मोकाट फिरत आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना फाशीची शिक्षा देऊन या हत्यामागील सर्व सुत्रधारांना शोधून अटक करण्यात यावी. सर्वसामान्य माणसांना धाकात ठेवण्यासाठी तसेच दहशत निर्माण करण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी गुंडांच्या टोळ्या निर्माण झाल्या असून त्यांना वेळीच पायबंद करणे गरजेचे आहे. अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांना कायद्याचा धाक निर्माण करावा, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सोडवावा आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

यावेळी ॲड मनोज आखरे, भूषण देशमुख, रविंद्र वाढे, किरण घोंगडे, दत्तराव नवघरे, गोविंद भंवर, बबन गलांडे, ॲड रावण धाबे, शंकर कदम, शिवाजी पाटील, माधव कोरडे, बाजीराव सवंडकर, डॉ रमेश शिंदे, सागर कोल्हाळ, विजय कोल्हाळ, शिवाजी कऱ्हाळे, बाजीराव इंगोले, खंडेराव सरनाईक, ॲड नागेश अंभोरे, कुंडलीक गायकवाड, रमेश जाधव, शेख नईम शेख लाल, दाजीबा पाटील, मनिष आखरे, नौमान शेख, राज पाटील, एकनाथ शिंदे, प्रवेश श्रृंगारे, ॲड वैभव शिंदे आदींची उपस्थिती होती.

# स्वातंत्र्य सैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर गौरव शताब्दी समिती गठीत

## कार्यक्रमाला खा. शरद पवार उपस्थित राहणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**
शहरातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माणिकराव देशमुख टाकळगव्हाणकर यांना दि २७ जानेवारीला शंभर वर्षे पूर्ण होत असल्यामुळे सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून त्यांची गौरव शताब्दी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त येथील शासकीय विश्रामगृहात दि २० जानेवारी सोमवारी गौरव शताब्दी सोहळा समितीची बैठक आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा शरदचंद्र पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर, खा नागेश पाटील आष्टीकर, माजी केंद्रीय मंत्री सुर्यकांता पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी मंत्री माधवराव किन्हाळकर,माजी मंत्री गणेशराव दुधगावकर, माजी मंत्री सुरेशराव वरपूडकर, आ. संतोष बांगर, आ.प्रज्ञा सातव यांची उपस्थिती असणार आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माणिकराव देशमुख टाकळगव्हाणकर यांनी सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. हिंगोली जिल्ह्याच्या अनेक चळवळीत, आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदवला आहे. जिल्ह्याच्या विकासात त्यांचे योगदान आहे. सन १९६५ मध्ये परभणी जिल्हा परिषदेचे सदस्य देखील होते. शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्याची परंपरा त्यांनीच अमलात आणली. शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पूतळा व्हावा यासाठी त्यांनी वारंवार शहरातील स्थानिक नेत्यांना आग्रह धरला. स्वातंत्र्य सैनिकांचे अनेक प्रश्न, समस्या सोडविण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. आयुष्यभर समाजकारण त्यांनी केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांची शताब्दी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते व पदाधिकारी यांची सोमवारी येथील शासकीय विश्रामगृहात बैठक घेण्यात आली. यावेळी गौरव शताब्दी समितीची स्थापना करण्यात आली. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार नंदकिशोर तोष्णीवाल, खंडेराव सरनाईक, ॲड मनोज आखरे, मधुकर मांजरमकर, शेख नईम शेख लाल, ॲड के के शिंदे, दिवाकर माने, चंद्रकांत लव्हाळे, शेख नौमान, अनिल नैनवाणी, शिवाजी ढोकर पाटील, बिरजू यादव, ॲड शिवशंकर उमरेकर, विनायक भिसे, बाबुराव कदम, सुमित चौधरी, मिलींद उबाळे आदींची उपस्थिती होती.

# कुरूंदा मध्यवर्ती बँकेतील तिजोरी पळविल्याप्रकरणी आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पाच पथके स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, २० जानेवारी**
वसमत तालुक्यातील कुरूंदा येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शटर उचकटून चोरट्यांनी त्यातील तिजोरीच पळविल्याची घटना घडल्यानंतर या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिसांची पाच पथके स्थापन करण्यात आली आहेत. पीकअप वाहनातून तिजोरी पळविल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून त्यानुसार तपास सुरू करण्यात आला आहे.

वसमत तालुक्यातील कुरूंदा येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शटर उचकटून चोरट्यांनी तिजोरीच पळविल्याची घटना दि १९ जानेवारी रोजी घडली. त्यानंतर वसमतचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, कुरूंद्याचे सपोनि रामदास निरदोडे, गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, जमादार बालाजी जोगदंड यांच्यासह पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. श्वान पथक घटनास्थळीच घुटमळले तर ठसे तज्ज्ञांनी घटनास्थळावर पाहणी केली आहे.

दरम्यान, या घटनेतील तिजोरीसह आरोपींच्या शोधासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी पाच पथके स्थापन केली आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, उपनिरीक्षक विक्रम विठूबोने, कपील आगलावे यांची तीन पथके तर स्थानिक कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे, जमादार बालाजी जोगदंड यांच्यासह अन्य एक पथक स्थापन करण्यात आले आहे.

पोलिसांनी कुरूंदा गावात रात्रीच्यावेळी येणाऱ्या वाहनांचा सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून नंबर मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पिकअप वाहनातून तिजोरी पळविली असावी तसेच तिजोरी उचलण्यासाठी सात ते आठ जणांची टोळीच असावी अशी शक्यताही पोलिसांनी व्यक्त केली आहे. या प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांचा शोध घेण्यास सुरूवात केली असून वसमत येथे काही जणांची चौकशी केल्याचे विश्वसनीय सुत्रांनी सांगितले.

# तरूणांमध्ये सेवाभाव निर्माण करणारी चळवळ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना- शिवाजी पवार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**
राष्ट्रीय सेवा योजना हे युवकांना सेवा व त्यागाचे महत्त्व विशद करते.तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा या हेतूने शिक्षण क्षेत्रात विविध योजना कार्यरत आहेत परंतु राष्ट्रीय सेवा योजनेची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत जात आहे. युवकांमध्ये देश प्रेम, राष्ट्रीय एकात्मता,सर्वधर्मसमभाव, सहिष्णता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम होण्यासाठी अशा शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याची सर्वात उत्तम चळवळ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना आहे, असे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांनी केले.

खानापूर येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्‌घाटन माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांचेहस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर हे उपस्थित होते. समन्वयक डॉ. सचिन हाटकर, आदर्श महिला महाविद्यालय प्राचार्य डॉ. महेश मंगनाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठलराव चोतमाल, ग्रामसेवक श्रीमती सविता श्रीखंडे, मुख्याध्यापक ढाले एन.एस, समन्वयक प्रा. देवानंद येवले, केशवराव जाधव, संतोष पाईकराव, कृष्णा पवार, कामाजी जाधव, कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय चव्हाण व प्रा. आशिष इंगळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. किशोर इंगोले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील कांबळे यांनी केले. ग्रामस्थ, स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## संक्षिप्त वृत्त

### समाज कल्याण विभागाचे क्रिडा स्पर्धेत यश



हिंगोली- आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र शासन पुणे यांचेद्वारा आयोजित कर्मचारी विद्यार्थी विभागीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे पार पडल्या आहेत. अविनाश देवसटवार, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग लातूर तसेच यादव गायकवाड, सहायक आयुक्त समाज कल्याण हिंगोली, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी राजू एडके व हिंगोली समाज कल्याण अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये क्रिकेट स्पर्धांमध्ये हिंगोली जिल्हा हा प्रथम क्रमांक आला आहे व कबड्डी हॉलीबॉल स्पर्धामध्ये दुसरा क्रमांक पटकावला आहे. हिंगोली संघाचे कप्तान यादव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तीनही सामन्यात विजय झाला असून यामध्ये राजू ससाने, मोतीराम फड, राजू चरण, चांदोजी लाखाडे, मुंडे, शेख, भराडे, पोघे इत्यादी कर्मचारी यांनी उत्तम कामगिरी बजावली.

### बौध्द समाजाला स्मशानभूमीला रस्ता द्या



हिंगोली- तालुक्यातील राहोली खुर्द येथे बौध्द समाजाच्या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्यासह इतर मागण्यांसाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. राहोली खुर्द येथील गट क्र १५१ वर असलेल्या बौध्द स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देणे, बौध्द स्मशानभूमीच्या असलेल्या सातबारावर क्षेत्र उपलब्ध करून देणे, सदरील बौध्द समाजाला स्मशानभूमीची १० गुंठे जागा उपलब्ध करून द्या अशी मागणी आंदोलनकांनी केली आहे.

# उत्तमराव इंगळे चषक कबड्डी स्पर्धेत परभणीचा संघ विजेता, उपविजेता सेलू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**
टाकळी शेवंता देवी येथील आयोजित शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त स्वर्गीय उत्तमराव इंगळे चषक कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद युनिटी फाउंडेशन परभणी यांनी पटकेविले तर मानस स्पोर्ट्स सेलू यांना दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेचे तृतीय पारितोषिक शिवाजी क्रीडा मंडळ वाखरी यांनी प्राप्त केले. एक दिवसीय क्रीडा स्पर्धेमध्ये मराठवाड्यातील नामवंत संघांनी सहभाग घेतला. पारितोषिक वितरण सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ प्रदीप देशमुख तर माजी खासदार ॲड शिवाजी माने यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. युनिटी फाउंडेशन परभणी व शिवाजी क्रीडा मंडळ वाखारी तर मानस स्पोर्टस सेलू व साई स्पोर्ट्स परभणी यांच्यात उपांत्य सामने झाले यामध्ये प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करीत अंतिम सामन्यात प्रवेश केला दुसरा मानस स्पोर्ट्स सेलू व युनिटी स्पोर्ट्स स्पोर्ट्स परभणी यांच्यात झाला यामध्ये युनिटी स्पोर्ट्स परभणी यांनी अजिंक्यपद स्पर्धेच्या पटकविले. प्रथम क्रमांकाचे रुपये २१,१११ यांचे पारितोषिक युनिटी फाउंडेशन परभणी तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रुपये १५,१११ मानस स्पोर्ट्स सेलू या संघांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी टाकळी ग्रामस्थ हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन पंचमंडळी यांनी परिश्रम घेतले.

# समाजातील ज्वलंत प्रश्न घेऊन लढे उभे केल्यास चळवळ उभी राहील- प्रा कांबळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**
चळवळीला जर उब द्यायची असेल तर समाज एक संघ असला पाहिजे आणि सर्व गटातटांनी समाजातील ज्वलंत प्रश्न घेऊन लढा उभारल्यास चळवळ बांधता येऊ शकते आणि चळवळ पुन्हा उभी करता येवू शकते असा आशावाद प्रसिद्ध आंबेडकरी साहित्यिक आणि विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी व्यक्त केला.

हिंगोली येथील बौद्ध संस्कृतिक मंडळाच्यावतीने उज्वल इंग्लिश हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे ३८ व्या वर्षाचे उदघाटक व व्याख्याते प्रा. कांबळे हे होते, अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष प्रा. शत्रुघ्न जाधव हे होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थापक

पुर्नमांडणीची गरज-अर्थात चळवळी बांधारे या विषयावर प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे (छ. संभाजीनगर) यांनी गुंफले. तब्बल सव्वा तास विषयाची मांडणी करीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेले विविध चळवळी व लढे आणि त्या काळातील आंबेडकरांचे कार्यकर्ते याचे उदाहरणे देऊन त्या काळातील निष्ठा आणि आत्ताची निष्ठा व चळवळी याचे उदाहरणे देऊन सांगितले की, डॉ.बाबासाहेब म्हणाले होती

शकतो. आज आहे का असे चित्र महाराष्ट्रात असा प्रश्न प्रा. कांबळे यांनी यावेळी उपस्थित करीत मा. कांशीराम यांनी हा फार्मूला वापरून उत्तर प्रदेशात बाबासाहेबांचा निळा झेंडा फडकला होता असे सांगितले.

आपल्या विषयावर बोलताना ते पुढे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली चळवळ उभी करण्यासाठी तीन गोष्टीची गरज लागणार आहे त्यामध्ये वेगवेगळ्या गटातटामध्ये विभागलेल्या नेते व कार्यकर्त्यांवर समाजाचा धाक असला पाहिजे, दुसरी समाजामध्ये एकजुटी संदर्भात व सामाजिक विकासा संदर्भात प्रबोधन वर्ग चालले पाहिजे, आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध जातीनां सोबत घेऊन त्यांच्यात नेतृत्व उभे केले पाहिजे.

राहिले नाही. तेव्हा समाजाने व येथे विखुरलेल्या गटातटातील राजकीय पक्षांनी किमान जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्र येऊन लढलं पाहिजे, जेव्हा समाज गर्तेत जातो गुलामीच्या वाटेवर असतो तेव्हा बाबासाहेब नीट समजून घेऊन प्रश्न ऐरणीवर ठेवून जर लोकांचं जागरण केलं, प्रबोधन केलं, तर चळवळीला पुन्हा उब देता येऊ शकते आणि आणि चळवळ व्यापक करता येऊ शकते आणि चळवळीचं वादळ निर्माण करता येऊ शकते असा विश्वास व्याख्यात्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रास्ताविक मंडळाचे उपाध्यक्ष कैलास भुजंगळे यांनी केले. संचलन कोषाध्यक्ष प्रा. डॉ. सचीन हटकर यांनी केले, पाहुण्यांचा परिचय गंगाधर पाईकराव यांनी करून दिला. याप्रसंगी त्रिशरण पंचशील उपाध्यक्ष सुभाष भिसे यांनी म्हटले राष्ट्रगीताने पहिल्या पुष्पाचा समारोप झाला. यशस्वीतेसाठी प्रवीण रुईकर, बबन दांडेकर, आर. के. वाकळे, प्रदीप इंगोले, भीमराव कुरुडे, यु.पी.खंदारे, बबन गायकवाड अदिसह कार्यकारी

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## अवैध देशी दारू विक्री; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० जानेवारी -**
तालुक्यातील चवणहिप्परगा येथे अवैध देशी दारू विक्री एका विरूद्ध देवणी पोलीसात गून्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाच्या वतिने मिळालेली अधिक माहिती अशी की, मोजे चवणहिप्परगा येथे अवैध देशी दारू विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने विना परवाना देशी दारू स्वत:हाच्या फायद्यासाठी अवैध विक्री व्यवसाय विना परवाना स्वत:हाच्या शेतात पत्र्याच्या शेड मधे करत होता. पोलीसांची चाहूल लागताच पळून गेला.

पत्र्याच्या शेड मधे मिळालेला माल देशी दारूच्या कागदी लेबलच्या १८० एम एलच्या १७ बाटल्या प्रति बॉटल किमत ७० रू प्रमाणे एकूण ११९० रूपयांचा मूद्देमाल जप्त करण्यात आला.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सूग्रीव कोंडामंगले यांच्या फिर्यादीवरून आरोपी वैभव सत्यवान बिरादार (फरार)रा चवणहिप्परगा ता देवणी याच्या विरोधात गूरनं १५/ २०२५ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्याणूसार गून्हा नोंद करण्यात आला आहे.

याप्रकरणाचा पूढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक सूग्रीव कोंडामंगले हे करीत आहेत.

### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### संक्रांतनिमीत्त महिलांचे हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न

**वलांडी, दि.२० जानेवारी -**
सीमाभागातील भालकी तालुक्यातील आळवाई येथील पुजा दत्तात्रय स्वामी यांच्या घरी महीला मंडळांनी हळदी-कुंकू कार्यक्रम साजरा केला. महिलांना तीळगुळ देऊन वाण वाटप करण्यात आले. उपस्थित शोभा स्वामी, आराध्या स्वामी, चंद्रकला स्वामी, श्रीदेवी स्वामी, पीयुष स्वामी, सोना स्वामी, अशुमती स्वामी, अंबिका स्वामी, शिवमाला गंदगे, अंबिका जोशी, सुरेखा हालकुडे, शुभांगी गंदगे, जनाबाई पांचाळ, वैजंता पांचाळ, प्रतिक्षा पांचाळ, कस्तुरबाई बिरादार, सुर्वणा बिरादार, मनिषा बिरादार, वैशाली बिरादार, लता लांडगे, आश्विनी लांडगे, कस्तुरबाई गंदगे, शिवनंदा गंदगे, ऋतुजा गंदगे, किरण गंदगे, चंद्रकला गंदगे, राणी गंदगे, सपना गंदगे, लैला नवाजभाई, आस्मिन नवाजभाई, रेषमा नवाजभाई, पुष्पा सुरशेटवार, पुष्पा जोशी, मुद्रिकाबाई बिरादार आदि महीला मंडळ उपस्थित होते.



### १५० विद्यार्थ्यांनी दिली टॅलेंट सर्च परीक्षा

**वलांडी, दि.२० जानेवारी -**
महाराष्ट्र राज्य टॅलेंट सर्च परीक्षा देवणी शहरातील विवेकवर्धिनी प्राथमिक विद्यालय या केंद्रावर शांततेत व्यवस्थितरीत्या पार पडली. एकूण १५० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. इयत्ता दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा होती. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढावी म्हणून सदरील परीक्षेचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्राभर एकाच दिवशी केले जाते. या परीक्षेसाठी केंद्र संचालक म्हणून सातभाई यांनी काम पाहिले. त्यांना सहायक म्हणून मुख्याध्यापक विनायक पाटील बटनपुरकर, सहशिक्षक अण्णाराव मोरे, रावसाहेब जाधव, गुणवंत कदम,सागर जिवणे, श्रीमती शोभा पाटील, सुरेखा ढवळे-गरड आदींनी सहकार्य केले.



### गतिरोधक बसविण्याची मागणी

**वलांडी, दि.२० जानेवारी -**
वलांडीच्या शिवाजी चौक राज्य मार्गावर गतिरोधक बसवा अन्यथा येत्या २६ जानेवारी रोजी राज्य मार्गावर रस्ता रोको करण्याचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्याने एकच चर्चेला उधाण आली आहे. वलांडी सारख्या गावाला राज्यमार्गावर गतिरोधक बसण्यासाठी महायुती सरकारच्या काळात साधा गतिरोधक बसण्यासाठी आंदोलन करण्याचा मार्ग अवलंब व्हावा लागत असल्याने वलांडी सारख्या गावाकडे लोकप्रतिनिधीचा लक्ष कसा आहे. यावरून जनतेत संभ्रम निर्माण झाला आहे. या निवेदनावर गावातील व परिसरातील ५० लोकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष विनायक बगदुरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे लातूर जिल्हा वाहतूक सेल अध्यक्ष हकीम बौडीवाले, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष महेश जाधव, टिपू सुलतान विचारमंचचे अध्यक्ष अक्रम शेख यांनी संमती दर्शवली आहे.



### काव्य वाचना १७ बालकवींचा सहभाग

**अहमदपूर, दि.२० जानेवारी -**
बालकवी स्पर्धेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त नाशिकच्या ज्ञानवर्धिनी विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दि.१८ व १९ जानेवारी या दोन दिवसीय काव्यहोत्र अर्थात विश्वविक्रमी काव्य संमेलनाचे आयोजन नाशिकच्या डे केअर शाळेच्या प्रांगणामध्ये करण्यात आले होते. या उपक्रमात राज्यभरातील ६७१ बालकवींनी सहभाग नोंदवून आपल्या कविता सलग २९ तास सादर केल्याने त्याची नोंद वंडर बुक ऑफ रेकॉर्डस मध्ये करण्यात आली २४ तास सलग कविता सादर करण्याचा विक्रम मोडीत काढून सलग २९ तास काव्यवाचन बालकवींनी केला. यात लातूर जिल्ह्यांमधून अहमदपूरचे एकमेव संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या १७ बालकवींनी सहभाग नोंदवून आपल्या कविता सादर केल्या. त्यांच्या समवेत महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्या आशा रोडगे-तत्तापुरे, सहशिक्षक सतीश साबणे, सहशिक्षक युवराज मोरे सहभागी होते.

कावळ्यांचा मृत्यू झालेल्या परिसरातील दहा किमी त्रिज्येतील क्षेत्र 'अलर्ट झोन'

## उदगीर शहरातील कावळ्यांचा मृत्यू बर्ड फ्लयुनेच

▶▶ 'अलर्ट झोन'मधील कुक्कुट पक्यां चे सर्वेक्षण; वैद्यकीय नमुने संकलित केले जाणार...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० जानेवारी -**
उदगीर शहरातील कावळ्यांचा मृत्यू 'एव्हियन इन्फ्लुएंझा' (एच५एन१) या विषाणूजन्य आजाराने (बर्ड फ्लू) झाल्याचे भोपाळ वैद्यकीय प्रयोगशाळेकडून प्राप्त अहवालातून निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेतल्या आहे. यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यावस्थापन प्राधिकरणच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे यांनी प्राण्यांमधील



संक्रामक व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार उदगीर शहरातील महात्मा गांधी उद्यान, हुतात्मा स्मारक नगरपरिषद वाचनालय व पाण्याची टाकी येथील १० किलोमीटर त्रिज्येतील परिसर सतर्क भाग (अलर्ट झोन) घोषित करण्यात आला आहे. कावळ्यांचा मृत्यू झालेल्या बाधित क्षेत्रामध्ये नागरिकांच्या हालचालीस, तसेच इतर पक्षी व प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला आहे.

याठिकाणची खाजगी वाहने बाधित परिसराच्या बाहेर लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या परिसराचे सोडियम हायड्रोक्साईड किंवा सोडियम हायपोक्लोराईट किंवा पोटॅशियम परमॅग्नेटने निर्जंतुकीकरण करावे.

प्रभावित क्षेत्राच्या १० किलोमीटर त्रिज्येतील कुक्कुट पक्ष्यांचे सर्वेक्षण करून त्यांचे वैद्यकीय नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनामार्फत तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत असून नागरिकांनी कसलीही भीती बाळगू नये, तसेच अफवावर विश्वास ठेवू नये. जिल्ह्यात इतर ठिकाणी पशूपक्ष्यांचे असाधारण मृत्यू आढळल्यास तात्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना किंवा वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे

## अहमदपूर मॅरेथॉन १८२२ स्पर्धकांचा सहभाग




**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२० जानेवारी -**
स्वामी विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्ट व सिद्धी शुगर कारखाना, उजना यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अहमदपूर शहरात मॅरेथॉन स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये जवळपास १८२२ रनर्स सहभागी झाले होते. यात ७५८ लहान मुला मुलींचा व १०६४ महिला व पुरुषांचा समावेश होता.

सिध्दी शुगरचे संचालक अविनाश जाधव यांचे हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. आय.पी.एस अधिकारी सागर खरडे यांच्या अध्यक्षतेखाली या स्पर्धा संपन्न झाल्या.

डॉ.ऋषिकेश पाटील, डॉ. नेहा पाटील, अश्विन आंधळे, शैलेश पाटील, अभिजीत कराड, डॉ.संतोष देवकत्ते इत्यादी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचा उद्देश शहरामध्ये आरोग्य विषयी जनजागृती करणे हा होता. आसपासच्या सर्व जिल्ह्यातील रनर्स सहभागी झाले होते.

सहभागी सर्व स्पर्धकांना मेडल व ई सर्टिफिकेट देण्यात आले. स्पर्धेतील पहिल्या चार विजेत्यांना ट्रॉफी मेडल व रोख रक्कम स्वरूपात बक्षीस वितरण करण्यात आले.

### आबासाहेब इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२० जानेवारी -**
आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज देवणी येथे भव्य प्रारूपात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संमेलन विद्यार्थ्यांच्या उपस्थित मोठ्या जल्लोषात संपन्न झाले.

संमारंभाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांनी भूषवले होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

तर प्रमुख पाहुणे म्हणून नगर पंचायतीच्या नगराध्यक्षा कीर्ती घोरपडे, गट विकास अधिकारी सोपानराव अकेले, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके, देविदास पतंगे, ॲड. शिवानंद मळभागे सह अदिंची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गाणे संगीत यावर नाचत, डान्स करत आपल्या कलागुणांना वाव दाखवत मोठ्या संख्येने आपला भाग नोंदविला होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नियाज सय्यद, साक्षी हुल्ले, भाग्यज्योति गुडडा यांनी केले.

शाळेचे लीड को ऑर्डिनरी क्षेमानंद कन्नाडे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ४ महिन्यात डायलिसिस ८७, डेंटल एक्सरेच्या ४२ तर ईसिजीचा ५५० रुग्णांना फायदा

### रेणापूर ग्रामीण रुग्णालयात मिळताहेत अत्याधुनिक सुविधा...

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२० जानेवारी -**
लातूर जिल्ह्यातील लातूर उदगीर वगळता डायलिसिस सेवा रेणापूरच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये उपलब्ध झाली असून याचा शुभारंभ दि.१८ आक्टोबर रोजी प्रथम उपचार घेणाऱ्या रुग्णाच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला होता. तर या व्यतीरीक्त ईसिजी, डेंटल एक्सरे, या ही सुविधा उपलब्ध झाल्या अत्याधुनिक सुविधा मिळत असल्याने याचा फायदा हजारो रुग्णांना मिळत आहे.

या ग्रामीण रुग्णालयात अत्याधुनिक आक्टोबर, ते जानेवारी या चार महिन्यांमध्ये एकूण ८७ रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून या डायलिसिस सेवेचा मोफत उपचार मिळाल्यामुळे ८७ रुग्णाना मोफत उपचार मिळाल्यामुळ लाखो रुपायचा त्यांना दिलासा मिळाला आहे. रेणापुर तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांच्या सेवेसाठी २४ तास आरोग्य सेवेसाठी कार्यरत असलेले रेणापुर येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक सेवा दिल्या जातात. परंतु यामध्ये गेल्या अनेक दिवसापासून डायलिसिसची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रेणापूर तालुक्यातील अनेक डायलिसिसच्या रुग्णांना बाहेरगावी मोठ्या शहरांमध्ये जाऊन पैसे देऊन उपचार करून घ्यावे लागत होते. तसेच या ठिकाणी ईसिजीची सुविधा न्हवती परंतू आता उपलब्ध झाल्यामुळे तसेच डेंटल एक्सरे सुविधा उपलब्ध झाल्यामुळे मागील चार महिन्यात ५५० रुग्णांना ईसिजीचा लाभ मिळाला असून आक्टोबर २०२४ पासून डेंटल एक्सरेचा ४२ रुग्णांना फायदा झाला आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना या सर्व सुविधाचा फायदा व्हावा म्हणून ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक ए.बी. अलगुले यांनी या ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस मशीन, डेंटल एक्सरे मशीन, ईसिजी मशीन उपलब्ध व्हाव्यात म्हणून सतत वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून अखेर त्या मशीन मिळवल्यास गेल्या दोन वर्षापासून केलेल्या पाठपुराव्याच्या अखेर यश आले असून या ग्रामीण रुग्णालयामध्ये एकूण डेंटल एक्सरे मशीन, ईसिजी मशीन, आणि डायलिसिस मशीन उपलब्ध झाल्या आहेत.

तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक गरीब व गरजू रुग्णांना याचा फायदा व्हावा म्हणून सध्या या रेणापूरच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये पाच मशीन उपलब्ध झाले आहेत. या मशीनच्या माध्यमातून दिवसात किमान दहा रुग्णांना सेवा देता येते एका रुग्णांना एका वेळेस डायलिसिस करण्याचा खर्च जवळपास दीड हजार ते दोन हजार रुपये पर्यंत येतो. परंतु आता रेणापुरात महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत सुविधा मिळणार आहे. रेणापुर तालुक्यात पानगाव, खरोळा, कारेपूर, बिटरगाव, पोहरेगाव या पाच प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रातून दररोज जवळपास ६०० रुग्णांना मोफत उपचार दिला जातो. या पाच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात जे डायलिसिसचे रुग्ण असतील, डेंटल एक्सरेचे रुग्ण असतील तसेच ईसिजीचे रुग्ण असतील त्यांनी रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात सुरू झालेले सर्व सुविधाचा मोठ्या प्रमाणात फायदा करून घेण्याचे आवाहन रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक अलगुले यांनी केले आहे. रेणापूर तालूक्यातील अनेक रुग्णांना डायलिसिस व वरील सुविधाचा उपचार घेण्यासाठी लातूर, अंबाजोगाई, छ. संभाजीनगर आशा मोठ्या शहरात जाऊन लाखो रुपये खर्चून उपचार घ्यावा लागत होता. त्या रुग्णांना दिलासा मिळावा म्हणून रेणापूर ग्रामीण रुग्णालयात या मशीन उपलब्ध झाल्यामुळे अनेक रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

मानवाच्या शरीरात जे दूषित पदार्थ साठून राहतात ते बाहेर काढण्याची प्रक्रिया म्हणजे डायलिसिस, मानवाची किडनी हे नैसर्गिक रित्या काम करत असते. रक्तातील जे दूषित पदार्थ तयार होतात. ती लघवी वाटे बाहेर फेकणे हे किडनीचे नैसर्गिक काम आहे. हे काम जेव्हा किडनी करू शकत नाही तेव्हा डायलिसिस करावी लागते. तेव्हा किडनीचे कार्य १० टक्के पेक्षा कमी असते तेव्हा डायलिसिस ची गरज भासते.

---

गेल्या चार महिण्यात डायलिसिस चा ८७ रुग्णांना, डेंटल एक्सरेचा ४२ रुग्णांना तर ईसिजीचा ५५० रुग्णांना आजपर्यत मोफत उपचार मिळाला आहे. रेनापुर तालुक्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत सन २०१२ पर्यत हजारों डायलेसच्या, डेंटल एक्सरे, तसेच ईसिजी रुग्णांच्या नोंदी झाल्या होत्या. रुग्णांची ही संख्या लक्षात घेऊन तालूका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी आम्ही दोघांनी पाठपुरावा करुन गरीब आणि गरजू रुग्णांना याचा फायदा व्हावा म्हणून या मशीन रेणापूर ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध करुन घेतल्या. याचा फायदा अनेक गरीब व गरजू रुग्णांना होत आहे.

**-ए.बी. अलगुले, वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय रेणापूर**

## जीवनात आर्थिक नियोजन व बचतीचे स्थान महत्वपूर्ण : प्रा. सीमा बाजी

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२० जानेवारी -**
जीवनात आर्थिक नियोजन व बचतीचे स्थान महत्वपूर्ण असून विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयसिद्धी सोबतच देशाच्या सर्वांगीण विकासात मौलिक योगदान द्यावे असे प्रतिपादन प्रा. सीमा रवींद्र बाजी, कै.जी.एन. सपकाळ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक यांनी केले. तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'आर्थिक साक्षरता' या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना प्रा. सीमा बाजी यांनी नॅशनल स्टॉक एक्स्चेंज व सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांच्या कार्यप्रणाली बद्दल सविस्तर माहिती दिली.

आर्थिक गुंतवणूक करण्यापूर्वी त्याबाबत अगोदर सखोल अभ्यास करूनच गुंतवणूकीचे पाऊल उचलावे. केवळ एकाच ठिकाणी आर्थिक गुंतवणूक न करता सोने, शेतजमीन, प्लॉट, फ्लॅट, एफ.डी., आर.डी., शेअर बाजार, म्युच्युअल फंड अशा विविध ठिकाणी गुंतवणूक केल्यास प्रसंगी एखाद्या गुंतवणूकीत नुकसान झाले तरी इतरत्र केलेल्या एखाद्या गुंतवणूकीत फायदा होऊ शकतो व यामुळे झालेल्या नुकसानाची अप्रत्यक्ष रूपाने भरपाई मिळू शकते.

कधीही तात्काळ अधिक परताव्याचा मोह हानीकारक असून स्वत:चा, वाहनाचा, घेतलेल्या गृहकर्जाचा विमा उतरवून घेत आपली व आपल्या कुटुंबाची आर्थिक सुरक्षितता जोपासावी असेही त्यांनी यावेळेस सांगितले. व्याख्यानासोबतच विषयानुरूप प्रश्नोत्तराच्या माध्यमातून अतिथी व उपस्थितांनी परस्परांशी संवाद साधला. प्रास्ताविक डॉ. सचिन हंचाटे यांनी केले.

याप्रसंगी प्र. प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार, डॉ. सत्यशीला जोंधळे, डॉ. आनंद मुसळे, डॉ. शंकर कल्याणे, डॉ. भगवान कदम यांच्यासह करिअर संसदेचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२० जानेवारी -**
चाकूर येथील भाई किसनराव देशमुख महाविद्यालयाच्या संचालक मंडळाचा वाद काही दिवसांपूर्वी चव्हाट्यावर आला होता. एका कॉलेजवर दोन संचालक मंडळाने दावा केल्याचा वाद सुरू आहे.

त्यातच भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाचा हाळी खुर्द येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचा समारोप लोकायत शिक्षण संस्थेचे नव्याने दावा केलेले उपाध्यक्ष आबासाहेब बीडवे, सचिव बालाजी भोसले यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम समारोप झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हाळी खुर्दच्या सरपंच प्रचिता भोसले तर प्रमुख पाहुणे मा.जि.प. सदस्य विवेकानंद पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख खंडेराव वाघ, सुरेश राजोळे, ग्रा.पं. सदस्या प्रभावती नरहरे, इंदूबाई भालेराव, ललिता भोसले, हालिमाबी शेख आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन हावगीराज जनगावे यांनी केले.

## राज्यातील अवैध दारु विक्रीवर आळा बसणार

* कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी...
* सुधारणा करण्यासाठी २३ रोजी उच्चस्तरीय बैठक...

### आ.अभिमन्यू पवारांच्या मागणीवरून विधानसभा अध्यक्षांनी बोलविली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० जानेवारी -**
अवैध, बनावट व विषारी दारुविक्रीला आळा बसावा. हातभट्टीचा विषारी द्रव्यात समावेश व्हावा. अशी मागणी लक्षवेधीद्वारे सरकारकडे केली होती.या लक्षवेधीतील मागणी संदर्भात विधानसभा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली, तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत ६ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक झाली होती. या बैठकीत काही निर्णय घेण्यात आले होते. मात्र गेल्या दहा महिन्यांपासून अपेक्षित कार्यवाही झाली नाही.त्यामुळेआ. पवारांनी पुन्हा विधानसभा अध्यक्षांकडे बैठकीची मागणी केली. यावरून २३ जानेवारी रोजी मुंबई येथे



गृह राज्यमंत्र्याच्या उपस्थितीत विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आ. अभिमन्यू पवार यांनी दिली.

सध्याच्या कायद्यात अवैध दारूविक्रीचा गुन्हा सिद्ध झाल्यास ७ वर्षांपेक्षा कमी शिक्षा देण्याची तरतूद आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीला कोर्टात हजर न करता जागेवर जामीन द्यावा लागतो, अशी पोलिसांची अडचण आहे. त्यामुळे या गुन्ह्यात कमीत कमी ८ ते १५ वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद करण्याचा प्रस्ताव आ अभिमन्यू पवार यांनी ठेवला आहे. तसेच एकच व्यक्ती पुन्हा पुन्हा हाच गुन्हा करीत असेल. तर त्या व्यक्तीला ३ जिल्ह्यातून ३ वर्षांसाठी हद्दपार करण्याचाही प्रस्ताव ठेवला आहे. अवैध दारूविक्रीमधील गुन्ह्यात दंडाची रक्कम अत्यल्प आहे. त्यामुळे या गुन्ह्य़ातील व्यक्तीला आर्थिक दंड अधिक बसवा. यासाठी कमीतकमी ५० हजार ते ५ लाखापर्यंत दंडाची तरतूद करावी.

हातभट्टी हानिकारक द्रव्य तसेच युरिया वापरून तयार केली जाते. त्यामुळे हातभट्टी दारुला विषारी रसायन म्हणून घोषित करुन हातभट्टी तयार करणाऱ्यांना व विकणाऱ्यांना विषारी द्रव्य कायदा लागु करून त्या विरोधात कलम ३२८ नुसार कडक कारवाई करण्यात यावी. असा प्रस्ताव आ. अभिमन्यू पवार यांनी सरकारकडे ठेवला आहे.

यासंदर्भात काही ठोस निर्णय व कडक अमंलबजावणी करण्यासाठी २३ जानेवारी रोजी विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी गृहराज्यमंत्र्यासह आमदार अभिमन्यू पवार व संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

आ. पवारांनी केलेल्या मागणीनुसार राज्यात दारुबंदी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू झाली. तर अवैध, बनावट व विषारी दारुविक्रीला आळा आळा बसणार आहे.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आ. अभिमन्यू पवार आग्रही असून हा कायदा नक्कीच राज्यातील अवैध, बनावट व विषारी दारूविक्रीसाठी कर्दनकाळ ठरणार आहे.

### कायद्याच्या प्रभावी अमंलबजावणीमुळे महसुल वाढणार : आ. पवार

अवैध दारूविक्रीचा सर्वाधिक त्रास महिलांना होतो. तसेच युरिया वापरून तयार केलेल्या दारूच्या सेवनामुळे अकाली मृत्यू होतो. त्यामुळे तरुणपणीच महिलांच्या नशीबी विधवा जीवन जगण्याची वेळ येते.तर अशा दारुमुळे अनेक जणांचे संसार उघड्यावर पडले आहेत. पडत आहेत. याचा सर्वाधिक फटका महिलासह कुटुंबाला बसून अख्खे कुटुंब उध्वस्त होत आहेत.याला तात्काळ आळा बसावा यासाठी दारु विक्री कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि अवैध, बनावट व विषारी दारुविक्रीला आळा बसण्याच्या दृष्टीने ठोस निर्णय या बैठकीत होईल. अशी अपेक्षा असून कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सरकारचा महसूल वाढणार आहे. असे आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उपायुक्तांनी घेतला पालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा तास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** महापालिका उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे हे सध्या पालिकेच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या विविध शाळा, रुग्णालयांना अचानक भेटी देत आहेत. शनिवारी त्यांनी शहरातील विविध आरोग्य मंदिरांसह महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक २४ ला अचानक भेट देऊन पाहणी केली.

यावेळी त्यांनी शाळा क्रमांक २४ मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्याकडून विविध प्रश्नांची उत्तरे जाणून घेतली.

डॉ. पंजाबराव खानसोळे हे महापालिकेत आल्यापासून मागील काही महिन्यांपासून चांगलेच ॲक्टिव्ह झालेले दिसून येत आहेत. त्यांनी महापालिकेच्या थकित कर वसुलीसाठी मोठे योगदान दिले आहे. नागरिकांना आपल्या मालमत्तेचा कर भरावाच लागतो, याची जाणीव त्यांनीच करून दिली. विविध प्रकारच्या सवलती, मालमत्ता जप्ती, लिलाव अशा प्रकारचे दबावही त्यांनी टाकून वसुली वाढविली आहे. यामुळे अवघ्या ९ महिन्यांत ५२ कोटींच्या पुढे मालमत्ता कराची वसुली गेली आहे.

करदात्यांसाठी आता बक्षीस योजना सुरू केली आहे. महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी त्यांना मुक्तहस्त काम करण्याची संधी दिल्याने तेही मनमोकळेपणाने काम करीत आहेत. शनिवारी (दि. १८) सकाळच्या सुमारास डॉ. खानसोळे यांनी शहरातील आरोग्य मंदिरांसह महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक २४ ला अचानक भेट दिली. त्यावेळी त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना कामकाजाच्या विविध सूचना केल्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचा तासच घेतला. डॉ. खानसोळे यांनी विद्यार्थ्यांना बोलते केले. यावेळी महापालिकेचे व रुग्णालयांतील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## कचरा डेपोमुळे वाढला नागरिकांना दुर्गंधीचा त्रास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** शहरातील विलासराव देशमुख मार्गावर रस्त्यालगतच शहरातील विविध भागांतील कचरा संकलन करणारी वाहने उभी असतात. येथून मोठ्या वाहनांत कचरा भरून डेपोकडे पाठविला जातो. रस्त्यावर थांबलेल्या या वाहनांचा येथील नागरिकांसह वाहनधारकांना दुर्गंधीमुळे त्रास सहन करावा लागत आहे. कचरा संकलनाच्या जवळच सार्वजनिक वाचनालय, रस्त्याच्या समोरच्या बाजूला रुग्णालये, शाळा, शिवाय ये-जा करणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे त्रास वाढल्याची ओरड आहे. त्यामुळे येथील संकलन केंद्र इतरत्र हलवावे, अशी मागणी होत आहे.

## ॲट्रॉसिटी कायद्याविषयी लातुरात प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६ या कायद्याविषयी तालुका व जिल्हास्तरीय एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा २२ जानेवारी रोजी लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन येथे आयोजित करण्यात आली आहे.

पुणे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) व लातूर समाजकल्याण सहायक आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी सकाळी १० ते दुपारी २.३० या कालावधीत होणाऱ्या या प्रशिक्षण कार्यशाळेस जिल्ह्यातील ॲट्रॉसिटी प्रकरणाचे कामकाज पाहणारे जिल्हा व सत्र न्यायालयातील जिल्हा सरकारी वकील, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, दक्षता व नियंत्रण समितीमधील सर्व शासकीय व अशासकीय सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी केले आहे.

## अवैध गुटख्यावर पोलीसांचा छापा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** शहरासह जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत अवैध गुटखा, हातभट्टी दारूची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याचे समोर आले आहे. लातुरातील विठ्ठलनगर भागात एका घरावर पोलिसांनी छापा मारला. यावेळी जवळपास एक लाखाचा गुटखा जप्त केला आहे. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

पोलिसांनी सांगितले, लातूर शहरातील विठ्ठलनगर भागात एका घरात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याचा साठा करण्यात आला आहे, अशी माहिती खबऱ्याने पोलिसांना दिली. या माहितीच्या आधारे सपोनि. बोंडले, पोकॉ. शेख, हांडे, पांचाळ, पोउपनि. शेख, सहाय्यक फौजदार अंगद कोतवाड, शेख यांच्या पथकाने शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत विठ्ठलनगर येथे एका घरावर अचानक छापा मारला. यावेळी पांढऱ्या रंगाच्या पोत्यात गुटखा आढळून आला. शिवाय, सुगंधीत तंबाखू व इतर साहित्य असे १ लाख १४० रुपयांचा मुद्देमाल पोलिस पथकाने जप्त केला आहे.

## महावितरणकडून झाडांची छाटणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** शहरातील वीज तारांना अडथळा ठरणाऱ्या झाडाच्या फांद्यांची छाटनी महावितरणकडून केली जात आहे. मात्र काही ठिकाणी झाडाच्या पूर्णच फांद्या तोडून टाकल्यामुळे पर्यावरणप्रेमी नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी शहरातील अंबाजोगाई रोड तसेच बार्शी रोडवरील संविधान चौकामध्ये वीज तारांना अडथळा नसलेल्याही झाडांच्या फांद्या तोडल्याचे दिसत आहे. लातूर शहर महापालिकेच्या उद्यान विभागाने या प्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. ज्या ठिकाणी अडथळा नाही, अशा ठिकाणच्या फांद्या तोडणे हे चुकीचे असल्याचे म्हटले जात आहे.

# राज्यातील कांही घटना अमानवीय : डॉ. आंबेडकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** राज्यात मागील काही दिवसांपासून मराठा विरुध्द ओबीसी असे चित्र निर्माण झाले असून यातून काही अमानवीय आणि क्रूर प्रकारच्या घटना घडत आहेत. हे रोखण्यात राज्य सरकार सपशेल अपयशी असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केली.



लातूर तालुक्यातील टाकळी येथे प्रेम प्रकरणातून माउली सोट या तरुणास बेदम मारहाण झाली, त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, ही घटना अत्यंत निंदनीय असून ऑनर किलिंग असल्याची टीका ॲड. आंबेडकर यांनी यावेळी केली. २०१८ ला राज्यात मराठा आरक्षणासाठी आंदोलने झाली. याला विरोध म्हणून ओबीसी नेत्यांनी प्रतिआंदोलने केली. त्यावरून राज्यात मराठा विरुध्द ओबीसी असा वाद निर्माण झाला असून याचा परिणाम काही अमानवीय, क्रूर घटनांत होत असून यातून राज्यातील वातावरण दूषित होत चालले आहे. मात्र, हे रोखण्यात राज्यातील सरकार सपशेल अपयशी ठरले असल्याची टीका यावेळी ॲड. आंबेडकर यांनी केली.

राज्यात बीड, परभणी यानंतर लातूर येथे झालेली घटना निंदनीय आहे. या घटनांमुळे राज्यात जाती-जातीत द्वेष निर्माण झाला आहे. यावर मुख्यमंत्री यांनी बैठक घेऊन तत्परता दाखवावी. बीड, त्यांनतर लातूर तालुक्यातील टाकळी येथील घटनांत पोलिसांनी तपासात दिरंगाई केली आहे.

पोलीस आणि आरोपी यांचे लागेबांधे दिसून येतात. मी याबाबत लातूरचे पोलीस अधीक्षक यांच्याशी भेट घेऊन बोललो असल्याचे सांगून राज्यात होत असलेल्या द्वेषीय वातावरणाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. टाकळी येथील तरुण माउली सोट याची हत्या ही जातीय प्रतिष्ठेसाठी झाली असून याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेस वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी, विनोद खटके, तुळजापूर येथील डॉ. स्नेहा सोनकाटे, सचिन लामतुरे, रमेश गायकवाड यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रजासत्ताकदिनी नव्या पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -**



भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाचवेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे.

लातूर येथे नूतन पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण होणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या अगोदर पालकमंत्र्यांची नियुक्ती झाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले. लातूर जिल्ह्याला स्वतंत्र पालकमंत्री मिळाले. प्रशासकीय वर्तुळ व नागरिकांतून पालकमंत्री भोसले यांचे स्वागत होत आहे.

## डॉ. राजशेखर सोलापुरेंना बसवरत्न पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** समस्त लिंगायत समाज धाराशिव जिल्हा व बसवरत्न बहुउद्देशिय सामाजिक संस्था, उमरगा यांच्यावतीने देण्यात येणारा २०२५ चा बसवरत्न पुरस्कार महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे अभ्यासक आणि बसव व्याख्याते डॉ. राजशेखर सोलापुरे यांना उमरगा येथे आंध्रप्रदेशातील श्रीशैल पीठाचे पीठाधीश डॉ. पंडीताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर हे होते. यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार प्रवीण स्वामी, बापुराव पाटील, सन्नी पाटील, शिवलिंग पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. राजशेखर सोलापुरे यांनी महात्मा बसवेश्वरांच्या राजकीय विचारांवर पीएच. डी. केली असून आधुनिकतेचे अग्रदूत महात्मा बसवेश्वर, लिंगायत एक स्वतंत्र धर्म, बसवेश्वरी वचन साहित्य या पुस्तकासह चोवीस पुस्तकांचे लेखन व संपादन केले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. सोलापुरे यांचे स्वागत होत आहे.

## जिल्ह्यात बर्ड फ्लूच्या शोधासाठी ३२ शीघ्र कृती दल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** उदगिरातील दोन उद्यानात अचानक ५० कावळ्यांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली होती. पशुसंवर्धन विभागाने सॅम्पल घेऊन टेस्ट केली असता बर्ड फ्लूने कावळ्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्याने जिल्ह्यात काळजी घेण्यासाठी ३२ शीघ्र कृती दल स्थापन करून सतर्क राहण्याचे आवाहन केले जात आहे.

उदगिरात ६ शीघ्र कृती दल कार्यरत ठेवले असून, ज्या उद्यानांत कावळ्यांचा मृत्यू झाला त्या परिसरातील १० किलो मीटरच्या परिघातील कोंबड्या, संशयित पक्षांच्या टेस्ट करणे सुरू आहे. बर्ड फ्लूची लागण झाल्यानंतर पक्षी ताबडतोब मरतो, असे सांगून पशुसंवर्धनचे उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे म्हणाले, आम्ही पूर्व काळजी म्हणून जिल्ह्यात ३२ शीघ्र कृती दल स्थापन केली आहेत. या कृती दलात पशुसंवर्धनचे अधिकारी, कर्मचारी आहेत. ते नागरिकांत बर्ड फ्लूबद्दल असलेली भीती दूर करण्याचा प्रयत्न करीत असून, अजून तरी कोंबड्यांमध्ये फ्लूची लागण झालेली नाही. उदगीर येथील ज्या दोन उद्यानांत कावळे मृत्युमुखी पावल्याचे आढळून आले, त्याच्या एक ते १० किलो मीटर परिसरातील मांस विक्रेत्यांकडील पक्षांचे नमुने घेणे सुरू आहे. कावळे सोडून अन्य पक्षांत बर्ड फ्लूची लागण झाल्याची वार्ता नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. आम्ही उद्या उदगीरला जाणार आहोत.

परिस्थिती एकंदरीत कशी आहे, याचा आढावा घेतला जाईल. सध्या चिंता करण्याचे कारण नाही. जिल्हा प्रशासन आमचा पशुसंवर्धन विभाग सर्वोतोपरी काळजी घेत आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन केले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे, असे डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

## लातुरात ऑनकोपॅथोलॉजी कार्यशाळा व हेमॅटोलॉजी परिषद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** लातूर येथे प्रथमच कॅन्सरसारख्या रोगावर मात करण्यासाठी त्याचे अचूक निदान व आधुनिक उपचार पद्धती ज्या जगविख्यात डॉक्टरकडून अवलंबिल्या जात आहेत त्या लातूर व परिसरातील डॉक्टरांना माहिती व्हाव्यात जेणेकरून आधुनिक पद्धतीने रुणावर उपचार करता यावेत यासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व आय एम ए लातूर यांच्या वतीने ओन्कोपथोलॉजी व हेमाटोलॉजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेत जागतिक ख्यातीचे ऑन्कोपॅथोलॉजिस्ट डॉ. अनिता बोर्गेस आणि टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या त्यांच्या टीमने प्रत्यक्ष मायक्रोस्कोपवर कार्यशाळेत उपस्थित डॉक्टरांना प्रशिक्षण दिले. महाराष्ट्र आणि आसपासच्या राज्यांतील ३०० डॉक्टरांनी या कार्यशाळेस हजेरी लावली.

डॉ. मनचंदा रुम्मा, डॉ. एम.बी. अग्रवाल (मुंबई येथील हेमॅटोलॉजिस्ट आणि आंतरराष्ट्रीय अध्यापक), पुणे, सांगली, अहमदाबाद व सोलापूर येथील हेमॅटोलॉजिस्ट यांनी त्यांच्या केसेस सादर केल्या आणि अमूल्य अनुभव शेअर केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## प्लास्टिक निर्मूलनासाठी विद्यार्थ्यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी लातूर शहरामध्ये प्लास्टिक निर्मूलनासाठी उपक्रम हाती घेतला. या उपक्रमांतर्गत चार दिवस विविध कार्यक्रम घेण्यात आले.

स्वयंसेवकांचा उद्बोधन वर्ग घेऊन त्यांना प्लास्टिक वापरासंदर्भातील पर्यावरणावर होणारे धोके व त्याचे विपरीत परिणाम या संदर्भात माहिती देण्यात आली. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी प्रेरित केले.




यावेळी ३५० विद्यार्थ्यांनी प्लास्टिक निर्मूलन व जनजागृती या संदर्भात शपथ घेतली. त्यानंतर राजर्षी शाहू महाविद्यालयापासून गोलाई मार्गे आंबेडकर पार्कपर्यंत प्लास्टिक निर्मूलनासंदर्भात विविध घोषणा देत जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरी दरम्यान स्वयंसेवकांनी प्रत्येक दुकानामध्ये जाऊन दुकानदारांकडून कुठल्याही प्रकारच्या प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी विनंती केली. अनेकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

**शाहू महाविद्यालयाच्या ३५० विद्यार्थ्यांनी घेतली शपथ**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३५० स्वयंसेवकांनी प्लास्टिक निर्मूलनाची शपथ घेतली. शिवाय, जनजागरण रॅलीत सुमारे १३ पोते प्लास्टिक कचरा गोळा करून महानगरपालिकेकडे रिसायकलिंगसाठी पाठविला. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. कल्याण सावंत यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. प्रकाश रोडिया, नागेश कांबळे, स्वयंसेविका यशोदा सूर्यवंशी, राजकन्या फावडे यांच्यासह ३५० स्वयंसेवक उपस्थित होते.

# साई फाउंडेशनच्या विनामूल्य आरोग्य शिबीरास अभूतपूर्व प्रतिसाद

## डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लुटले आरोग्याचे वाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** साई फाउंडेशन द्वारा आयोजित विनामूल्य महाआरोग्य शिबिरास लातूरमध्ये अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. मकर संक्रांतीच्या निमित्ताने डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आरोग्याचं वाण लुटत एक आदर्श निर्माण केला आहे. या शिबिरामध्ये हजारो स्त्री-पुरुषांची तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत मोफत तपासणी करण्यात आली.

मकर संक्रांत म्हटलं की महिलांच्या जीवनातील एक महत्त्वाचा सण असतो. महिलांच्या दृष्टीने ती एक आनंदाची पर्वणीच !असते मकर संक्रांतीच्या काळामध्ये महिला भगिनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करून एकमेकींशी संपर्क साधतात व वाण लुटण्याची परंपरा या निमित्ताने असते. सध्या सर्वत्र हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. परंतु याला फाटा देत भारतीय जनता पार्टीच्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आगळे वेगळे हळदीकुंकू लुटत आरोग्याचे वाण लुटले आणि समाजापुढे एक आदर्श घालून दिला आहे. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मकर संक्रांतीच्या काळातील हळदीकुंकवाचे औचित्य साधत साई फाउंडेशनच्या वतीने डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लातूर शहरातील तीन भागांमध्ये विनामूल्य महाआरोग्य शिबिर आयोजित केले होते या शिबिरामध्ये सर्व रोगनिदान उपचार व तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन करण्यात आले औसा रोडवरील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सकाळी दहा ते पाच या कालावधीमध्ये तसेच विवेकानंद



पुरम परिमल शाळेमध्ये आणि जुन्या औसा रोडवरील कालिका मंदिराजवळील सिद्धेश्वर हाऊसिंग सोसायटीच्या सभागृहामध्ये हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचा हजारो स्त्री पुरुष नागरिकांनी लाभ घेतला. अनेक तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची साखर पातळी तपासणी, रक्तदाब तपासणी डोळे तपासणी, दंत तपासणी आदि तपासण्या मोफत करीत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले आणि मोफत औषधीचे वाटप देखील यावेळी करण्यात आले. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते फीत कापून या महाआरोग्य शिबिराचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका वर्षाताई कुलकर्णी, श्वेता लोंढे कोमलताई वायचळकर, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, सुनील मलवाड, दीपक मठपती, कृष्णा कुलकर्णी, बलराज खंडोमलके, शिरीष कुलकर्णी ,व्यंकटेश कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

माध्यमांशी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, मकर संक्रांतीच्या कालावधीमध्ये महिला हळदीकुंकवाच्या कार्यक्रमांमध्ये विविध वाण लुटतात; परंतु आम्ही याला फाटा देत आरोग्याचं वाण लुटण्यासाठी हे महाआरोग्य शिबिर आयोजित केले होते.

अशा प्रकारचे महाआरोग्य शिबिर लातूर शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये तसेच ग्रामपंचायत मध्ये येत्या काळामध्ये आयोजित केले जाणार आहेत . लातूरमध्ये जिल्हा आरोग्य रुग्णालय नाही त्यामुळे रुग्णांची हेळसांड होत आहे.

ही गरज ओळखून आम्ही साई फाउंडेशन्च्या वतीने या महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

साई फाउंडेशनच्या वतीने आयोजित या महाआरोग्य शिबिरास अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला हजारो स्त्री -पुरुष नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला .लातूरकर रांगेमध्ये उभे राहून आपल्या आरोग्याची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करून घेत असल्याचे चित्र यावेळी ठिकठिकाणी पहावयास मिळाले. या शिबिरामध्ये डॉ. पुनम पानगावे, डॉ. सुप्रिया, डॉ.तृप्ती सूर्यवंशी ,डॉ. ऋजुता शिवपुरकर ,डॉ. निखिल मुखेडकर, डॉ.शीतल रेड्डी ,डॉ. अमृता पाटील, डॉ. मयूर कुलकर्णी, डॉ.अनिकेत पाटील, डॉ. इमरान जमादार आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी दाताची ,नेत्र तसेच डोळे तपासणी करून रुग्णांची साखर पातळी व रक्तदाब तपासणीही केली. या शिबिरामध्ये न्यू व्हिजन नर्सिंग स्कूलच्या नर्सिंग चमूने सहकार्य केले.

## सोमवारपर्यंत करता येणार ‘आरटीई’साठी अर्ज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शिक्षण हक्क अधिनियमानुसार (आरटीई) दुर्बल व वंचित घटकांसाठी २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेस १४ जानेवारीपासून सुरूवात झाली. शनिवारपर्यंत २ हजार ११ पालकांनी ऑनलाइन अर्ज केले. यातील ११९८ अर्ज यशस्वी झाले. ८१३ अर्ज यशस्वी होण्याच्या प्रतीक्षेत असून, जागा केवळ २ हजार १७३ आहेत.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या २०७ आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा शाळांची संख्या ७ ने कमी झाली आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिलेल्या वेबसाईटवर २५ टक्के आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी अर्जाचा अक्षरशः पाऊस पडत आहे.

यावर्षीही अर्जांची संख्या पाहता लॉटरी पध्दतीनेच प्रवेश दिला जाण्याची शक्यता आहे. दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा, पोलीस कल्याणकारी (विनाअनुदानित) महापालिकांच्या (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) शाळांमध्ये आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने राबविण्यात येत आहे. ऑनलाइन अर्ज करण्याची २७ जानेवारी ही शेवटची तारीख आहे. अर्ज करण्यास आणखी सात दिवस शिल्लक आहेत.

या सात दिवसांत किमान दहा हजारच्या जवळपास अर्ज येण्याची शक्यता आहे. इयत्ता पहिली ते पूर्व प्राथमिक वर्गासाठी ही २५ टक्केतून प्रवेश देण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. यात पालकांना १० शाळांची निवड करता येणार आहे.

सध्या अर्ज करण्यास पालकांची घाई सुरू असल्याचे दिसत आहे.